


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार ३ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




# शिवसेना कुणाची?... पुन्हा तारीख!



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** शिंदे गटाचे वकील नीरज कौल यांनी शिवसेनेत फूट का पडली? याचे कारणच आज कोर्टाला सांगितले. यावेळी त्यांनी पहिल्याच युक्तिवादात काँग्रेस आणि भाजपचा उल्लेख केला. भाजपसोबत युती करून विधानसभेची निवडणूक लढली गेली. निकाल आल्यानंतर ज्यांच्या विरोधात निवडणूक लढली त्यांच्यासोबत आघाडी करून सत्ता स्थापन करण्यात आली. त्यामुळे पक्षात असंतोष होता आणि त्यातूनच पक्षात उठाव झाला, असा युक्तिवाद शिंदे गटाचे वकील नीरज कौल यांनी केला. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर कौल यांनी युक्तिवाद केला.

निवडणुका भाजप सोबत लढल्या मात्र नंतर वेगळे होण्याचा निर्णय घेतला गेला. ज्यांच्याविरुद्ध निवडणुका लढवल्या त्यांच्यासोबत नंतर युती केली गेली. त्यामुळे पक्षातून उठाव झाला. ठाकरे काँग्रेससोबत गेले म्हणून पक्षात असंतोष होता हीच आमची भूमिका आहे असे वकील नीरज कौल म्हणाले.



**आमचीच शिवसेना खरी**

विचारसरणी आणि विरोधी पक्षाच्या युतीमुळे पक्षात फूट पडली, असे सांगतानाच आमचीच मूळ शिवसेना असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच विधीमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष एकच असल्याचा दावाही कौल यांनी आजच्या सुनावणीवेळी केला.

**तर तुम्ही पक्ष काय चालवणार?**

ठाकरेंचा युक्तिवादच चुकीच्या मुद्द्यांवर आधारे करण्यात आला आहे. बाळासाहेबांच्या निधनानंतर पक्षात अचानक बदल केले गेले. पक्षाची रचना एका व्यक्तीच्या मर्जीनं झाली होती. एका सहीनं जर जबाबदारी मिळत असेल तर कार्यकर्त्यांचे महत्त्व काय? असा सवाल करतानाच जर तुम्ही पक्षात लोकशाही मार्गाने निवडणूक घेउ शकत नसाल तर तुम्ही राजकीय पक्ष काय चालवाल? निवडणुका कशा लढाल? पक्षांतर्गत निवडणुका घेतल्याचं पाहिजेत, असा युक्तिवादही त्यांनी केला.

**पुढील सुनावणी १५ सप्टेंबर रोजी-** पुढील सुनावणी १५ सप्टेंबरला होणार आहे. आजच्या सुनावणीत कौल यांनी पक्षाची फूट, पक्षाची घटना आणि पक्षातील मनमानी त्यातून झालेला उठाव आदी मुद्द्यांवर प्रकाश टाकला. पुढच्या सुनावणीत कौल हे अपात्रता, विधानसभा अध्यक्षांचा निर्णय आणि निवडणूक आयोगाचे आधार तसेच राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष यावर युक्तिवाद करण्याची शक्यता आहे.

## जरांगे पाटलांच्या लढ्याला मोठे यश,

# 58 लाख कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप

**अंतरवाली सराटी:** आज आमदार प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी हैदराबाद गॅजेटनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्याचे काम उद्या १२ वाजेपर्यंत सुरु करणार असून पहिले प्रमाणपत्र मनोज दादांच्या हातातून देणार असल्याची घोषणा केली. तसेच मंत्रालयात मराठा कक्षाची स्थापना होणार असल्याचीही माहिती लाड यांनी दिली आहे. यावेळी बोलताना लाड यांनी म्हटले की, दादा, मी विनंती करायला आलो आहे. मी पहिल्या दिवसापासून आपल्याला सांगतोय उपोषण करु नका. तुमच्या मनात जे आहे तेच होणार आहे. तुमचा विषय सोडवण्यासाठी आम्ही आहोत. काल रात्रीपासून मलाही झोप लागली नाही. डोळ्यात अश्रु आहेत. मी आज तुमचा भाउ म्हणून आलोय. जरांगेंना साथ देण्यासाठी आलो आहे. त्यांच्या १५ मागण्याची उत्तर पाठवली होती. दादांना



## मंत्रालयात मराठा कक्षाची स्थापना होणार, मोठी घोषणा

प्रशासनाशी बोलायचे नव्हते. त्यांच्या मोठ्या भावाच्या रुपाने आलो आहे.

**मंत्रालयात कक्ष स्थापन होणार-** पुढे बोलताना प्रसाद लाड यांनी म्हटले की, राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतींमध्ये नोंदी लावल्या जाणार आहेत. जिल्हानिहाय पेन ड्राईव दिले आहेत. आपण ६ कोटी मराठे आहोत. आपण कमी नाही आहोत. अर्जदारांनी फक्त अर्ज करायला पाहिजे. अर्ज केला नाही तर प्रमाणपत्र कसं मिळणार? जिल्हानिहाय नोडल ऑफिसर नेमला आहे. मंत्रालयातही कक्ष स्थापण करत आहोत. शिंदे-फडणवीस सरकार दादांच्या मागे उभे आहे. प्रसाद लाड यांनी पुढे बोलताना म्हटले की, आम्ही सगळे इथे आलो आहोत, आम्ही तत्काळ इथे निर्णय करणार आहोत. मी दादांना सांगितलं होतं की, नतद्रष्ट लोकांनी आरक्षण रद्द होण्यासाठी कोर्टात ➪(पान २ वर)

## महाराष्ट्रात मान्सून पुन्हा सक्रिय,

# विदर्भात मुसळधारचा अंदाज


**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारली आहे. पिकं सुकून चालली आहेत, संपूर्ण ऑगस्ट महिना उलटला मात्र राज्यात एकही थेंब पाउस पडलेला नाहीये. शेतक-यांचे डोळे आभाळाकडे लागले आहे. बळीराजाला पावसाची प्रतिक्षा आहे. त्यातच आता एक गुडन्यूज समोर आली आहे, राज्यात पुन्हा एकदा मान्सून सक्रिय होणार आहे. पुढील दोन ते तीन दिवसांमध्ये अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. या सर्व पार्श्वभूमीवर हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांना नवा अंदाज आता समोर आला आहे. पावसासंदर्भात दिलासा देणारी बातमी आहे.



दोन, तीन आणि चार सप्टेंबर रोजी बीड जिल्ह्यात मध्यम स्वरुपाचा पाउस होईल, राज्याचा विचार केल्यास नागपूरमध्ये तसेच पूर्व विदर्भात तीन, चार आणि पाच सप्टेंबर रोजी जोरदार पाउस पडणार आहे. तसेच कमी दाबाच्या पट्ट्याच्या परिणाम म्हणून पश्चिम विदर्भात देखील पाउस दमदार हजेरी लावणार आहे. विदर्भासोबतच पश्चिम महाराष्ट्र विषेत: पुणे जिल्ह्यात पुढील २४ तासांमध्ये चांगल्या पावसाचा अंदाज आहे. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये तसेच सोलापूर जिल्ह्यात देखील चांगला पाउस पडणार आहे. राज्यात पुढील चार दिवस चांगल्या पावसाचा अंदाज आहे, पावसाचं स्वरुप विखरूलेलं असेल म्हणजे कुठे पाउस पडेल कुठे पडणार नाही, मात्र ब-याच ठिकाणी मध्यम स्वरुपाच्या पावसाचा अंदाज आहे, असा अंदाज हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे.

पुढील दोन ते तीन दिवसांमध्ये पूर्व विदर्भात मुसळधार पावसाचा अंदाज आहे, ज्यामध्ये गोंदिया, भंडारा, वर्धा नागपूर, चंद्रपूर आणि यवतमाळ या सहा जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाउस होणार आहे. पश्चिम विदर्भात देखील जोरदार पावसाची शक्यता आहे. कारण तिकडे कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाला आहे. चार सप्टेंबर पासून ते आठ सप्टेंबर पर्यंत विदर्भातील जवळपास सर्वच जिल्ह्यांमध्ये चांगल्या पावसाचा अंदाज आहे. कमी दाबाचा पट्टा हा गुजरातकडे सरकत असल्याने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये या काळात पाउस हजेरी लावणार आहे. तसेच गणेशोत्सव काळात देखील राज्यात चांगला पाउस होणार आहे. पुढील दोन दिवस कोकण किनारपट्टी भागात अगदी पालघरपर्यंत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे,

# भाऊ माझा गेला, 40 आमदारांनी, 9 मंत्र्यांनी अद्याप शब्द काढला नाही



खा.सुप्रिया सुळेंची सरकारवर टीका

## राष्ट्रवादीचा अजित पवार गट सत्तेचा भाग आहे की नाही?

## अमित ठाकरेंवर दोन तासांत गुन्हा दाखल होतो पण, अजित पवार प्रकरणात अद्याप गुन्हा दाखल नाही

**मुंबई/प्रतिनिधी :** खासदार सुप्रिया सुळे यांनी दिवंगत नेते अजित पवार यांच्यावर बोलताना सत्ताधारी राष्ट्रवादीवर टीका केली आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्या. अजितदादांचे सुपुत्र पार्थ पवार हे खासदार झाले. आता सध्या राष्ट्रवादी सत्तेत असून अनेक महत्त्वाचे नेते सत्तेत मंत्री आहेत. दुसरीकडे अजितदादा यांच्या विमान अपघाताची चौकशी चालू असून याबाबत अद्याप कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. याच बाबीचा उल्लेख करून सुप्रिया सुळे यांनी खदखद व्यक्त केलीय. त्यांनी सत्ताधारी राष्ट्रवादीवर अप्रत्यक्षपणे टीकाच केली आहे.

सुप्रिया सुळे यांनी ठाण्यात पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांना मनसेचे नेते अमित ठाकरे यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याबाबत विचारण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो हटवल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. यावर भाष्य करताना, एक फोटो हटवला तर गुन्हा दाखल झाला. उपमुख्यमंत्री असलेल्या अजित पवार यांच्या अपघात प्रकरणात अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही, असे म्हणत त्यांनी सत्ताधा-यांवर टीका केली. अजित पवार यांचे निधन आणि त्यांच्या विमान अपघाताच्या चौकशीवर भाष्य केले. माझ्या भावाच्या विमानाचा एवढा मोठा अपघात झाला. सत्तेत असणा-या, उपमुख्यमंत्री असणा-या अपघात झाला. याबाबत अद्याप सरकारने कोणताही गुन्हा दाखल केलेला नाही. राष्ट्रवादीचा अजित पवार गट सत्तेचा भाग आहे की नाही?

अजित पवार गटाच्या ४० आमदारांनी, ९ मंत्र्यांनी कधीतरी एफआयआर किंवा चौकशीवर एक शब्दही काढलेला नाही, अशी खदखद सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली.

तसेच, मनसे आणि भाजपाने लढायचे की नाही हा त्यांचा प्रश्न आहे. अमित ठाकरेंवर दोन तासांत गुन्हा दाखल झाला. पण दुसरीकडे माझ्या भावाच्या विमान अपघाताच्या तपासाची काय स्थिती आहे, हे अजूनही आम्हाला माहिती नाही, अशीही खंत त्यांनी व्यक्त केली. यावर आता सत्ताधारी राष्ट्रवादी पक्षातर्फे काय प्रतिक्रिया दिली जाणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# पोटच्या मुलांनीच वृद्ध आई-वडिलांना भररस्त्यात काठ्यांनी केली मारहाण

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्याच्या इंदापूर तालुक्यातून एक अत्यंत संतापजनक आणि माणुसकीला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. आईच्या नावावर असलेली जमीन का विकली, या कारणावरून दोन मुलांनी मिळून आपल्या ६५ वर्षीय वृद्ध शेतकरी वडिलांना आणि आजारी आईला रस्त्यात अडवून

## जमीन का विकली?

काठ्यांनी निर्दयपणे मारहाण केली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला असून नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास तुकाराम किसन राउत (वय ६५) आणि त्यांची आजारी पत्नी अंजना राउत हे आपल्या गावात नेहमीप्रमाणे फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडले होते. त्यावेळी त्यांची दोन्ही मुले, संजय राउत आणि राजेंद्र राउत यांनी गाडीतून त्यांचा पाठलाग केला. रस्त्यातच गाडी थांबवून मुलांनी वडिलांना



जमीन का विकली? असा सवाल करत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. जमिनीचा व्यवहार तात्काळ रद्द न केल्यास जीवे मारण्याची धमकीही त्यांनी दिली. त्यानंतर दोन्ही मुलांनी हातातील लाकडी काठ्यांनी आई-वडिलांवर हल्ला चढवला.मुलांच्या या प्राणघातक हल्ल्यात तुकाराम राउत➪(पान २ वर)

# दिशा सालियान प्रकरणाचा तपास सीबीआयकडे

**मुंबई/प्रतिनिधी :** दिशा सालियान प्रकरणात मोठा निर्णय मुंबई हायकोर्टाने दिला. दिशा सालियन प्रकरणात गेल्या काही दिवसांपासून सतत आरोप केली जात आहेत. त्यातच आता कोर्टाने थेट दिशा सालियन प्रकरणाचा तपास हा सीबीआयने करावा असे म्हटले. सालियान कुटुंबाकडून सातत्याने आरोप केली जात आहेत. त्यात थेट आदित्य ठाकरेंचे नाव आले. कोणालाही आरोपी म्हणून वागणूक देउ नये, फक्त जबाब नोंदवावा, असेही कोर्टाने म्हटले. आता दिशा सालियान प्रकरणात तपास सीबीआय करणार आहे. तपास करून योग्य तो निष्कर्ष काढा, मग आरोपपत्र दाखल करा, असेही कोर्टाने नमूद केले. कोर्टाच्या या निकालानंतर आता दिशा सालियानचे वडील सतीश सालियान यांनी मोठे विधान केले. त्यांनी कोर्टाच्या निर्णयाचे स्वागत केले. मुंबई पोलिसांच्या तपासावर त्यांच्याकडून अनेकदा प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आली. आता अखेर तपास सीबीआयकडे देण्यात आला.सतीश सालियान यांनी म्हटले की, कोर्टाने जे केले ते योग्य आहे. इथूनपुढे न्याय मिळेल हे १०० टक्के वाटतंय. कोर्ट काही चुकी नाही करणार कधीपण. आता सर्व आरोपींची चौकशी करावी लागणार आहे. योग्य तपास झाला नसल्याचेही दिशा सालियान हिच्या वडिलांनी म्हटले. दिशाच्या वडिलांनी कोर्टाचे आभार मानले.सीबीआयच्या माध्यमातून योग्य तपास होईल, असेही दिशाच्या वडिलांनी म्हटले. दिशा सालियानचे वडील गेल्या काही दिवसांपासून न्यायाची लढाई लढत आहेत. या प्रकरणात आदित्य ठाकरेंचे थेट नाव आहे. आदित्य ठाकरेंवर सतत गंभीर आरोप केली जात आहेत. त्यातच आता थेट सीबीआयकडे हे प्रकरण गेले. त्यामुळे हा मोठा दणका नक्कीच म्हणावा लागेल.दिशा सालियान दिवंगत बालिवूड अभिनेता सुशांत सिंग राजपूत याची एक्स मॅनेजर होती. दिशा सालियान हिच्या मृत्यूनंतर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाली. इतक्या उंचाहून पडून फक्त तोंडातूनच रक्त कसे आले, असाही सवाल उपस्थित कोर्टाने केला. आता या प्रकरणात काही मोठे खुलासे होउ शकतात. सुरूवातीपासूनच या प्रकरणात सातत्याने आदित्य ठाकरेंचे नाव येताना दिसले.



# थायलंडने भारतीयांची व्हिसा मर्यादा घटवली

**बँकॉक :** थायलंड सरकारने भारतीयांसह ६० देश आणि प्रदेशांतील नागरिकांसाठी असलेली व्हिसामुक्त मुक्कामाची मर्यादा कमी केली आहे. आता भारतीय पासपोर्टधारकांना थायलंडमध्ये व्हिसाशिवाय ३० दिवसांपर्यंतच राहता येणार आहे. यापूर्वी ही मर्यादा ६० दिवस होती. थायलंडच्या गृह मंत्रालयाने या संदर्भातील नवीन अधिसूचना ३१ ऑगस्ट रोजी रायल गॅझेटमध्ये प्रसिद्ध केली. त्याबद्दल सविस्तर वृत्त दी इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे.नव्या नियमामुळे भारतीय पर्यटकांसाठी थायलंडचा व्हिसामुक्तप्रवेश मात्र कायम राहणार आहे. म्हणजेच केवळ पर्यटनाच्या उद्देशाने थायलंडला जाणा-या भारतीय नागरिकांना प्रवासापूर्वी व्हिसासाठी अर्ज करण्याची आवश्यकता नाही. मात्र, देशात प्रवेश केल्यानंतर परवानगी असलेला मुक्काम आता जास्तीत जास्त ३० दिवसांचा असेल. यापूर्वी भारतीय पर्यटकांना व्हिसाशिवाय ६० दिवसांपर्यंत थायलंडमध्ये राहण्याची परवानगी होती. थायलंडने जुलै २०२४ मध्ये व्हिसामुक्त ➪(पान २ वर)



# देशातील छोट्या व्यापा-यांना 'री केवायसी' अनिवार्य

**नवी दिल्ली :** तुम्ही छोटे व्यापारी असाल आणि क्यूआर कोड किंवा यूपीआयच्या माध्यमातून डिजिटल पेमेंट स्वीकारत असाल, तर १५ सप्टेंबर २०२६ ही अंतिम मुदत तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार डिजिटल पेमेंट स्वीकारणा-या व्यापा-यांसाठी री-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असल्याचे सांगितले जात आहे. मनी कंट्रोलाच्या रिपोर्टनुसार, डिजिटल पेमेंट स्वीकारणा-या सर्व व्यापा-यांनी १५ सप्टेंबर २०२६पर्यंत री-केवायसी पडताळणी पूर्ण करणे आवश्यक आहे. या मुदतीपर्यंत री-केवायसी पूर्ण न केल्यास संबंधित व्यापा-यांचे क्यूआर कोड ब्लाक होउ शकतात. त्यामुळे ग्राहकांकडून होणारे डिजिटल पेमेंट अडकण्याची शक्यता आहे. बनावट व्यापारी खाती आणि फसवणुकीला आळा घालण्यासाठी री-केवायसी महत्त्वाची आहे. काही व्यक्ती बनावट कागदपत्रांचा वापर ➪(पान २ वर)




# तुम्ही सिल्व्हर ओकला शिवसेना झोपवली

## ठाकरे गटावर टीका करताना शिरसाटांची जीभ घसरली

**मुंबई/प्रतिनिधी :** आज शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्ह कोणाचं? यावर सुप्रीम कोर्टात पुन्हा एकदा सुनावणी पार पडली, यापूर्वी झालेल्या सुनावणीदरम्यान शिवसेना ठाकरे गटाची बाजू मांडताना ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी जोरदार युक्तिवाद केला होता. त्यानंतर आज शिवसेना शिंदे गटाने सुप्रीम कोर्टात आपली बाजू मांडली. दरम्यान या सुनावणीपूर्वी पार पडलेल्या पत्रकार परिषदेमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राउत यांनी शिवसेना शिंदे गट आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार टीका केली होती. जिथे शिंदे तिथे सौदा अशी नवी डिक्शनरी आता येत आहे, असा घणाघात राउत यांनी केला होता, दरम्यान त्यानंतर आता संजय राउत यांच्या या टीकेला शिवसेना शिंदे गटाचे खासदार संजय शिरसाट यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. त्यांनी शिवसेना ठाकरे गटावर जहरी टिका केली आहे.

आम्ही सर्व नियम पाळले आहेत,



घटनेत जी तरतूद केलीये त्या सगळ्या गोष्टींचं आम्ही पालन केलं आहे. खासदार, आमदार, नगरसेवक, जिल्हाप्रमुख यांचा सगळा डाटा आम्ही निवडणूक आयोगाला दिला आहे. कार्यकर्त्यांची नोंदणी त्यांच्याकडे नव्हती. सुप्रीम कोर्टात देखील निवडणूक आयोगाने जो निकाल दिला त्यावरुन निर्णय घेईल, असं संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे. दरम्यान एकनाथ शिंदे म्हणजे सौदा अशी टीका राउत यांनी केली होती, या टीकेला प्रत्युत्तर देताना संजय शिरसाट यांनी वादग्रस्त टीका केली आहे.

एकनाथ शिंदेंना सौदा म्हणता मग तुम्ही ज्यांच्या शासनावर शिवसेना झोपवली तुम्हाला वेश्या म्हणावं का? तुम्ही सिल्व्हर ओकला शिवसेना झुकविली, तुम्हाला समान आर्थी शब्द वेश्या, अशी वादग्रस्त टिका यावेळी शिरसाट यांनी संजय राउत आणि शिवसेना ठाकरे गटावर केली आहे. दरम्यान यामुळे आता नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. संजय शिरसाट यांच्या या टीकेला आता शिवसेना ठाकरे गटाकडून काय प्रत्युत्तर मिळणार हे पहाणं महत्त्वाचं ठरणार आहे.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

### आयआयएमसीच्या विद्यार्थ्यांच्या प्रायोगिक वृत्तपत्राचे डॉ. मुळे यांच्या हस्ते प्रकाशन

# पत्रकारितेचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी गाव व ग्रामीण भाग समजून घ्यावा





## -माहिती संचालक डॉ. गणेश मुळे

**अमरावती/प्रतिनिधीः-**
पत्रकारितेत बातमी, फिचर,लेख, संपादन आदी बाबी अधिक चांगल्या आत्मसात करण्यासाठी विद्यार्थ्यांनी गाव व तेथील संस्कृती, समाजकारण अशा सर्व बाबी समजून ग्रामीण भागाचा अभ्यास करावा, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाच्या नागपूर-अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे यांनी आज येथे केले.

येथील भारतीय जनसंचार संस्थेत (आयआयएमसी) डॉ.मुळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यावेळी ते बोलत होते. आयआयएमसीचे क्षेत्रिय संचालक डॉ. राजेशसिंह कुशवाह, जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार, माहिती अधिकारी रितेश भुयार, आयआयएमसीचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. विनोद निताळे, शैक्षणिक सहशिक्षण सहयोगी जयंत सोनोने आणि रोहण तायडे यावेळी उपस्थित होते.



संचालक डॉ. मुळे म्हणाले, गाव हा देश व विकासाचा केंद्र बिंदू आहे. त्यामुळे गावाचा परिसर तेथील संस्कृती, समस्या, पर्यावरण त्याला जोडून तेथील समाजकारण आणि राजकारण अशा सर्व बाबी पत्रकारितेचे शिक्षण घेतानाच विद्यार्थ्यांनी समजून घेतल्या पाहिजे. गाव व ग्रामीण भागाचा चांगला अभ्यास केल्यानंतर तालुका, जिल्हा, राज्य आणि देश समजू शकतो व पत्रकारितेतील बातमी, फिचर, लेख, संपादन आदी विषय समजू शकतात. वाचन, मनन आणि चिंतनाच्या त्रिसुत्रीचे महत्वही त्यांनी यावेळी अधोरेखित केले. प्रभावी शासकीय जनसंपर्क, त्याची विविध साधने आणि बदलत्या काळातील जनसंपर्क त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून समजावून सांगितला.

विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची त्यांनी उदाहरणासह उत्तरे दिली. तत्पूर्वी, इंग्रजी पत्रकारिता पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'द पब्लिक एँगल'या प्रायोगिक वृत्तपत्राचे डॉ.मुळे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. डॉ. मुळे आज अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी जिल्हा माहिती कार्यालयाला भेट दिली. त्यानंतर जिल्हा मराठी पत्रकार संघ, श्रमीक पत्रकार संघाला भेट देवून त्यांनी पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली.

# शाळकरी मुलीचा पाठलाग करणाऱ्या मजनूवर पोक्सोचा गुन्हा

**अचलपूर/प्रतिनिधीः-**
परतवाडा शहरातील एका शाळकरी मुलीचा सतत पाठलाग करून तिला मानसिक त्रास देणाऱ्या एका टवाळखोर मजनूचा प्रताप समोर आला आहे. शेख अमीन शेख अकबर (वय २२, रा. शेखपुरा, परतवाडा) असे याप्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.

३० ऑगस्ट रोजी त्याच्याविरुद्ध विनयभंग व पोक्सोचा गुन्हा नोंदवून त्याला अटक करण्यात आली.परतवाडा पोलिस स्टेशन मध्ये नोंदविण्यात आलेल्या एफआयआरनुसार, आरोपी हा फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीच्या सतत मागे लागायचा आणि पाठलाग करायचा. तो तिला चिठ्ठी देऊन तिचा छळ करायचा, एवढेच नव्हे तर, हा तरुण रोज शाळेसमोर उभा राहून मुलीची वाट पाहत असे आणि ती शाळेत जात असताना तिचा रस्ता अडवून पाठलाग करत असे. शाळा सुटल्यानंतर गेटवर थांबणे आणि मुलीला बळजबरीने बोलवण्याचा प्रयत्न करण्याचे प्रकार त्याने चालवले होते. आरोपीने मुलीच्या आईच्या इन्स्टा आयडीवर देखील मेसेज केले. तो पीडितेला देखील बोलायला बळजबरी करत होता.

या सर्व त्रासाला कंटाळून मुलीच्या पालकांनी थेट आरोपीचे घर गाठले आणि त्याच्या आईला भेटून त्याच्या वागणुकीत सुधारणा करण्यास सांगितली. त्याला समजदेखील दिली. दरम्यान माझ्या मुलीचा पाठलाग का करतो, अशी विचारणा करून फिर्यादीने आरोपीला त्याचा मोबाइल मागितला असता, तो इन्स्टाग्रामवरील मेसेज डिलीट करून तिथून पळून गेला. अखेर पालकांच्या फिर्यादीवरून परतवाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# अचलपूर नगराध्यक्ष रुपाली माथने यांची नगर परिषद मराठी व उर्दू शाळेला भेट



**अचलपूर/प्रतिनिधीः-**
अचलपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी परतवाडा शहरातील नगर परिषद मराठी व उर्दू शाळेला भेट दिली.यावेळी नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.शाळेतील कार्यालय ,वर्ग आणि परिसराची पाहणी सुद्धा त्यांनी केली आणि विद्यार्थ्यांची सुरक्षा ,शिक्षण , सुविधा बाबत आढावा सुद्धा त्यांनी संबंधित अधिकाऱ्याकडून घेतला .यामध्ये परतवाडा शहरातील नेहरू मैदान येथील नगर परिषद मराठी शाळा ,म्युनिसिपल हायस्कूल,नगर परिषद उर्दू शाळेचा समावेश आहे. यावेळी संबंधित शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षक वृंद उपस्थितीत होते.

## १ व १० वरिल उर्वरित

### ५८ लाख कुणबी

याचिका दाखल केली होती. पण फडणवीस आणि शिंदे सरकार पाठीशी आहे. साठे साहेब राज्याचे AG आहेत. हैदराबाद गॅझेट साठी आपण त्यांना उभं केलं आहे. शिवाजी महाराजांची शपथ घेउन सांगतो की हे रद्द होउ देणार नाही.

### पोटच्या मुलांनीच वृद्ध आई-वडिलांना

यांच्या पाठीवर, चेह-यावर, मांडीवर आणि डाव्या खांद्यावर गंभीर दुखापत झाली आहे. तर मध्ये पडलेल्या वृद्ध आणि आजारी आई अंजना यांच्या ऊजव्या हाताच्या मनगटावर आणि कमरेवर काठीने जोरदार प्रहार करण्यात आले. विकलेली जमीन ताबडतोब परत घ्या, नाहीतर आम्ही काय करू शकतो हे दाखवून देउ, अशी धमकी देत मुलांनी दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**इंदापूर पोलिसांत गुन्हा दाखल-** रस्त्यावर सुरू असलेला हा प्रकार पाहून स्थानिक नागरिक मदतीसाठी धावून आले आणि त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. इंदापूर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून जखमी वृद्ध दांपत्याला तातडीने इंदापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तुकाराम राउत यांच्या तक्रारीवरून इंदापूर पोलीस ठाण्यात संजय राउत आणि राजेंद्र राउत या दोन्ही भावांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही मुले इंदापूरमधील माळवाडी नंबर २ येथे आपल्या कुटुंबासह वेगळी राहतात. धोकादायक शस्त्रांनी मारहाण करणे, शांततेचा भंग करणे आणि जीवे मारण्याची धमकी देणे या कलमांखाली पोलीस पुढील कारवाई करत आहेत.

### थायलंडने भारतीयांची

प्रवेशाची सुविधा मोठ्या प्रमाणावर वाढवली होती. त्यावेळी ९३ देश आणि प्रदेशांतील नागरिकांना ६० दिवसांपर्यंत व्हिसाशिवाय थायलंडमध्ये राहण्याची परवानगी देण्यात आली होती. भारताचाही या यादीत समावेश करण्यात आला होता. पर्यटनासोबत काही व्यावसायिक कामकाज आणि काही तातडीच्या कामांसाठीही या व्यवस्थेचा वापर करता येत होता. परिस्थितीनुसार आणखी ३० दिवसांची मुदतवाढ देण्याचा अधिकार स्थलांतर अधिका-यांकडे होता.

### देशातील छोट्या व्यापा-यांना

करून किंवा इतरांच्या नावाने व्यापारी खाते उघडतात. री-केवायसीच्या माध्यमातून क्यूआर कोडच्या मागे असलेला दुकानदार किंवा व्यापारी खरोखर कोण आहे, याची पडताळणी करण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे बनावट व्यापारी खाती ओळखण्यास आणि त्यांच्यावर कारवाई करण्यास मदत होउ शकते. त्याचबरोबर ऑनलाइन फसवणूक आणि मनी लान्ड्रिंगसारख्या गैरप्रकारांनाही आळा घालण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. सध्या ऑनलाइन फसवणुकीच्या अनेक घटनांमध्ये स्कॅमर नागरिकांकडून पैसे एखाद्या अनोळखी व्यापा-याच्या दफ कोडवर ट्रान्सफर करून घेतात. अशा परिस्थितीत व्यापा-याची ओळख स्पष्ट असणे महत्त्वाचे ठरते. री-केवायसीच्या माध्यमातून व्यापा-याची ओळख आणि संबंधित कागदपत्रांची पडताळणी केली जाते. त्यामुळे दफ कोडशी संबंधित व्यापा-याची माहिती अधिक व्यवस्थितपणे पडताळता येण्याची शक्यता आहे.

**सेन्ट्रल केवायसीमुळे काय फायदा?**

यापूर्वी वेगवेगळे पेमेंट प्लॅटफ?र्म किंवा वित्तीय संस्था व्यापा-यांची केवायसी प्रक्रिया स्वतंत्रपणे करत असल्याने माहितीमध्ये तफावत राहण्याची शक्यता होती. सेन्ट्रल केवायसी व्यवस्थेमुळे व्यापा-याची डऊमाहिती केंद्रीय रजिस्ट्रीमध्ये ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे एकदा व्यापा-याची माहिती पडताळल्यानंतर संबंधित केवायसी डेटा विविध वित्तीय संस्थांना उपलब्ध होण्यास मदत होउ शकते. यामुळे केवायसी प्रक्रिया अधिक सुसंगत आणि पारदर्शक होण्याची अपेक्षा आहे.

### गणेशोत्सवात शांतता, स्वच्छता

धर्मादाय आयुक्त कार्यालयाची आवश्यक ऑनलाइन परवानगी घेणे बंधनकारक असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. तसेच मंडप उभारताना रस्त्यावरील वाहतुकीला अडथळा होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. मूर्तीची उंची आणि मंडपाचा आकार मर्यादित ठेवणे, मंडप व मूर्तीच्या सुरक्षेची जबाबदारी मंडळ पदाधिकाऱ्यांनी स्वीकारणे, सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे आणि आवश्यकतेनुसार सुरक्षा रक्षक नेमणे, असे निर्देश देण्यात आले. पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची स्थापना करून पूजेचे साहित्य व निर्माल्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावावी, असे आवाहनही करण्यात आले. धार्मिक उत्सवाच्या काळात ज्वलनशील पदार्थ, शस्त्रे, काठ्या, आक्षेपार्ह गीते किंवा देखावे यांचा वापर टाळावा तसेच ध्वनीप्रदूषणासंदर्भातील नियमांचे काटेकोर पालन करावे, अशा सूचना देण्यात आल्या. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसह महिला व मुलींच्या सुरक्षेकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले असून, मंडप परिसरात कोणतेही गैरकृत्य घडणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अफवांवर विश्वास न ठेवता नागरिकांनी कोणत्याही प्रकारे कायदा हातात घेऊ नये, असेही पोलीस आयुक्तांनी स्पष्ट केले. संशयास्पद व्यक्ती अथवा वस्तूबाबत माहिती मिळाल्यास तत्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी किंवा पोलीस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. या बैठकीला महानगरपालिका, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ, अन्न व औषध प्रशासन, अग्निशमन विभाग, प्रादेशिक परिवहन विभाग, आरोग्य विभाग तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे अधिकारी उपस्थित होते. पोलीस विभागातील सर्व पोलीस उपायुक्त, अधिकारी आणि विविध पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारीही बैठकीस उपस्थित होते.

अमरावतीकरांनी यापूर्वीही विविध सण-उत्सवांच्या काळात जातीय सलोखा आणि सामाजिक एकोपा कायम ठेवून पोलीस प्रशासनाला सहकार्य केले आहे. आगामी दहीहंडी, पोळा, गणेशोत्सव व इतर धार्मिक सणांच्या काळातही नागरिकांनी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी केले. त्यांनी सर्व अमरावतीकरांना आगामी सण-उत्सवांच्या शुभेच्छाही दिल्या.

### हातात खंजीर घेऊन फिरणारा

माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी मोशीकॉल जीन परिसरात सापळा रचला.

पोलिसांना संशयित इसम सार्वजनिक ठिकाणी हातात खंजीर घेऊन दहशत निर्माण करताना आढळून आला. पोलिसांनी तातडीने त्याला ताब्यात घेत झडती घेतली असता त्याच्याकडून अंदाजे १ हजार २०० रुपये किमतीचा लोखंडी खंजीर जप्त करण्यात आला. तडीपारीचा आदेश असतानाही प्रतिबंधित क्षेत्रात वावरत शस्त्र बाळगल्याप्रकरणी सुरज इंगोलेविरुद्ध गाडगेनगर पोलिस ठाण्यात शस्त्र अधिनियमाच्या कलम ४/२५ सह महाराष्ट्र पोलिस कायद्यातील कलम १४२, १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई एपीआय महेश इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय सुंदरकर, लासूरकर, पोलीस हेड कॉन्स्टेबल सचिन बहाळे, झहीर शेख आणि राजिक शेख यांच्या पथकाने केली.

### सराईत वाहनचोरांच्या टोळीचा

बाळकृष्ण वैद्य यांची हिरो स्प्लेंडर प्लस दुचाकी राजापेठ बसस्थानक परिसरातून चोरीला गेली होती. याप्रकरणी १ सप्टेंबर रोजी राजापेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा माग काढण्यात आला. या प्रकरणात वसीम खान बब्बू खान (४०, रा. हैदरपुरा), शेख इरफान ऊर्फ भुऱ्या शेख मन्सूर (३६, रा. सादियानगर, हैदरपुरा) आणि सद्दाम अली फैयाज अली (३५, रा. बिस्मिल्ला नगर, लालखडी रोड) यांना अटक करण्यात आली. तपासात आरोपींकडून हिरो स्प्लेंडर, स्प्लेंडर प्लस, एचएफ डिलक्स, पॅशन, युनिकॉर्न, हंक, ॲक्टिव्हा, डिस्कव्हर आदी दुचाकी हस्तगत करण्यात आल्या. यातील काही वाहने फ्रेजरपुरा व राजापेठ पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्यांशी संबंधित असल्याचे पोलिस तपासात समोर आले. तसेच राजापेठ पोलिस ठाण्यातील चार गुन्ह्यांमध्ये चोरी झालेल्या वाहनांचे पार्टस्?ही जप्त करण्यात आले आहेत. ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त श्याम घुगे व सहायक पोलिस आयुक्त संजय खटाळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण, पोलिस निरीक्षक उमेश मुंढे, सपोनि नितीन शिंदे व डीबी पथकाने केली. पुढील तपास सुरू आहे.

### टिंगल करण्यावरून झालेल्या

बसले असताना, आरोपी गोपाल शिंदे आणि राजू लक्ष्मण शिंदे तिथे आले. आरोपी गोपाल शिंदे याने नारायण जाधव यांची टिंगल केली, तर आरोपी राजू शिंदे याने त्यांना शिवीगाळ केली. या वादातून नारायण जाधव हे पायरीखाली आले असता, आरोपी गोपाल शिंदे याने त्यांना जमिनीवर खाली आपटले आणि तोंडावर बुक्क्या मारल्या. एवढ्यावरच न थांबता, त्यांच्या जवळील लाकडी काठीने जिवे मारण्याच्या उद्देशाने नारायण जाधव यांच्या डोक्यात जोरदार प्रहार केला. या हल्ल्यात ते बेशुद्ध होऊन खाली पडले. त्यांना उपचारासाठी दाखल केले असता, डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी खून व ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल केला होता. तत्कालीन सहायक पोलिस आयुक्त जयदत्त भवर यांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. खटल्या दरम्यान एकूण १२ साक्षीदार तपासण्यात आले. सुनावणी अंती न्यायालयाने पुरावे ग्राह्य धरत आरोपी गोपाल शिंदे याला खून व ॲट्रॉसिटी अन्वये दोषी ठरवत जन्मठेप व प्रत्येकी दोन हजार रुपये दंड, तसेच दंड न भरल्यास दोन महिने सक्त मजुरीची शिक्षा सुनावली. मात्र, या प्रकरणातील आरोपी राजू लक्ष्मण शिंदे याला पुराव्या अभावी निर्दोष सोडण्यात आले. सरकारी पक्षातर्फे सहायक सरकारी वकील ॲड. प्रशांत देशमुख यांनी युक्तिवाद केला. त्यांना एएसआय दिलीप सावरकर आणि कोर्ट पैरवी म्हणून हवालदार अरुण हटवार यांनी सहकार्य केले.

### दसरा मैदानातील खूनप्रकरणी

मारहाण केली आणि जवळील लाकडी काठीने त्यांच्या डोक्यावर प्रहार केला. गंभीर जखमी होऊन जाधव बेशुद्ध पडले. उपचारासाठी त्यांना रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. घटनेनंतर राजापेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलिस आयुक्त जयदत्त भवर यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सुनावणीदरम्यान सरकार पक्षाने १२ साक्षीदार तपासले. तोंडी व कागदोपत्री पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने गोपाल शिंदे याला दोषी ठरवले. कलम ३०२ अंतर्गत जन्मठेपेसह दोन हजार रुपये दंड, दंड न भरल्यास दोन महिने सश्रम कारावास, तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील संबंधित कलमान्वयेही जन्मठेप व दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता ॲड. प्रशांत देशमुख यांनी युक्तिवाद केला. एएसआय दिलीप सावरकर व कोर्ट पैरवी पोलीस हेड कॉन्स्टेबल अरुण हटवार यांनी सहकार्य केले.

### शिरलस शिवारात वाघाने केली

घटनेमुळे कवठाळ, भांबोरा, राजुरवाडी, नेहरपिंगळाई व शिरलस परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रणित महादेवराव मावळे यांच्या शेतात गायींचा गोठा आहे. सकाळी गोठ्यात गेल्यानंतर त्यांना वासराची शिकार झाल्याचे आढळून आले. त्यांनी तत्काळ वनविभागाला दूरध्वनीवरून माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.

वनविभागाचे पथक गेल्या सात दिवसांपासून या वाघाचा मागोवा घेत आहे. परिसरात रात्रंदिवस गस्त घालून वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवले जात आहे. मात्र अद्याप वाघाचे ठोस दर्शन झालेले नसल्याने नागरिकांची चिंता कायम आहे. काही दिवसांपूर्वी कवठाळ शिवारातही गाईची शिकार झाल्याने वाघ आता शिरलस व नेहरपिंगळाई परिसरात फिरत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**शेतात जाण्यास शेतकऱ्यांचा नकार-** वाघाच्या सततच्या हालचालींमुळे शेतकरी व शेतमजूर शेतात जाण्यास धजावत नाहीत. गेल्या दोन दिवसांपासून अनेक शेतांमधील कामे ठप्प झाली असून शेतमजुरांच्या रोजगारावरही परिणाम झाला आहे. पिकांची कामे रखडल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

वनविभागाचे पथक वाघाचा शोध घेत असले तरी अद्याप त्याचा बंदोबस्त झालेला नाही. त्यामुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे. वाघाला तातडीने जेरबंद करावे, गावांमध्ये गस्त वाढवावी आणि शेतकरी व शेतमजुरांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

### कोणार्कचा ठेका रद्द, हायकोर्टाच्या

सौम्या शर्मा चांडक यांनी अत्यंत घाईगडबडीत कोणार्क कंपनीला सात वर्षांसाठी शहरातील साफसफाई, घराघरातून कचरा संकलन आणि कचरा वाहतुकीचा ठेका दिला होता. त्यावेळी मनपा निवडणुका पार पडल्या होत्या आणि नवीन सभागृह अस्तित्वात येणार होते. मात्र, निवडून आलेले लोकप्रतिनिधी सभागृहात येण्यापूर्वीच संपूर्ण प्रक्रिया अंतिम करण्यात आली. त्यामुळे सुरुवातीपासूनच या संपूर्ण प्रक्रियेवर संशय निर्माण झाला होता, असे त्यांनी म्हटले.

अनिल अग्रवाल यांनी सांगितले की, २८ फेब्रुवारी रोजी झालेल्या मनपाच्या पहिल्या विशेष आमसभेत त्यांनी कोणार्क कंपनीला देण्यात आलेल्या ठेक्याच्या प्रक्रियेवर गंभीर आक्षेप नोंदवून निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला होता. एका कंपनीला तब्बल सात वर्षांसाठी एवढा मोठा संयुक्त ठेका का देण्यात आला, असा प्रश्नही त्यांनी त्यावेळी उपस्थित केला होता. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रशासनाकडे या प्रश्नाचे कोणतेही समाधानकारक उत्तर नव्हते. याच मुद्द्यावरून सभागृहात झालेल्या तीव्र विरोधानंतर सर्वपक्षीय स्वच्छता अभ्यास समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

ते म्हणाले की, आता हायकोर्टाने निविदा प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेला पुढे नेणाऱ्या सर्वांची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. केवळ ठेका रद्द करणे पुरेसे नाही, तर दोषींवरही कठोर कारवाई होणे आवश्यक आहे.

नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी विद्यमान मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक करताना सांगितले की, ते प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी आणि व्यवस्था सुधारण्यासाठी प्रयत्नशील आहेत. न्यायालयाच्या निर्णयानंतर आयुक्त गोंदावले या संपूर्ण प्रकरणाचा निष्पक्ष आढावा घेऊन दोषी अधिकारी व संबंधित व्यक्तींवर कायदेशीर तसेच प्रशासकीय कारवाई सुनिश्चित करतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

### उपमहापौर सचिन भेंडे यांच्यासह

तक्रार महानगर पालिकेच्या वतीने सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. पोलिसांनी त्या आधारे कलम ३५३, १८६, १४८, १४३, १८८, ३२३, ३४ अन्वये आणि कलम १३५, १३२, १२९ अंतर्गत सचिन भेंडे आणि इतर कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल केला होता. आरोपींमध्ये गणेश मोरोडकर, पराग चिमोटे, अभिजीत देशमुख, नीलेश भेंडे, अनूप अग्रवाल, सद्दाम हुसेन, गौतम हिरे, रवि अडोकार, विलास बोबडे, नितेश तायडे, अंकुश ठाकरे यांचा समावेश होता. या प्रकरणाची चौकशी करून कोतवाली पोलिसांनी न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. अभियोजन पक्षाच्या वतीने असा आरोप करण्यात आला की, आरोपी सचिन भेंडे आणि इतरांनी सरकारी कामात अडथळा आणला आणि कायदेशीर रित्या जमलेल्या सभेत शांतता भंग केली. सुरक्षा गार्ड सोबत धक्का बुक्की आणि मारहाण केली. यामुळे मनपाची आमसभा स्थगित करावी लागली. त्याच प्रकारे अभियोजन पक्षाने कोर्टात ७ साक्षीदार हजर केले, परंतु बचाव पक्षाचे वकील एड. दीप मिश्रा यांनी युक्तिवाद केला. अभियोजन पक्ष न्यायालयात आरोप सिद्ध करू शकला नाही की, हेच ते लोक आहेत ज्यांनी मनपाच्या आमसभेत उपद्रव केला होता. आरोपींची ओळख पटवण्याचा विषय उपस्थित करण्यात आला. या आधारावर न्यायालयाने सर्व आरोपींना निर्दोष ठरवले.एड. दीप मिश्रा यांना एड. चंद्रसेन गुळसुंदरे, एड. रोहिणी तोंडरें यांनी सहकार्य केले.

**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI.**
No. SGBAU/8/C-1642/2026 Date-20/7/2026.

**WANTED**

Name Of Society :- **Loksewa Mandal Narvel, Tq.Malkapur, Dist. Buldana.**
Name of College :- **Dadasaheb Dhanaji Nana Chaudhari Social Work College** Malkapur Dist. Buldana.

Applications are invited for Full Time Regular Posts as per following details in the faculty of Science & Technology / Humanities / Commerce & Management / Interdisciplinary Studies.

**Vacancies for Grant-in-aid Courses/Programmes**

| Sr. No. | Name of the Post | Subject/ Course | No. of Post | Categary as per NOC on dt. 19-06-2026. |
|---|---|---|---|---|
| 01. | Principal | ---- | 01 | Open |

[illegible]
For qualifications/Experience/Pay Scale and other details/conditions visit university website www.sgbau.ac.in and College website www.ddnc.in
Application on plain paper giving complete Biodata along with attested copies of all certificates and testimonials should be sent to the principal, Dadasaheb Dhanaji Nana Chaudhari Social Work College, Malkapur Dist-Buldana Pin-443101 Post box No. 35, within 15 days form the date of publication of advertisement. Interview letter will be sent separately.

**President/Secretary**
**Loksewa Mandal Narvel**

**जाहिरनामा / सायटेशन**

दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती.
वि. श्री. एस. एम. भिंगारडे ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

[illegible]

Applicant
Sau. Leena Chetan Singh Ghuge @ Leena Do. Tanaji Jadhav
[illegible]

Versus

Non-Applicant NIL

[illegible] APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE [illegible]

[illegible]

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# मोहता मीलमधील जबरी चोरीचा ४८ तासांत 'गेम ओव्हर' !

## ११० हून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासले; हैदराबादच्या लॉजमधून मुख्य संशयित जेरबंद, ३३.६२ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

■ प्रतिनिधी | अकोला ■

**मोहता मील परिसरात वृद्ध दाम्पत्याला लोखंडी कोयत्याचा धाक दाखवून, मारहाण करून हातपाय बांधत लाखोंचा ऐवज लुटणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या ४८ तासांत माग काढला. तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी अकोला शहरातील ११० हून अधिक सीसीटीव्ही फुटेज खंगाळले आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपासाची दिशा निश्चित केली. या प्रकरणातील एका आरोपीला थेट हैदराबादमधील लॉजमधून ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून सोन्याचे दागिने आणि रोख रकमेसह ३३ लाख ६२ हजार १५५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**



३१ ऑगस्ट रोजी सकाळच्या सुमारास मोहता मील रोडवरील चिरणिया कम्पाऊंडसमोर असलेल्या ढेपेच्या गोदामात विजयकुमार रामकरणदास गुप्ता (६७) हे काम करीत होते. याचवेळी काही इसम गोदामात शिरले. त्यांनी गुप्ता आणि त्यांच्या पत्नीला लोखंडी कोयत्याचा धाक दाखवून मारहाण केली. त्यानंतर दोघांचे हातपाय बांधून कपाटातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा अंदाजे २६ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज घेऊन पोबारा केला. घटनेने परिसरात खळबळ उडाली. रामदासपेठ पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५१६/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम ३(५), ३०९(६) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी आरोपींचा तातडीने शोध घेऊन चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्याचे निर्देश स्थानिक गुन्हे शाखेला दिले. पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांनी तपासाची सूत्रे हाती घेत तीन स्वतंत्र पथके तयार केली. पथकांनी अकोला शहरासह विविध मार्गांवरील ११० पेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. संशयितांच्या हालचाली, प्रवासाचा मार्ग आणि संपर्क यांचा तांत्रिक पद्धतीने मागोवा घेण्यात आला. त्याचवेळी गोपनीय बातमीदारांचे जाळेही सक्रिय करण्यात आले.

### 'घरचा भेदी' संशयाच्या रडारवर

तपासाची दिशा बदलणारी महत्त्वाची माहिती पोलिसांच्या हाती लागली. फिर्यादीच्या दुकानात मागील चार वर्षांपासून काम करणाऱ्या सलीमखान गुलखान (रा. मुजफ्फरनगर, नया बैदपुरा, अकोला) याच्या हालचाली घटनेच्या वेळच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये संशयास्पद आढळल्या. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने मोहम्मद रफीक मोहम्मद हमजा ऊर्फ राजा ऊर्फ गंगा आणि अन्य एका साथीदारासोबत कट रचल्याची माहिती दिल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. त्याच्या चौकशीतून मुख्य आरोपीपर्यंत पोहोचण्याचा मार्ग मोकळा झाला.

### अकोल्यातून थेट हैदराबादपर्यंत पाठलाग

मुख्य आरोपी चोरीचा मुद्देमाल घेऊन हैदराबादकडे गेल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक अनिल चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पथकाने विलंब न करता हैदराबाद गाठले. तेथेही तपासाची दिशा सीसीटीव्ही आणि तांत्रिक विश्लेषणावरच ठेवण्यात आली. विविध लॉज तपासल्यानंतर आरोपी एका लॉजमध्ये लपून बसल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तत्काळ छापा टाकून मोहम्मद रफीक मोहम्मद हमजा ऊर्फ राजा ऊर्फ गंगा याला ताब्यात घेतले.

### २०८.९३७ ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त

आरोपीकडून २०८.९३७ ग्रॅम पिवळ्या धातूचे दागिने आणि २ लाख २८ हजार १०० रुपये रोख असा एकूण ३३ लाख ६२ हजार १५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चोरीतील काही मुद्देमाल अन्य एका अनोळखी साथीदाराने नेल्याची माहिती आरोपीने दिल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. त्यामुळे या प्रकरणातील दुसऱ्या आरोपीचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेची पथके कामाला लागली आहेत.

### यांनी केली कारवाई :

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक व अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, सहायक पोलीस निरीक्षक गोपाल जाधव, पोलीस उपनिरीक्षक अनिल चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. पथकात पोलीस अंमलदार शेख हसन, फिरोजखान, वसीमोद्दीन, भारकर धोत्रे, किशोर सोनुने, अब्दुल माजिद, सुलतान पठाण, महेंद्र मलीये, रवि खंडारे, खुशाल नेमाडे, मंगेश इंगळे, श्रीकांत पातोंड, धिरज वानखडे, आकाश मानकर, अभिषेक पाठक, मोहम्मद आमीर, अशोक सोनवणे, सतीश पवार, तसेच चालक विनोद ठाकरे व प्रकाश लोखंडे यांचा समावेश होता.

# कारंजा तालुक्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती

## हेक्टरी १लाख रुपये मदत देण्याची मागणी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

कारंजा तालुक्यात मागील एक महिन्यापासून पावसाचा खंड पडल्यामुळे दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. खरिपाची पिकं पूर्णतः सुकून गेली असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालं आहे. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत जाहीर करावी या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष दामूअण्णा इंगोले आणि हर्षद पारे यांनी येवता परिसरात स्वतःला जमिनीत गाडून घेत आंदोलन केले.

कारंजा तालुक्यासाठी संपूर्ण ऑगस्ट महिना कोरडा गेला असून २०३ मिलिमिटर पाऊस अपेक्षित असतांना केवळ १५ मिलमीटर पाऊस झाला आहे. हा पाऊस सरासरीच्या केवळ ७ टक्के इतका आहे. तालुक्यातील सहाही मंडळात पावसा अभावी सोयाबीन, तूर, कापूस सर्वच पिकं वाळून गेले आहेत. याचा सर्वाधिक फटका कमरगाव मंडळाला बसला असून या मंडळात केवळ २ मिलिमिटर पावसाची नोंद झाली आहे. मात्र इतकी गंभीर परिस्थिती असतांनाही प्रशासनाकडून अद्याप कोणतेही पावलं उचलली गेली नाहीत त्यामुळे संतप्त झालेल्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांडून स्वतःला जमिनीत गाडून घेत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. कारंजा तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये मदत द्यावी.

# ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर प्राचार्य प्रवेश खडसे सेवानिवृत्त



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम येथील रेखाताई राष्ट्रीय महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रवेश जयराम खडसे हे ३१ ऑगस्ट २०२६ रोजी ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त महाविद्यालयात भावुक वातावरणात निरोप व सत्कार समारंभ पार पडला.

यावेळी पंचशील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य खडसे तसेच त्यांच्या पत्नी जोशना खडसे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थिनींनी प्राचार्य खडसे यांच्या प्रदीर्घ सेवाकाळातील योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य खडसे यांनी महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी आणि सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार मानले. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या प्रसंगी उपस्थितांनी त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप भांदुर्गे यांनी केले, तर जी. सी. लादे यांनी आभार मानले. विद्यार्थिनींना फराळाचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# एमपीएससी परीक्षेद्वारे निवड झालेल्यांचा सत्कार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक संतोषीमाता नगर मधील अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालय वाशीम येथे महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या एमपीएससी परीक्षेमध्ये उत्तीर्ण होवून वेगवेगळ्या पदाला गवसणी घालणाऱ्यांचा आंबेडकरी समाजाच्या दि.१ सप्टेंबर २०२६ रोजी जाहीर सत्कार करण्यात आला आहे.

यामध्ये फाळेगांव थेट येथील नामांतर सोनोने यांची एमपीएससी परीक्षेद्वारे सर्वसाधारण प्रवर्गातून उप अभियंता यांत्रिकी उपविभाग पाणीपुरवठा जिल्हा परिषद वाशीम तर एकबुर्जी येथील कु.प्रज्ञा अंबादास सरकटे यांची सहाय्यक कर निरीक्षक पदाला गवसणी घातली आहे.

यावेळी सत्कार कार्यक्रमांचे अध्यक्षस्थानी डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान तर से.नि.उप मुख्य कार्यकारी अधिकारी विलास खिल्लारे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक विनोद पट्टेबहादूर, सरपंच संघटनेचे विभागीय अध्यक्ष प्रविण पट्टेबहादूर, से.नि.केंद्रप्रमुख उंदरे व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार यांची उपस्थिती होती. सुरवातीला उपस्थित मान्यवरांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले.नंतर सत्कारमूर्ती नामांतर सोनोने उप अभियंता यांत्रिकी उपविभाग ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद वाशीम, सहाय्यक कर निरीक्षक कु.प्रज्ञा अंबादास सरकटे यांचा वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार व उपस्थित मान्यवरांनी शाल, पुष्पगुच्छ व भारतीय संविधान देवून सत्कार करण्यात आला.नंतर कार्यक्रमांचे प्रमुख उपस्थिती असलेले से.नि.उपमुख्य कार्यकारी अधिकारी विलास खिल्लारे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, नामांतर सोनोने व कु.प्रज्ञा सरकटे यांनी मिळविलेले यश म्हणजे समाजासाठी व आपल्या मुलांना प्रेरणादायी आहे.पालकांनी आपल्या मुलांवर चांगले संस्कार घालावे, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या शिका संघटीत व्हा व संघर्ष करा या प्रमाणे पहीले शिक्षण घेतले पाहिजे.हे युग स्पर्धेचे आहे.त्यासाठी वाचन महत्वाचे आहे.वाचन केल्यानेच नामांतर सोनोने व प्रज्ञा सरकटे यांनी यश मिळवून आपल्या जिल्ह्याचा सन्मान केला आहे.



तर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांनी सांगितले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की,आप आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा की शासन कर्ती जमात बनायची.आणि त्याचीच फलश्रुती म्हणून नामांतर सोनोने व प्रज्ञा सरकटे यांनी अभ्यास करून शासन कर्ती जमातीला गवसणी घातली आहे.त्यासाठी त्यांनी आपल्या पदाचा वापर हा समाजाच्या उन्नतीसाठी करावा.

# क्षयरोग, एड्स तपासणी शिबीर



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दि.२ सप्टेंबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र शिरपूर येथे जिल्हा क्षयरोग केंद्र वाशीम मार्फत फिरते क्ष किरण वाहनाचे डिजीटल एक्स रे मशिनद्वारे संशयित क्षय रुग्णांची एक्स रे तपासणी करण्यात आली.

यावेळी वैद्यकिय अधिकारी डॉ संतोष बोरसे यांचे मार्गदर्शनाखाली क्ष किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी ७५ संशयिताचे एक्स रे काढले.यावेळी उपस्थित डॉ शुभांगी मोळे, गीता देशमुख, निशिगंधा काळे, अर्चना पांडे, सीताराम लाखाडे, भास्कर गुढदे, सरस्वती घोरसळ, सुरेखा मोरे ,सर्व आरोग्य सेवक, दीपिका उमरे, ओम भाटुडकर, विलास कळमकर, गणेश राऊत, प्रशांत तूरक, तसेच आशा कार्यकर्ती उपस्थित होत्या.यावेळी ६० संशयितांचे स्पुटम गोळा केले.लिंक वर्कर प्रशांत सुर्वे, बंडू सूर्य यांनी ६० व्यक्तीची एच आय व्ही तपासणी केली.शिबीराचे नियोजन जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी केले.सर्व उपस्थितांना क्षयरोग, डेंगू, एड्स बाबत आरोग्य शिक्षण देण्यात आले.

# इनरव्हील क्लब ऑफ वाशिमतर्फे क्रीडा दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय मेजर ध्यानचंद यांच्या स्मरणार्थ क्रीडा स्पर्धांचे आयोजन इनरव्हील क्लब ऑफ वाशिम तर्फे करण्यात आले. इनरबीएल इनरव्हील क्लब ची थीम तरुण मुलींचा फिटनेस त्यांना खेळात प्रोत्साहन देणे हा असल्या मुळे या स्पर्धेत येत आहेत असे इनर व्हील क्लब ऑफ वाशिम च्या अध्यक्षा रुचिका विसपुते यांनी सांगितले.मेजर ध्यानचंद यांच्या फोटोचे पूजन आणि हारअर्पण महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉक्टर संजय चौधरी यांनी केले. प्राध्यापक डॉक्टर शुभांगी दामले यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. मेजर ध्यानचंद हे भारतीय हॉकीचे महान खेळाडू होते. त्यांना



जगभरात हॉकीचे जादूगर म्हणून ओळखले जाते. त्यांनी भारताला ऑलिम्पिक मध्ये १९२८, १९३२, १९३६ सलग तीन सुवर्णपदक मिळवून दिले. त्यांनी आपल्या कारकिर्दीत १००० पेक्षा अधिक गोल केले. त्यांच्या चेंडूवरील नियंत्रण इतके अप्रतिम होते की विरोधकांना त्यांच्या हॉकी स्टिक मध्ये चुंबक असल्याचा संशय यायच्या. अशा या महान खेळाडू च्या जन्मदिवशी २९ ऑगस्ट रोजी दरवर्षी भारतात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो व सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयात सुद्धा मोठ्या प्रमाणात क्रीडा दिवस साजरा केला जातो. या क्रीडा दिवशी क्रीडा क्षेत्रात चांगली कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना खेळ पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. तसेच देशातील खेळासाठी देणारा सर्वोच्च खेलरत्न पुरस्कार मेजर ध्यानचंद यांच्या नावाने क्रीडा दिनाच्या दिवशी दिला जातो.

# प्रारूप मतदार यादी तपासा; सामाजिक कार्यकर्ते वसंतराव हिवराळे यांचे नागरिकांना आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) प्रक्रियेंतर्गत महाराष्ट्रातील प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध झाल्या असून, नागरिकांनी स्वतःसह कुटुंबातील सर्व मतदारांची नावे तातडीने तपासावीत, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते वसंतराव हिवराळे यांनी केले आहे.



मतदार यादीत नाव नसल्यास किंवा नाव, पत्ता, वय, जन्मतारीख, वडील अथवा पतीचे नाव तसेच मतदान केंद्राच्या तपशिलात त्रुटी असल्यास मुदतीत दावा किंवा हरकत दाखल करून दुरुस्ती करून घ्यावी. २०२५ च्या मतदार यादीत नाव असून २०२६ च्या प्रारूप यादीत नाव नसल्यास संबंधित मतदाराने एंंदि पोर्टलवरील माहिती तपासून आवश्यक कार्यवाही करावी. गरज भासल्यास संबंधित BLO शी संपर्क साधावा. नाव समाविष्ट करण्यासाठी इदेस ६, तर नाव, पत्ता, वय किंवा इतर तपशीलातील दुरुस्तीसाठी इदेस ८ दाखल करता येतो. आधार कार्ड, जन्मतारखेचा व पत्त्य ाचा पुरावा तसेच मागील मतदार यादीतील नावाची प्रत आदी कागदपत्रे तयार ठेवावीत. ज्येष्ठ नागरिक, बाहेरगावी नोकरी किंवा शिक्षणासाठी गेलेले सदस्य तसेच एंंदि प्रक्रियेदरम्यान पडताळणी न झालेले मतदार यांच्या नावांची विशेष काळजीपूर्वक तपासणी करावी. प्रारूप यादीत नाव नसल्यास घाबरून न जाता अंतिम यादीपूर्वी उपलब्ध असलेल्या संधीचा लाभ घ्यावा.

# हवामान-स्मार्ट शेतीसाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्याचा संकल्प

■ प्रतिनिधी | रिसोड ■

बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आधुनिक, शाश्वत व हवामान-अनुकूल कृषी तंत्रज्ञानाची माहिती देण्याच्या उद्देशाने कृषी विज्ञान केंद्र वाशिम येथे एकात्मिक हवामान अनुकूल कृषी कार्यक्रम अंतर्गत ३१ ऑगस्ट ते २ सप्टेंबर दरम्यान तीन दिवसीय शेतकरी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणात ३४ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.



हा उपक्रम सस्टेनेबल डेव्हलपमेंट फाउंडेशन, नवी दिल्ली आणि सिंजेंटा फाउंडेशन इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असून, रिसोड परिसरातील १,००० शेतकऱ्यांना हवामान-स्मार्ट शेतीचे प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे. प्रशिक्षणात हवामान बदलाचा शेतीवरील परिणाम, मृदा व पाणी व्यवस्थापन, आधुनिक कृषी तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन आणि शाश्वत शेती पद्धती याबाबत सैद्धांतिक व प्रात्यक्षिक मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन जसप्रीत कोर यांच्या हस्ते झाले. कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. रवींद्र काळे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले, तर तालुका कृषी अधिकारी विलास वाघ यांनी शासकीय कृषी योजना व उपलब्ध सुविधांची माहिती दिली. प्रशिक्षणाच्या आयोजन व अंमलबजावणीत सिंजेंटा फाउंडेशन इंडिया चे प्रकल्प समन्वयक वैभव वानखेडे, वरिष्ठ प्रशिक्षक संदीप पंडित आणि प्रकल्प सहयोगी अक्षय मस्के यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी शेतकऱ्यांना सक्षम करून उत्पन्न वाढविणे व शेतीतील जोखीम कमी करणे, या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. प्रशिक्षणा दरम्यान प्रश्नांचे तज्ज्ञांच्या माध्यमातून निरसन करण्यात आले.

# ७२ तास खाकी मैदानात ; अकोट ग्रामीण पोलिसांची कर्तव्याला सलामी

## धारगडपासून बोर्डीपर्यंत खाकीची अखंड नजर ; ११ अधिकारी, ७० अंमलदार अनब ६० होमगार्ड तैनात



■ स्वप्नील सरकटे ■

अकोट : भाविक यात्रेचा आनंद घेत असताना कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची जबाबदारी खाकीवर होती. ३० जुलै ते १ ऑगस्टदरम्यान अकोट ग्रामीण पोलिसांनी सलग ७२ तास बंदोबस्ताची धुरा सांभाळत दोन मोठ्या यात्रा शांततेत पार पाडल्या. धारगड यात्रेनंतर लगेचच बोर्डी येथील श्री. नागास्वामी यात्रेचा बंदोबस्त असल्याने पोलिसांसाठी हा कालावधी विशेष आव्हानात्मक ठरला.

उपविभागीय पोलिस अधिकारी निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक श्रीधर गुट्टे यांच्या नेतृत्वात ११ अधिकारी, ७० अंमलदार आणि ६० होमगार्ड बंदोबस्तात सहभागी झाले. ३० जुलै रोजी सकाळपासून धारगड यात्रेसाठी तैनात झालेल्या पोलिसांची ड्युटी ३१ जुलै रोजी रात्री १२ वाजेपर्यंत सुरू होती. हजारो भाविकांच्या उपस्थितीत गर्दीचे नियोजन, वाहतूक नियंत्रण आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांनी प्रभावीपणे पार पाडली. विशेष म्हणजे, यात्रेदरम्यान कोणताही किरकोळ वादही उद्भवला नाही. यानंतर १ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता बोर्डी येथील श्री. नागास्वामी यात्रेसाठी पुन्हा पोलिस बंदोबस्त सुरू झाला. रात्री ११ वाजेपर्यंत पोलिसांनी तैनात राहून यात्रा सुरळीत पार पाडली.दोन यात्रांदरम्यान सलग ड्युटी, मोठ्या गर्दीचे नियोजन आणि संभाव्य अनुचित प्रकारांवर नजर ठेवण्याचे आव्हान ग्रामीण पोलिसांनी पेलले. यात्रा निर्विघ्न पार पडली, यामागे केवळ गर्दीचे नियोजन नव्हे, तर पोलिसांची वेळेवरची उपस्थिती आणि सतर्कता महत्त्वाची ठरली. सलग ७२ तास कर्तव्य बजावणाऱ्या अकोट ग्रामीण पोलिसांच्या या कामगिरीचे नागरिकांकडून कौतुक होत असून, उत्सव सुरक्षित करण्यासाठी खाकीने दिलेल्या या अखंड सेवेला नागरिकांनी सलाम केला आहे.



जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २७७ ■ गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# शासकीय कार्यालय बनले आखाडा, शाखा अभियंता-कंत्राटदारात हाणामारी

## वाद थेट पोलिस ठाण्यात; चर्चेनंतर तडजोडीची माहिती

**वर्धा जनमाध्यम :** सार्वजनिक बांधकाम विभाग म्हणजे विकासकामांचे नियोजन आणि अंमलबजावणीचे केंद्र. मात्र, याच विभागाच्या कार्यालयात बुधवारी दुपारी विकासाच्या कामांऐवजी चक्क हाणामारीचा खेळ रंगल्याने खळबळ उडाली. रस्ते दुरुस्तीच्या कामावरून शाखा अभियंता आणि शासकीय कंत्राटदार यांच्यात झालेला वाद थेट धक्काबुक्की आणि मारहाणीपर्यंत पोहोचला. विशेष म्हणजे, ही घटना कार्यालयीन परिसरात घडल्याने पीडब्ल्यूडीतील शिस्त आणि कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, शाखा अभियंता स्वप्नील खंडार आणि शासकीय कंत्राटदार महेंद्र ठाकूर यांच्यात बुधवारी दुपारी रस्ते दुरुस्तीच्या कामावरून शाब्दिक वाद झाला. सुरुवातीला झालेली बाचाबाची काही क्षणांतच चांगलीच पेटली. संताप अनावर झाल्यानंतर दोघांमध्ये धक्काबुक्की झाली आणि त्याचे पर्यवसान मारहाणीत झाल्याची माहिती आहे.

कार्यालयात उपस्थित असलेल्या काही कंत्राटदार आणि कर्मचाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून दोघांना वेगळे केले. मात्र, तोप यंत कार्यालयातील वातावरण चांगलेच तापले होते. दोन्ही बाजूंनी शिवीगाळ आणि एकमेकांना पाहून घेण्याच्या धमक्या दिल्याचीही माहिती समोर आली आहे.

या घटनेची माहिती मिळताच शहर पोलिस ठाण्याचे कर्मचारी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात दाखल झाले. त्यानंतर हे प्रकरण थेट पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचले. बराच वेळ चर्चा झाल्यानंतर दोन्ही पक्षांमध्ये तडजोड झाल्याची माहिती आहे.

### जुन्या वादांची पार्श्वभूमी पुन्हा चर्चेत

पीडब्ल्यूडीमध्ये कंत्राटदारांच्या बिलांच्या देयकावरून यापूर्वीही नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. काही महिन्यांपूर्वी एका कंत्राटदाराने आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची घटना घडली होती. बिलांच्या देयकासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून रकमेची मागणी केली जात असल्याचे आरोपही कंत्राटदारांकडून करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर बुधवारी घडलेल्या घटनेने विभागातील अंतर्गत कारभार पुन्हा ऐरणीवर आला आहे. दरम्यान, कार्यालयातील मारामारीची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याची माहिती आहे. त्यामुळे या फुटेजमधून नेमका वाद कसा सुरू झाला आणि मारहाणीला सुरुवात कुणाकडून झाली, याचे चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे. सरकारी कार्यालयात अधिकारी आणि कंत्राटदारांनी विकासकामांवर चर्चा करणे अपेक्षित असताना वाद थेट हाणामारीपर्यंत पोहोचणे ही गंभीर बाब आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातील या घटनेमुळे केवळ कार्यालयीन शिस्तीचा प्रश्न निर्माण झाला नसून, विभागातील कामकाजाच्या पद्धतीवरही अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. वरिष्ठ अधिकारी या घटनेची चौकशी करून दोषींवर कारवाई करणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भाजी मंड्डी बनली कचराकुंडी-सडका भाजीपाला, दुर्गंधीचा कहर, बाजार समिती झोपेत

**वर्धा जनमाध्यम :** शहराच्या मध्यवर्ती भागातील जुनी भाजी मंड्डी सध्या भाजी मंड्डीपेक्षा कचराकुंडीच अधिक दिसत असल्याचा संताप नागरिकांमधून व्यक्त होत आहे. दररोज मोठ्या प्रमाणात सडलेला भाजीपाला आणि कचरा निर्माण होत असतानाही त्याची नियमित उचल होत नसल्याने दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. पावसाळ्यात चिखल, सडका भाजीपाला आणि दुर्गंधी यामुळे नागरिकांसह दुकानदार व ग्राहकांचे हाल होत आहेत. यामुळे बाजार समितीच्या स्वच्छता व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

बजाज चौकातील कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत असलेले भाजी बाजार को-ऑपरेटिव्ह बँकेमागील परिसरात कृषी उत्पन्न बाजार समितीचे परवानाधारक ठोक व किरकोळ भाजी विक्रेते व्यवसाय करतात.

व्यवसायातून दररोज निर्माण होणारा कचरा वेळेत उचलला जात नसल्याने तो जागेवरच सडत पडतो. कचरा उचलण्यासाठी बाजार समितीकडून निविदा काढल्या जातात तसेच स्वतःचे सफाई कामगारही आहेत. मात्र प्रत्यक्षात नियमित स्वच्छता होत नसल्याचा आरोप नगरसेवक यशवंत झाडे यांनी केला आहे.

**नागरिकांच्या नाकात दुर्गंधी, प्रशासनाच्या कानावर शांतता**

सडलेल्या भाजीपाल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून आरोग्याच्या दृष्टीनेही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाळ्यात तर या समस्येत आणखी भर पडते. चिखल आणि कचऱ्यातून नागरिकांना मार्ग काढावा लागत असल्याने बाजार समितीच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



**पार्किंग नाही, रस्त्यावर वाहनांचा बाजार**

भाजी बाजार परिसरातील मोठ्या मोकळ्या जागेचा योग्य वापर करून ग्राहकांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्याची मागणीही करण्यात आली आहे. विशेषतः रविवारी बाजाराच्या दिवशी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. पार्किंगची व्यवस्था नसल्याने दुचाकी आणि चारचाकी वाहने बजाज चौक ते रेल्वे स्टेशन रोडच्या दोन्ही बाजूंना उभी केली जातात. परिणामी या मार्गावर वाहतूक कोंडीचा फटका नागरिकांना सहन करावा लागतो.

या गंभीर समस्यांची तातडीने दखल घेऊन कृषी उत्पन्न बाजार समितीला कचरा नियमित उचलण्याचे, परिसराची स्वच्छता राखण्याचे तसेच उपलब्ध जागेत पार्किंगची व्यवस्था करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी नगरसेवक यशवंत झाडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलेल्या निवेदनातून केली आहे.

**आठवड्यातून दोनदा कचरा उचलतो; आजच झाली पूर्ण स्वच्छता**

याबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव समीर पेंडके यांनी सांगितले की, भाजी बाजारातील कचरा नियमितपणे उचलला जातो. आठवड्यातून दोनदा, बुधवार आणि शनिवार या दिवशी कचरा काढण्यात येतो. बुधवार असल्याने भाजी बाजार परिसरातील कचरा उचलून पूर्ण साफसफाई करण्यात आली आहे, अशी प्रतिक्रिया पेंडके यांनी दिली.

# दारू तस्करीचा पर्दाफाश; ट्रकसह २१.३० लाखांचा माल जप्त

## ९३०० बाटल्यांचा साठा पकडला; पोलिसांची चाहूल लागताच दोघे फरार

**समुद्रपूर जनमाध्यम :** मालवाहू ट्रकच्या आडून सुरू असलेल्या दारू तस्करीचा समुद्रपूर पोलिसांनी पर्दाफाश केला. आजदा परिसरात मध्यरात्री केलेल्या कारवाईत पोलिसांनी ट्रकसह ९३०० देशी दारूच्या बाटल्या असा तब्बल २१ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांची चाहूल लागताच ट्रक सोडून दोघांनी अंधाराचा फायदा घेत पलायन केले.

मंगळवारी १ सप्टेंबरच्या मध्यरात्री समुद्रपूर पोलिसांचे पथक गस्तीवर असताना कडाजना येथील दारू विक्रेता आशिष हाडके हा नागपूर जिल्ह्यातून जाममार्गे हिंगणघाटकडे दारूचा साठा घेऊन येत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी आजदा पाटीजवळ नाकाबंदी केली. पोलिसांची चाहूल लागताच चालकाने ट्रक आजदा गावाच्या दिशेने वळविला. काही अंतरावर ट्रक अंधारात उभा करून त्यातील दोघांनी पळ काढला. पोलिसांनी ट्रकची झडती घेतली असता ९३ बॉक्समध्ये बनावट लेबल व बुच लावलेल्या देशी दारूच्या तब्बल ९३०० बाटल्या आढळल्या. पोलिसांनी ट्रक व दारूसाठा असा २१ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आशिष हाडके आणि अरविंद रामगुंडे यांच्याविरुद्ध समुद्रपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

# ग्रामसेवकाच्या बहिष्काराने ग्रामसभेचा खेळखंडोबा

## ग्रामसेवक गैरहजर; समस्यांवर उत्तरांसाठी नागरिक आक्रमक

**विरुळ आकाजी जनमाध्यम :** ग्रामसेवकाच्या बहिष्काराच्या पार्श्वभूमीवर विरुळ येथे बुधवारी झालेली ग्रामसभा चांगलीच वादळी ठरली. ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या या सभेला नागरिकांसह युवकांची मोठी उपस्थिती होती. मात्र ग्रामसेवकाने बहिष्कार टाकल्याने गावातील विकासकामांचा लेखाजोखा आणि विविध प्रश्नांवर सविस्तर माहिती मिळू शकली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.



प्रशासकाच्या उपस्थितीत ग्रामसभा घेण्यात आली. यावेळी नवीन घरकुल लाभार्थी यादी वाचून दाखविण्यात आली. तसेच नवीन कामांच्या मागणीची यादीही सभेसमोर ठेवण्यात आली. गावातील विविध समस्या आणि प्रलंबित कामांवर नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले. मात्र प्रशासनाकडून समाधानकारक उत्तरे मिळाली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला.

एसआयआरची १०० टक्के कामे पूर्ण झाली असून त्याची यादी लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या यादीत काही दुरुस्ती अथवा हरकत असल्यास ३० सप्टेंबरपूर्वी ती पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले.

गावातील मूलभूत प्रश्न कायम असताना ग्रामसेवकाच्या ग्रामसभेला अनुपस्थित राहिल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. ग्रामसेवकाचा बहिष्कार संपल्यानंतरच पुन्हा ग्रामसभा घेऊन गावातील प्रश्नांचा सविस्तर लेखाजोखा मांडावा, अशी मागणी नागरिक व युवकांनी केली. ग्रामसेवकाच्या अनुपस्थितीमुळे ग्रामसभेच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची चर्चा गावात रंगली.

# सुदाम माहुरे यांचा सेवापूर्ती सत्कार

**वर्धा जनमाध्यम :** दहेगाव (गोसावी) येथील महात्मा ज्योतिबा फुले अनुदानित आश्रमशाळेचे मुख्याध्यापक सुदाम वामनराव माहुरे हे २२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्ती निमित्त वर्धा येथील महात्मा पॅलेस येथे सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाला एकात्मिक विकास प्रकल्पाचे सहाय्यक अधिकारी खडसे, वर्धा जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष वाळके, संजय भंसाली, ज्ञानेश्वर पोहाणे, रामभाऊ पोहाणे, युवराज चांभारे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी माहुरे यांच्या २२ वर्षांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाचा गौरव करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाचे संचालन शुभांगी सोनटक्के यांनी केले. प्रास्ताविक प्रशांत सोनटक्के तर आभार विवेक माहुरे यांनी मानले. यावेळी मित्र परिवार, कुटुंबीय, शिक्षकवृंद व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्मार्ट मीटरविरोधात सेलूचा 'महाआक्रोश'

## वाढीव बिलांनी संतापाचा कडेलोट

**सेलू जनमाध्यम :** स्मार्ट मीटर आणि वाढीव वीज बिलांच्या कथित जाचाविरोधात सेलूकरांच्या संतापाचा बुधवारी उद्रेक झाला. साहसिक जनशक्ती संघटनेच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकरी, महिला आणि नागरिकांनी महावितरण कार्यालयावर धडक देत जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलनाच्या धगधगत्या वातावरणात दहेगाव येथील एका शेतकऱ्याने कार्यालय परिसरात गळफास घेण्याचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली. सतर्क नागरिक आणि पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून अनर्थ टाळला.



स्मार्ट मीटर बसविताना ग्राहकांची संमती घेतली जात नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. त्यातच अवाजवी वीज बिले पाठविल्याने सामान्य ग्राहक, शेतकरी आणि व्यावसायिक आर्थिक संकटात सापडल्याचा संताप व्यक्त करण्यात आला. 'स्मार्ट मीटर बंद करा, जुने मीटर सुरू करा' अशा घोषणांनी महावितरण कार्यालयाचा परिसर दणाणून गेला. मोर्चाचे नेतृत्व साहसिक जनशक्ती संघटनेचे संस्थापक रवींद्र कोटंबकर यांनी केले. माजी उपनगराध्यक्ष चुडामन हांडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजय उर्फ पप्पू जैस्वाल, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख अमर गुंदी, माजी सरपंच रवी वैरागडे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले.

आंदोलनाची तीव्रता पाहून महावितरण अधिकाऱ्यांनी आंदोलकांशी चर्चा केली. ग्राहकांच्या संमतीशिवाय नवीन स्मार्ट मीटर न बसविणे, वाढीव बिलांची तपासणी करून दुरुस्ती करणे आणि जुन्या मीटरबाबत तांत्रिक पडताळणी करण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, आश्वासनांवर आंदोलन थांबले असले तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली नाही तर आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आंदोलकांनी दिला.

# पालिकेतच 'दादागिरी'

## लिपिकाच्या अंगावर धावला युवक

**हिंगणघाट जनमाध्यम :** आईच्या पेन्शनचा धनादेश आणि नोकरीशी संबंधित कागदपत्रांची मागणी करण्यासाठी नगरपालिकेत आलेल्या युवकाने थेट वरिष्ठ लिपिकालाच शिवीगाळ करीत मारहाण केल्याची घटना मंगळवारी १ सप्टेंबर रोजी दुपारी घडली. या प्रकारामुळे नगरपालिका कार्यालयातील शिस्त आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी युवकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.


माता मंदिर वॉर्डातील सागर अरुण डेकाटे (४८) हे नगरपालिकेच्या आस्थापना विभागात वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत आहेत. दुपारी सफाई कर्मचारी त्रिवेणी प्रेमलाल नक्के यांचा मुलगा पंकज प्रेमलाल मारवे (४२) हा आईसोबत पालिकेत आला. आईच्या पेन्शनशी संबंधित १८ हजार रुपयांचा धनादेश तसेच नोकरीची कागदपत्रे त्याने डेकाटे यांच्याकडे मागितली. मुख्याधिकारी मुंबईला गेले असून ते परतल्यानंतर काम करता येईल, असे डेकाटे यांनी सांगितले. मात्र, या उत्तराने संतप्त झालेल्या पंकजने आरडाओरड करीत शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर त्याने डेकाटे यांची कॉलर पकडून मारहाण केली. उपस्थित कर्मचाऱ्यांनी मध्यस्थी करून वाद आवरला.

कर्तव्यावर असलेल्या अधिकाऱ्याला मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी डेकाटे यांच्या तक्रारीवरून पंकज मारवेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खाकीवर चाकूचा वार; रेणकापूर हादरले

## संशयिताच्या हल्ल्यात पोलिस शिपाई गंभीर

**समुद्रपूर जनमाध्यम :** चोरीच्या गुन्ह्यातील संशयिताला ताब्यात घेण्यासाठी गेलेल्या पोलिस पथकावरच जीवघेणा हल्ला झाल्याने रेणकापूर परिसरात खळबळ उडाली आहे. बुधवार २ सप्टेंबर रोजी पहाटे सुमारे ४ वाजता ही घटना घडली. प्रशांत देविदास मेंढे (३२) याने पोलिस शिपाई प्रकाश मैद यांच्या गळ्यावर धारदार चाकूने वार केला. गंभीर जखमी झालेल्या मैद यांच्यावर सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.



समुद्रपूर पोलिसांना घरफोडी, चोरी आणि वाहन चोरीच्या पाच गुन्ह्यांमध्ये संशयित असलेल्या प्रशांत मेंढेचा शोध होता. त्याला ताब्यात घेण्यासाठी शिपाई प्रकाश मैद आणि चालक रोशन उईके पहाटे त्याच्या घरी पोहोचले. पोलिस पथक घरात पोहोचताच प्रशांतने अचानक मैद यांच्यावर झडप घातली आणि चाकूने गळ्यावर वार केला.

हल्ल्यानंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले. प्रशांतविरुद्ध यापूर्वीही कृषी मोटारपंप, दुचाकी चोरीसह विविध गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे.

पोलिसांवरच हल्ला करण्याचे धाडस वाढत असल्याने कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सुमारे वीस वर्षांपूर्वी समुद्रपूर तहसील चौकात पोलिस कर्मचारी विजय वानखेडे यांच्यावर कुऱ्हाडीने हल्ला झाला होता. त्या घटनेच्या आठवणी या हल्ल्याने पुन्हा ताज्या झाल्या आहेत.

**NAME CHANGE**

मेरा नाम Amreenfirdous Afiyankhan Pathan ऐसा है। आधार कार्ड और पेन कार्ड पर भी यही नाम है
लेकिन leaving certificate पर मेरा नाम Amreen ही लिखा है । मेरे शादी के बाद मेरा नाम Amreenfirdous Afiyankhan pathan है जिसका मैंने राजपत्र आदेश क्रमांक N-2654504 भी बनाया है इसलिए मुझे
Amreenfirdous Afiyankhan Pathan इस नाम से ही जाना और पहचाना जाये । ऐसा ज़ाहिर किया जाये।।

# दहेगाव ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचाराची चौकशी करा

## बोगस खानपट्टा व नाहरकत प्रमाणपत्र प्रकरणी ग्रामस्थांची चार कार्यालयांत तक्रार

**सेलू जनमाध्यम :** दहेगाव (गोसावी) ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचार तसेच मौजा किन्हाळा येथील कथित बोगस खानपट्टा व नाहरकत प्रमाणपत्राच्या प्रकरणी ग्रामस्थांनी चार वरिष्ठ कार्यालयांत लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा, जिल्हाधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी आणि गटविकास अधिकारी, सेलू यांच्याकडे १ सप्टेंबर रोजी तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

ग्रामस्थांच्या आरोपानुसार, मौजा किन्हाळा येथील सर्व्हे क्रमांक २६/१/२ वरील खानपट्ट्यासाठी ग्रामसभेचा ठराव आवश्यक असताना २० मे २०२६ रोजीच्या मासिक सभेच्या ठरावात कथित खोडतोड करून तो २९ मे रोजीच्या ग्रामसभा ठरावाप्रमाणे दाखवण्यात आला. त्यावरून कथित नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.



या प्रकरणी २५ ऑगस्ट रोजी पंचायत समितीच्या चौकशी समितीने आठ रजिस्टर जप्त केल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या रजिस्टरमध्ये वेगवेगळ्या शाईचा वापर आणि खोडतोड आढळल्याचा दावा करण्यात आला आहे.

३१ ऑगस्ट रोजी झालेल्या ग्रामसभेत समाधानकारक कारवाई न झाल्याने ग्रामस्थांनी दहेगाव पोलिस ठाण्यात स्टेशन डायरी क्रमांक १५४ नोंदवून BNS कलम ३१८, ३३६ व ३४० अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. किन्हाळा व दहेगाव परिसरातील गौण खनिज खदानी बंद कराव्यात, सरपंच व ग्रामसेवकांना निलंबित करावे आणि जप्त केलेले प्रोसिडिंग बुक फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. आमदार समीर कुणावार यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री कार्यालयाकडेही तक्रार पाठवण्यात आली आहे.

# वर्ध्यात पहिल्यांदाच राज्य मानांकन टेबल टेनिसचा महासंग्राम

## ४ थ्या महाराष्ट्र राज्य मानांकन स्पर्धेचा दिमाखात शुभारंभ

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉलमध्ये बुधवारपासून ४ थ्या महाराष्ट्र राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेला उत्साहात सुरुवात झाली. वर्धा जिल्हा अमेच्युअर टेबल टेनिस असोसिएशनच्या वतीने महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशनच्या मान्यतेने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. माजी खासदार रामदास तडस यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे जिल्हाध्यक्ष संजय गाते होते.

जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रदीपसिंग ठाकूर, जयंत कावळे, आशिष ठाकरे, पृथ्वीराज शिंदे, निलेश पोहेकर, निलेश किटे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.



महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून नामांकित तसेच उदयोन्मुख खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. विविध वयोगटांत रंगणाऱ्या सामन्यांमुळे क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. स्थानिक खेळाडूंना राज्यातील अव्वल खेळाडूंसोबत खेळण्याची आणि अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष अटल बिहारी पांडे, उपाध्यक्ष प्रदीप बजाज, डॉ. प्रविण धाकटे, अश्विन रामटेके, सचिव ओम तिवारी यांच्यासह पदाधिकारी व स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत. स्पर्धेमुळे वर्ध्यातील टेबल टेनिसला नवी दिशा मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

**जाहीर सुचना**

शहीद भगतसिंग चौक येथे दि. 11/9/2026 ला आयोजीत करण्यात येणा-या तान्हा पोळ्याचे प्रकरण मा. उच्च न्यायालय नागपुर येथे न्यायप्रविष्ट आहे व सदर प्रकरण
**अध्यक्ष, शहीद भगतसिंग चौक तान्हा पोळा मंडळ, पुलगांव**
**विरुध्द**
**मा. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, पुलगांव + २**
असुन सदर केस **नं. WP/6789/2026** हा आहे. सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयाने प्रतिवादींच्या उत्तर दाखल करण्याकरिता दि. 04/09/2026 ला ठेवलेले आहे. सदर प्रकरणात **ॲड. स्वरुप भट्टाचार्य,** नागपुर यांनी वादींच्या बाजुने बाजु मांडली

paper www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# राममंदिराचे पहिले CEO बनले माजी एअर मार्शल जितेंद्र मिश्रा



◆ चंपत राय यांच्या जागी गोविंद देव गिरी सरचिटणीस
◆ ट्रस्टमध्ये ३ नवीन सदस्य




**अयोध्या/वृत्तसंस्था :** माजी एअर मार्शल जितेंद्र मिश्रा हे अयोध्या राम मंदिर ट्रस्टचे पहिले सीईओ असतील. श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने बुधवारी याची घोषणा केली. मिश्रा यांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये पश्चिम वायु कमांडचे नेतृत्व केले आणि वायुसेनेत ३९ वर्षे काम केले.

ट्रस्टचे कोषाध्यक्ष गोविंद देव गिरी यांना नवे महासचिव बनवण्यात आले आहे. बैठकीत ट्रस्टी बनवण्यात आलेल्या महेश भागचंदका यांना कोषाध्यक्षपदाचा कार्यभार देण्यात आला. नवीन सीईओ आणि कोषाध्यक्ष महासचिव गोविंद देव गिरी यांनाच अहवाल देतील.

ट्रस्टमध्ये दिल्लीचे महेश भागचंदका यांच्यासह ३ नवीन सदस्यही बनवण्यात आले आहेत. यामध्ये अयोध्येचे वकील मदन मोहन पांडे आणि आरएसएस समर्थक शिकोहाबादच्या निर्मला यादव यांचा समावेश आहे. निर्मला यादव या ट्रस्टच्या पहिल्या महिला ट्रस्टी असतील.

मंदिरात अर्पणाच्या चोरीचे प्रकरण समोर आल्यानंतर ३ महिन्यांनी हा बदल झाला. या प्रकरणात ८ आरोपी तुरुंगात आहेत. त्यानंतर २ जुलै रोजी ट्रस्टचे महासचिव चंपत राय आणि ट्रस्टी अनिल मिश्रा यांनी राजीनामा दिला होता. त्यांच्या राजीनाम्यानंतर निवृत्त आयएफएस कृष्ण मोहन यांना कार्यवाहक महासचिव बनवण्यात आले होते. ते ५८ दिवस पदावर होते.

नवीन विश्वस्तांबद्दल जाणून घ्या-

**ॲडव्होकेट मदन मोहन पांडे** - राम जन्मभूमी-बाबरी वाद प्रकरणात रामललाच्या वतीने कायदेशीर बाजू मांडणा-या संघाचा ते भाग होते. अलाहाबाद उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात राम जन्मभूमीशी संबंधित पक्षाच्या युक्तिवादात त्यांनी भूमिका बजावली. जानेवारी २०२४ मध्ये एका मुलाखतीत त्यांनी सांगितले होते की, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय त्यांच्या ५१ वर्षांच्या कारकिर्दीतील सर्वात मोठी उपलब्धी आहे.

**महेश भागचंदका-** विश्व हिंदू परिषदेचे माजी अध्यक्ष अशोक सिंघल यांचे नातेवाईक आणि दिल्लीचे व्यावसायिक आहेत. २०२० मध्ये राम मंदिराच्या भूमिपूजनाच्या धार्मिक विधींमध्ये ते मुख्य यजमान होते. त्यानंतर २२ जानेवारी २०२४ रोजी राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेदरम्यानही ते यजमान होते. अशोक सिंघल फाउंडेशन चालवतात. त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली आहेत, ज्यात **अशोक सिंघल** : हिंदुत्वाचे पुरोधा, बोलत्या अनुभूती आणि श्री राम मंदिर काव्य यात्रा प्रमुख आहेत. ते अशोक सिंघल यांचे नातेवाईकही आहेत. २०२० मध्ये राम मंदिराच्या भूमिपूजनाच्या धार्मिक विधींमध्ये ते मुख्य यजमान होते. त्यानंतर २२ जानेवारी २०२४ रोजी राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेदरम्यानही ते यजमान होते.

## तुकाराम मुंढेंचा पुन्हा दणका, FDAची टीम थेट कोर्टात


**मुंबई/प्रतिनिधी :** कल्याण न्यायालयाच्या आवारातील कॅन्टीनमधील धक्कादायक अस्वच्छता समोर आली आहे. स्वच्छतागृहाच्या टाकीवरच स्वयंपाकघर



उभारून सिलेंडर ठेवत पदार्थ तयार केले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला. कॅन्टीनसमोरून सांडपाणी वाहत असल्याने दुर्गंधी, माशांचा त्रास आणि अस्वच्छ वातावरणाबाबत वकील संघटनेने FDA कडे तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेत अन्न व औषध प्रशासनाने धडक कारवाई करत हे उपाहारगृह बंद केले आहे. कल्याण न्यायालयाच्या आवारातील कॅन्टीनमध्ये नियमांची अक्षरशः पायमल्ली होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. स्वच्छतागृहाच्या टाकीवरच स्वयंपाकघर उभारण्यात आले होते. याच ठिकाणी सिलेंडर ठेवून खाद्यपदार्थ तयार केले जात असल्याचे FDA च्या पाहणीत समोर आले. इतकंच नाही तर कॅन्टीनसमोरून स्वच्छतागृहातील सांडपाणी वाहत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली होती. अन्नपदार्थांवर माशा घोंघावत होत्या, तर धूळ आणि अस्वच्छ वातावरणात नागरिकांना खाद्यपदार्थ दिले जात होते. या अस्वच्छतेविरोधात कल्याण बार असोसिएशनकडून अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर FDA अधिका-यांनी पाहणी केली असता कॅन्टीन चालकाकडे आवश्यक परवानाही नसल्याचे आढळून आले.

## एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड, आरोग्य सुविधा केंद्र व रूग्णालयांच्या स्टार रेटिंग प्रणालीचा उपयोग दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी व्हावा

**मुंबई/प्रतिनिधी :** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड, एकात्मिक आरोग्य सुविधा केंद्र आणि रुग्णालयांच्या स्टार रेटिंग प्रणाली या तीन महत्वपूर्ण उपक्रमांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत वर्षा या शासकीय निवासस्थानी शुभारंभ करण्यात आला.



राज्यातील आरोग्यविषयक माहितीचे केवळ संकलन न करता तिचा लोकहितासाठी व्हावा. या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी विभागाने काम करावे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डा. श्रीकर परदेशी, आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या तंत्रज्ञानाधारित आणि नागरिककेंद्री उपक्रमांचे कौतुक केले.

**डेटावर आधारित निर्णयांसाठी एकात्मिक डॅशबोर्ड**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध कार्यक्रमांसाठी सध्या ४० हून अधिक स्वतंत्र पोर्टल कार्यरत आहेत. या पोर्टलवरील महत्त्वाची माहिती एकत्रित करून एकाच व्यासपीठावर उपलब्ध करण्यासाठी एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड विकसित करण्यात आला आहे. माता व बाल आरोग्य, क्षयरोग नियंत्रण, असंसर्गजन्य आजारांची तपासणी आदी कार्यक्रमांशी संबंधित प्रमुख निर्देशांकांचे राज्य तसेच जिल्हानिहाय विश्लेषण या डॅशबोर्डवर करता येणार आहे. यामुळे आरोग्यविषयक आव्हाने तातडीने ओळखणे, जिल्हानिहाय कामगिरीचे मूल्यमापन करणे आणि आवश्यक ठिकाणी परिणामकारक उपाययोजना करणे अधिक सुलभ होणार आहे. आरोग्यविषयक माहितीचे रूपांतर कृतीयोग्य डेटामध्ये होउन प्रशासकीय निर्णय अधिक अचूक आणि गतिमान होणार आहेत.

## अकोल्यामध्ये ऑनलाइन ग्रोसरीवर वक्रदृष्टी! 'ब्लिंकिट'चा परवाना निलंबित

**अकोला :** अत्यंत अस्वच्छता असलेल्या गोदामातून ऑनलाइन ग्रोसरीचा पुरवठा केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार अकोल्यात समोर आला आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांची त्यावर वक्रदृष्टी पडली असून प्रशासनाने थेट ब्लिंकिटचा परवानाच निलंबित केला. या कंपनीच्या गोदामाची दोन वेळा तपासणी केली. त्यामध्ये धूळ, कच-यासह प्रचंड अस्वच्छता, अस्ताव्यस्त सामान आढळून आले होते.

**नोटीस बजावूनही सुधारणा नाहीच**-अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशान्वये अस्वच्छतेच्या पार्श्वभूमीवर सहायक आयुक्त (अन्न) दे. गो.वीर यांचे मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी र. व्दा. सोळंके यांनी शहरातील कवार नगर येथील मे. ब्लिंक कामर्स प्रायव्हेट लिमिटेडची १२ ऑगस्ट रोजी तपासणी केली होती. त्या पेढीस १३ ऑगस्ट रोजी सुधारणा नोटीस बजावण्यात आली होती.

**फेरतपासणीमध्ये आढळल्या प्रचंड त्रुटी**-सुधारणा नोटीसवर २१ ऑगस्ट रोजी ऑनलाइन पद्धतीने खुलासा सादर केला. त्यानंतर ३१ ऑगस्ट रोजी मे. ब्लिंक कामर्स प्रायव्हेट लिमिटेडची फेरतपासणी करण्यात आली. त्याच दिवशी सुनावणी देखील घेण्यात आली. फेरतपासणीत आढलेल्या त्रुटींची पूर्तता न केल्याने पेढीचा परवाना निलंबित करण्यात आलेला आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीमध्ये वाक-इन चिलर व फ्रीझरच्या प्रवेशद्वारावर प्लास्टिकचे पडदे खराब, फाटलेले व पिवळसर आढळले. रॅक व्यवस्थेत अपुरी जागा, प्रमाणापेक्षा जास्त उंची व अयोग्य डिझाइनमुळे स्वच्छतेत अडथळा निर्माण होतो. खाद्यपदार्थ व अखाद्य साहित्य एकाच एकत्र साठवले गेले होते.




अन्न पदार्थाचे खोके व साहित्याची पाकिटे थेट जमिनीवर अस्ताव्यस्त ठेवलेली आढळली. रॅकखाली मोठ्या प्रमाणात धूळ व कचरा आढळून आला. स्वच्छतेचे कुठलेही वेळापत्रक नव्हते.

बिले व अंकेक्षण अहवाल सादर करण्यास टाळाटाळ- अन्न हाताळणारे कामगार हातमोजे व हेड टोपी न वापरता काम करीत होते. खरेदी-विक्री बिले व अंकेक्षण अहवाल तपासणीसाठी सादर केले नाहीत, असे अन्न व औषध प्रशासनाकडून सांगण्यात आले. मोठ्या कंपनीच्या गोदामावर अन्न व औषध प्रशासनाने कारवाई करून परवाना निलंबित केल्याने मोठी खळबळ उडाली आहे. ऑनलाइन सेवा देतांना संबंधित कंपनीकडून योग्य काळजी घेतली जात नसल्याचेही स्पष्ट होते.

## बोट बुडून 2 जवान बेपत्ता

**यमुनानगर :** हरियाणातील यमुनानगर जिल्ह्यात हथिनीकुंड बॅरेजजवळ मंगळवारी संध्याकाळी यमुना नदीत लष्कराची बोट बुडाल्याने बेपत्ता झालेल्या दोन जवानांचा १५ तासांनंतरही शोध लागलेला नाही. मंगळवारी संध्याकाळी ५ वाजता सुरू झालेले शोधकार्य रात्रभर सुरू होते. हेलिकाप्टरनेही पाळत ठेवण्यात आली. हरियाणा व्यतिरिक्त, यूपीच्या एसटीआरएफ टीम्सही शोधकार्यात सामील आहेत. स्थानिक पाणबुड्यांनाही कामाला लावले आहे. बॅरेजमधून बाहेर पडणा-या पूर्व आणि पश्चिम यमुना कालव्याच्या किना-यांवर सर्चलाइट्सने पाळत ठेवण्यात आली. आज कालव्यांमधील पाणीपुरवठा कमी करून पुन्हा प्रयत्न केले जातील. लष्कराच्या वन पॅरा स्पेशल फोर्सच्या पूर बचाव दलाच्या सरावादरम्यान हा अपघात झाला होता. अपघातात लष्कराचे पाच जवान पाण्यात बुडू लागले होते. त्यापैकी तीन जवान सुमारे ६०० मीटरपर्यंत वेगाने वाहणा-या पाण्यात पोहून पश्चिम यमुना कालव्याच्या (डब्ल्यूजेसी) गेटमधून बाहेर पडण्यात यशस्वी झाले. बेपत्ता जवानांची ओळख महाराष्ट्रातील आर्यन पाटील आणि जम्मू-काश्मीरमधील अखनूर येथील अजय अशी झाली आहे.

# दिल्ली गँगरेप केस- पीडित आणि आरोपींचे फिंगरप्रिंट्स मिळाले

### ड्रायव्हर-कंडक्टरचे कपडेही जप्त; चालत्या बसमध्ये 16 वर्षांच्या विद्यार्थिनीवर बलात्काराचा आरोप



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीत धावत्या स्लीपर बसमध्ये १६ वर्षीय विद्यार्थिनीवर झालेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणात पोलिसांना फ?रेन्सिक तपासणीत महत्त्वाचे पुरावे मिळाले आहेत. पोलीस सूत्रांनुसार, बसमधून विद्यार्थिनीचे आणि दोन्ही आरोपींचे फिंगरप्रिंट्स (बोटांचे ठसे) मिळाले आहेत. बसच्या सीटवरून आणि स्टिअरिंग व्हीलवरूनही फ?रेन्सिक नमुने घेण्यात आले आहेत.

चालक कुलदीप आणि कंडक्टर संदीपचे कपडेही पोलिसांनी जप्त केले आहेत. पोलीस आता डीएनए अहवालाची वाट पाहत आहेत. यानंतर तपास पुढे नेत लवकरच आरोपपत्र दाखल करण्याची तयारी आहे. दोन्ही आरोपींना पोलिसांनी यापूर्वीच अटक केली आहे आणि घटनेत वापरलेली स्लीपर बसही जप्त करण्यात आली आहे.

हे प्रकरण ४ ऑगस्टच्या रात्रीचे आहे. उत्तर प्रदेशातील मैनपुरी येथील राहणारी ११वीची विद्यार्थिनी ग्रेटर नोएडा येथील परी चौकातून बसमध्ये बसली होती. सुमारे ४७ किलोमीटरनंतर तिला काश्मिरी गेट बस टर्मिनलजवळ रिंग रोडवर सोडून देण्यात आले होते. विद्यार्थिनीने नंतर पोलिसांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. ३१ ऑगस्ट रोजी ही घटना समोर आली. विद्यार्थिनीने पोलिसांना सांगितले की, चालक आणि कंडक्टरने तिच्यावर बलात्कार केला. विरोध केल्यावर दोघांनी तिला जीवे मारण्याची धमकी दिली. बसच्या काचांना पडदे लावलेले होते, त्यामुळे आतील हालचाली बाहेरून दिसत नव्हत्या.आरोप आहे की, दोघांनी मध्यरात्री विद्यार्थिनीला काश्मिरी गेट बस टर्मिनलजवळ रिंग रोडवर उतरवले आणि तेथून पळ काढला. यानंतर विद्यार्थिनीने रात्रीच काश्मिरी गेट पोलिसांशी संपर्क साधला आणि घटनेची माहिती दिली.

**सीसीटीव्हीवरून बसची ओळख पटली, तिमारपूरमधून अटक**-तक्रार मिळाल्यानंतर पोलिसांनी बसचा मार्ग आणि तिची ओळख पटवण्यासाठी रस्त्यावरील सीसीटीव्ही कॅमे-यांचे फुटेज तपासले. तपास पथकाने बसचा माग काढत चालक कुलदीप आणि कंडक्टर संदीपला तिमारपूर येथील एका बस पार्किंगमधून अटक केली. बसलाही ताब्यात घेउन फ?रेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आले. बसचा क्रमांक छ्ध-८३ आहे, ती यूपीच्या फिरोजाबादमध्ये नोंदणीकृत आहे.

पोलिसांच्या सूत्रांनुसार, घटनेच्या दिवशी बसमध्ये बिघाड झाल्याने ते दोघे तिला नोएडाच्या सूरजपूर येथील एका वर्कशापमध्ये दुरुस्तीसाठी घेउन गेले होते. दुरुस्तीनंतर ते रिकामी बस तिमारपूरला घेउन जात होते. याच दरम्यान परी चौकात विद्यार्थिनीने बस थांबवण्याचा इशारा केला होता.

**NHRC ने प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली-** या प्रकरणात राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने स्वताहून दखल घेतली आहे. आयोगाने दिल्ली आणि गौतमबुद्ध नगरच्या पोलीस आयुक्तांव्यतिरिक्त मैनपुरीच्या एसपींना नोटीस बजावली आहे. तिन्ही अधिका-यांकडून या प्रकरणी दोन आठवड्यांच्या आत सविस्तर अहवाल मागवण्यात आला आहे.

**२०१२ मध्येही धावत्या बसमध्ये निर्भया प्रकरण घडले होते-**दिल्लीत १६ डिसेंबर २०१२ च्या रात्री २३ वर्षीय तरुणीवर धावत्या बसमध्ये सामूहिक बलात्कार झाला होता. गंभीर दुखापतींनंतर २९ डिसेंबर रोजी सिंगापूरमधील रुग्णालयात तिचा मृत्यू झाला होता. या प्रकरणाला माध्यमांमध्ये निर्भया प्रकरण असे नाव देण्यात आले होते. या प्रकरणात सहा जणांना आरोपी बनवण्यात आले होते. यापैकी एक अल्पवयीन होता, तर एका आरोपीने तुरुंगात आत्महत्या केली होती. चार दोषींना-मुकेश सिंह, पवन गुप्ता, विनय शर्मा आणि अक्षय कुमार सिंह-मृत्यूदंडाची शिक्षा सुनावण्यात आली. चौघांना २० मार्च २०२० रोजी तिहार तुरुंगात फाशी देण्यात आली.

औपचारिक सभांना सुट्टी!

## आता थेट 'माता पालकांशी' संवाद!

**अमरावती /प्रतिनिधी :** नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या सुरुवातीलाच महाराष्ट्र राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये 'माता-पालक मेळाव्याचे' आयोजन करण्यात येणार आहे. शिक्षण आयुक्तालयाने यासंबंधीचे अधिकृत परिपत्रक जारी केले असून, या उपक्रमाला एका व्यापक सामाजिक चळवळीचे रूप देण्याचे आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी आणि सर्व संबंधित प्रशासकीय अधिका-यांना दिले आहेत.



### शिक्षण आयुक्तांचे नवे आदेश, गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न

परिपत्रकात स्पष्ट केल्यानुसार, हा मेळावा केवळ एक साधी किंवा औपचारिक मासिक सभा म्हणून न ठेवता, माता-पालकांशी थेट संवाद साधण्याचे एक प्रभावी माध्यम ठरावे या दृष्टीने आयोजित केला जाईल. मुलांच्या सर्वांगीण विकासात आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये शाळा इतकाच कुटुंबाचा, आणि विशेषतः मातेचा सहभाग अत्यंत महत्त्वपूर्ण असतो, यावर यात भर देण्यात आला आहे.विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि उपस्थिती वाढवण्याचा उद्देशशाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती टिकवून ठेवणे, त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणे यासाठी शाळा आणि माता-पालक यांच्यात सातत्यपूर्ण व सुसंवाद असणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि केंद्र शासनाच्या 'निपुण भारत अभियानांतर्गत प्राथमिक स्तरावरील सर्व विद्यार्थ्यांना 'पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान' प्राप्त करून देण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.शासकीय योजनांची माहिती पालकांपर्यंत पोहोचवणारया मेळाव्याच्या माध्यमातून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती थेट मातांपर्यंत पोहोचवली जाणार आहे. यामध्ये:मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश योजनाप्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना (माध्यान्ह भोजन)नवीन अभ्यासक्रम व त्यानुसार तयार झालेली नवीन पाठ्यपुस्तकेविद्यार्थ्यांच्या लाभाच्या विविध योजनाव्यावसायिक शिक्षण, कला आणि डिजिटल शिक्षणविषयक माहितीहा मेळावा यशस्वी करण्यासाठी राज्यातील सर्व गटांच्या शिक्षण अधिका-यांनी व शाळा व्यवस्थापनाने तातडीने अंमलबजावणी करावी, असे निर्देश प्रशासनाने दिले आहेत. या उपक्रमामुळे शाळा आणि कुटुंब यांच्यातील दरी सांधली जाउन विद्यार्थ्यांच्या प्रगतीला मोठा वेग मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## महिला व बालकांचे हक्क व कल्याण समितीकडून वसतिगृहे, अनाथालयाची पाहणी

**मुंबई :** विधानमंडळाच्या महिला व बालकांचे हक्क व कल्याण समितीने आज अभ्यास दौ-याअंतर्गत मुंबईतील विविध शासकीय व सामाजिक संस्थांना भेट दिली. यावेळी विद्यार्थिनी व बालकांना उपलब्ध करून देण्यात येणा-या निवास, आरोग्य, आहार, स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या सुविधांचा समितीमार्फत प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला.समितीने वरळी येथील संत मीराबाई मुलींच्या शासकीय वसतिगृहास, मुंबई विद्यापीठातील महर्षी धोंडो केशव कर्वे मुलींच्या वसतिगृहास तसेच अंधेरी येथील ए. डी. बावला अनाथालयास भेट दिली. यावेळी समितीच्या प्रमुख मोनिका राजळे, समितीच्या सदस्या सना मलिक, सीमा हिरे, मंजुळा गावित, स्नेहा दुबे आणि ज्योती गायकवाड तसेच सदस्य महेश सावंत, सुनील शिंदे आणि किरण सरनाईक उपस्थित होते. यावेळी महिला व बालविकास कोकण विभाग विभागीय उपायुक्त सुवर्णा पवार, मुंबई शहर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी शोभा शेलार, मुंबई उपनगर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी शरद कु-हाडे, मुंबई उपनगरचे उपजिल्हाधिकारी प्रशांत ढगे, बालविकास प्रकल्प अधिकारी प्रेमा घाटगे, चिल्ड्रन्स एड सोसायटीचे मुख्य अधिकारी प्रवीण भावसार तसेच बाल संरक्षण अधिकारी उपस्थित होते. संत मीराबाई मुलींच्या शासकीय वसतिगृहात समितीने प्रवेशप्रक्रिया, निवास व्यवस्था, शैक्षणिक व इतर सुविधा तसेच तक्रार निवारण यंत्रणेची माहिती घेतली. विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देण्यासाठी शासनामार्फत दरमहा दोन हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य दिले जात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. मुलींच्या शिक्षणात अडथळा येउ नये, त्यांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी शासनामार्फत वसतिगृहात गुणवत्तेनुसार विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात येत असल्याची माहितीही देण्यात आली.

## नेपाळ दुर्घटनेतील बेपत्ता मृत पर्यटकांची ओळख पटविण्यासाठी डीएनए नमुना संकलन

**मुंबई, दि. २:** नेपाळमध्ये झालेल्या दुर्घटनेत मृत झालेल्या भारतीय नागरिकांच्या ओळख पटविण्याच्या प्रक्रियेसाठी डीएनए प्रोफायलिंग करण्यात येत आहे. या प्रक्रियेसाठी महाराष्ट्रातील संबंधित मृतांच्या नातेवाईकांनी ३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत संबंधित न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेतप्रत्यक्ष उपस्थित राहावे, असे आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आले आहे.डीएनए नमुना देण्यासाठी येताना नातेवाईकांनी ३ पासपोर्ट आकाराचे छायाचित्रे आणि आधारकार्ड किंवा पॅनकार्ड यापैकी कोणतेही ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. मृत व्यक्तीच्या किमान दोन जवळच्या नातेवाईकांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक आहे. यामध्ये वडील, आई, मुलगा किंवा मुलगी यांचा समावेश आहे. नातेवाईकांच्या सोयीसाठी मुंबई, पुणे आणि नाशिक येथे डीएनए नमुना संकलन व संबंधित प्रक्रिया करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. नाशिकमधील नागरिकांसाठी प्रादेशिक न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा नाशिक विद्युतनगरसमोर, दिंडोरी रोड, लोक सहकारनगर, नाशिक. संपर्क :- आर. आर. पवार, उपसंचालक  ९४०५१८३२५३.आर. एम. पाटील, सहाय्यक संचालक -८२७५२५७३१७ नेपाळ दुर्घटनेतील मृतांची ओळख पटविणे आणि त्यांच्या कुटुंबियांपर्यंत आवश्यक माहिती पोहोचविण्याच्या दृष्टीने डीएनए प्रोफायलिंग अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे संबंधित नातेवाईकांनी निर्धारित वेळेत आवश्यक कागदपत्रांसह संबंधित केंद्रावर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र लँडबँकमुळे पायाभूत सुविधाच्या विकासाला गतिमानता-मुख्यमंत्री

**मुंबई, दि. २ :** महाराष्ट्र लँडबँक डिजीटल प्रणालीमुळे राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या विकासाला गतिमानता येईल तसेच पर्यायी वनीकरणासाठी जमिनीची उपलब्धता निश्चित करणे शक्य होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राज्य शासनाच्या विविध विभागांच्या मालकीच्या जमिनींची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी महाराष्ट्र लँड बँक डिजीटल प्रणाली - डॅशबोर्ड विकसित करण्यात आला आहे. या प्रणालीचा मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीनंतर शुभारंभ करण्यात आला. या डॅशबोर्डबाबत



महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर आणि जमाबंदी आयुक्त शैलेश नवल यांनी सादरीकरण केले. महाराष्ट्र लँड बँकेमुळे शासकीय जमिनीची माहिती एकाच डिजिटल प्लॅटफार्मवर उपलब्ध होउन जमीन शोध, पडताळणी व वाटप प्रक्रियेत सुलभता येईल. उपलब्ध जमिनीचा योग्य वापर, विभागांच्या गरजेनुसार जमिनीचे जलद मॅपिंग, निर्णयप्रक्रियेतील विलंब कमी करणे आणि प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता वाढविण्यास प्रणाली सहाय्यभूत ठरते. तसेच विभाग, जिल्हा, तालुका व गावनिहाय माहिती संकलन व प्रगती अहवालाद्वारे कामकाजाचा आढावा घेता येणार आहे. महाराष्ट्र लँड बँक शासकीय जमिनीच्या डेटा-आधारित व्यवस्थापनासाठी एकात्मिक डिजिटल व्यवस्था असून, अभिलेख, प्रत्यक्ष स्थळपाहणी, जीआयएस विश्लेषण आणि एमआयएस यांचा समन्वय साधून शासकीय जमीन व्यवस्थापन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि गतिमान करण्यास उपयुक्त ठरणार आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# पुन्हा निर्भया

१४ वर्षांपूर्वी दिल्लीत घडलेल्या निर्भया दुर्घटनेची आठवण यावी, अशी दुर्घटना नुकतीच दिल्लीत पुन्हा एकदा घडली. मैनपुरी जिल्ह्यातली १६ वर्षांची एक मुलगी रक्षाबंधनासाठी आपल्या चुलत भावाकडे निघाली. येणाऱ्या बसला तिने हात दाखवला. बसमध्ये चढल्यानंतर तिच्या लक्षात आले, की ती एकटीच प्रवासी आहे. पुढे प्रवासी येतील, असे गृहीत धरून ती उतरली नाही आणि तिथेच तिचा घात झाला. दिल्लीतल्या मुलींचा वनवास १४ वर्षांनंतरही संपलेला नाही, हे या घटनेने सिद्ध झाले. १६ डिसेंबर २०१२ रोजी झालेल्या निर्भया दुर्घटनेनंतर कायदे कडक झाले, महिलांच्या सुरक्षेसाठी नवे नियम आले, 'निर्भया निधी'ची घोषणा झाली, सार्वजनिक वाहनांमध्ये पॅनिक बटणासारख्या सुविधांची तरतूद झाली. कायदे बदलले, सुरक्षा व्यवस्थेत सुधारणाही झाल्या; पण महिलांबाबतच्या मानसिकतेबद्दल बदल झाला नाही. ताज्या घटनेतील १६ वर्षांची किशोरी मुसळधार पाऊस आणि अंधारामुळे तिला बसस्टॉप समजला नसल्यामुळे ती ग्रेटर नोएडातील परी चौकात उतरली. तिला परी चौकातून पुढे जायचे असल्यामुळे तिने मदतीच्या अपेक्षेने एका रिकाम्या स्लीपर बसला हात दाखवला. बसचालक कुलदीप आणि कंडक्टर संदीप यांनी तिला बसमध्ये घेतले. त्यानंतर बस नोएडा, मयूर विहार, रिंग रोडमार्गे काश्मिरी गेटच्या दिशेने निघाली. सुमारे ४७ किलोमीटरच्या या प्रवासात तिच्यावर दोघांनी आळीपाळीने अत्याचार केले. दिल्ली पोलिसांनी चालक कुलदीप आणि वाहक संदीप यांना अटक केली आहे. या प्रकरणात पीडित मुलीने मदतीसाठी सार्वजनिक वाहतुकीचा आधार घेतला होता. ज्या व्यक्तींकडे प्रवाशांच्या सुरक्षिततेची जबाबदारी सोपवली जाते, त्यांच्यावरच अत्याचाराचा आरोप असेल, तर सार्वजनिक गाड्यांमधून प्रवास करणे खरंच योग्य आहे का? हा प्रश्न निर्माण झाला आहे. खरे तर प्रवाशांच्या सुरक्षेचा पहिला दुवा हा चालक आणि वाहक असतो. त्यामुळे त्यांच्या नियुक्तीपासून प्रशिक्षणापर्यंत आणि सेवाकाळातील वर्तनावरील देखरेखीपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया कठोर असणं आवश्यक आहे. यात बस मालकांसह परिवहन यंत्रणेचीही समान जबाबदारी आहे. दिल्लीत घडलेल्या या घटनेमुळे रात्रीच्या वेळी धावणाऱ्या खासगी आणि स्लीपर बसच्या नियंत्रणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. खासगी आणि स्लीपर बसमध्ये पडदे, बंदिस्त आसनव्यवस्था आणि बाहेरून आतील हालचाली सहज न दिसणे ही सुरक्षा व्यवस्थेतील गंभीर बाब आहे. बस रस्त्यावर आणण्यापूर्वी तिची सुरक्षा उपकरणे, सीसीटीव्ही, जीपीएस आणि आपत्कालीन यंत्रणा कार्यरत आहेत की नाही, याची तपासणी करणं सक्तीचे असले पाहिजे. हा प्रश्न केवळ दिल्लीपुरता मर्यादित नाही. पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात देखील २५ फेब्रुवारी २०२५ रोजी २६ वर्षीय तरुणीवर शिवशाही बसमध्ये बलात्कार झाला होता. आरोपीला काही दिवसांनी अटक झाली. मात्र, त्या घटनेनंतरच बसस्थानकातील सुरक्षा व्यवस्था सुधारण्याबाबत चर्चा सुरू झाली; सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यात झालेला विलंब प्रशासनाच्या प्राधान्यक्रमावर प्रश्न उपस्थित करणारा ठरला. एखाद्या गुन्ह्यानंतर सुरक्षा यंत्रणा तातडीने कार्यान्वित होणे अपेक्षित असताना निविदा, कंत्राट किंवा प्रशासकीय पूर्ततेच्या नावाखाली विलंब होत असल्याचे सांगणे ही लाजिरवाणी बाब आहे. पालघरच्या तलासरीत घडलेली घटना या प्रश्नाला आणखी वेगळं वळण देते. मित्रासोबत दुचाकीवरून जात असलेल्या १९ वर्षीय तरुणीला अडवून तिथे सहा जणांनी निर्जन ठिकाणी नेऊन सामूहिक अत्याचार केला. या प्रकरणात पोलिसांनी काही आरोपीना अटक केली. घटनास्थळ, वेळ आणि परिस्थिती वेगळी असली तरी या घटनांमधून एकच वास्तव समोर येतं, ते म्हणजे महिलांच्या सुरक्षेसाठी केवळ गुन्हा घडल्यानंतरची पोलीस कारवाई पुरेशी नाही; गुन्हा घडण्यापूर्वीची प्रतिबंधात्मक यंत्रणा सक्षम असणं गरजेचं आहे. दिल्लीतील बलात्काराच्या नोंदवलेल्या गुन्ह्यांची आकडेवारीही या चिंतेला अधोरेखित करते. २०२१ मध्ये २,०७६, २०२२ मध्ये २,०८४, २०२३ मध्ये २,१४१, २०२४ मध्ये २,०७६ आणि २०२५ मध्ये १,८४६ बलात्काराचे गुन्हे नोंदवले गेले. यात काही वर्षांत घट झाली असली, तरी संख्या अजूनही भयावह आहे. महिलांच्या सुरक्षेची जबाबदारी केवळ पोलिसांवर ढकलून चालणार नाही, त्यासाठी प्रशासनाने रात्रीच्या बसची नियमित तपासणी, चालक वाहकांची पडताळणी, प्रत्येक बसमधील सीसीटीव्हीची निगराणी, जीपीएसची थेट नियंत्रण कक्षाशी जोडणी आणि पॅनिक बटणाची कार्यक्षमता तपासणे बंधनकारक झाले पाहिजे. सुरक्षा यंत्रणा बंद आढळल्यास संबंधित बस मालक आणि ऑपरेटरवर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बस कंपन्यांकडून फक्त दंड वसूल करून प्रकरण संपवू नये. त्या कंपन्यांची बससेवा चालवण्याची परवानगी (परवाना) कायम ठेवायची की नाही, याचाही शासनाने विचार करावा. महिलांच्या सुरक्षेबाबत आपण ज्या पद्धतीनं विचार करतो आणि उपाययोजना करतो, त्याची कडक कार्यवाही होणे आवश्यक आहे. सुरक्षिततेचे नियम पाळण्याची जबाबदारी नागरिकांची असली तरी गुन्हा करण्याची गुन्हेगारांची प्रवृत्ती लक्षात घेतली पाहिजे. पीडितेच्या वर्तनातून गुन्ह्याचे समर्थन शोधण्याची सामाजिक प्रवृत्ती थांबवली पाहिजे. निर्भया प्रकरणानंतर देशाने अनेक आश्वासने ऐकली. आता आश्वासने नव्हे, उत्तरदायित्वाची वेळ आहे. निर्भयाच्या स्मृतीला खरी आदरांजली मेणबत्ती पेटवण्यात नाही, तर एखाद्या मुलीला रात्री बसमध्ये बसताना भीती न वाटण्यात आहे. १४ वर्षांनंतरही जर एखाद्या अल्पवयीन मुलीला बसमध्ये अत्याचाराला सामोरे जावे लागत असेल, तर सुरक्षा व्यवस्थेचे दावे फोल आहेत. मुलींना स्वतःला जपण्याचे धडे देण्यापेक्षा व्यवस्था चालवणाऱ्यांनी आपली जबाबदारी काय, याचा गंभीरपणे विचार करण्याची हीच वेळ आहे.

# दरवाढ खतांची, कोंडी शेतकऱ्यांची!



*शेतकऱ्यांसमोर खतांच्या वाढत्या किमतीचे नवे संकट उभे राहिले आहे. उत्पादन वाढविण्याचा खर्चच वाढत राहिला, तर शेतीमालाला मिळणारे उत्पन्न कितीही वाढले, तरी शेतकऱ्याच्या हातात प्रत्यक्ष नफा किती उरणार, हा मूलभूत प्रश्न आहे.*

बियाणे, मजुरी, यंत्रसामग्री, इंधन, कीटकनाशके आणि रासायनिक खते यांच्या किमती सातत्याने वाढत असताना शेतीमालाच्या भावात त्याच प्रमाणात वाढ होत नाही. यंदाच्या खरीप हंगामाच्या तोंडावर रासायनिक खतांच्या किमतीत झालेली वाढ म्हणूनच चिंतेची आहे. काही खतांच्या दरात पोत्यामागे ५० ते १४०० रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. पाऊस समाधानकारक झाला, तरी शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसेलच, याची खात्री त्यामुळे उरलेली नाही. खरीप हंगामात सोयाबीन, कापूस, मका, तूर आणि अन्य पिकांसाठी मोठ्या प्रमाणावर खतांची गरज भासते. पेरणीपूर्व मशागत, बियाणे आणि मजुरीचा खर्च करून शेतकरी आधीच मोठी रक्कम गुंतवतो. त्यात खतांच्या वाढलेल्या किमतीची भर पडली की, १ एकरामागील उत्पादन खर्चाचा हिशेब बिघडतो. उपलब्ध माहितीनुसार युरियाचे ५० किलोचे पोते २०२५ आणि २०२६ मध्ये २६६ रुपयांवर, तर डीएपी १३५० रुपयांवर कायम आहे; मात्र इतर अनेक खतांच्या किमती वाढल्या आहेत.

अमोनियम सल्फेटचे पोते २०२५ मधील ९०० रुपयांवरून २०२६ मध्ये १४०० रुपयांवर गेले आहे. २०:२०:०:१३ या खताचा दर १२५० रुपयांवरून २३५० रुपये झाला. १०:२६:२६ चा दर १८०० रुपयांवरून २१५० रुपये, तर ९:२४:२४ चा दर १५५० रुपयांवरून २६०० रुपये झाला. १२:३२:१६ खत १८०० रुपयांवरून २५४० रुपयांवर गेले. २४:२४:० चा दर १७०० रुपयांवरून २८०० रुपये म्हणजे तब्बल १००० रुपयांनी वाढला आहे. सुपर फॉस्फेटमध्ये ११० रुपये, एमओपी पोटॅशमध्ये ४५० रुपये, मॅग्नेशियम सल्फेटमध्ये २५० रुपये, गंधकाच्या १० किलो पॅकमध्ये ३०० रुपये, तर कॉम्बो खतामध्ये तब्बल १४०० रुपयांची वाढ झाल्याचे चित्र आहे. एका पोत्यामागील ही वाढ असली, तरी संपूर्ण हंगामातील गरज लक्षात घेतल्यास शेतकऱ्याच्या खिशावर हजारो रुपयांचा अतिरिक्त भार पडणार आहे.

यामागे जागतिक बाजारातील परिस्थितीचाही वाटा आहे. रासायनिक खतांसाठी लागणारा कच्चा माल भारताला मोठ्या प्रमाणावर आयात करावा लागतो. रशिया, चीन, बेलारूस यांसारख्या देशांतून होणारा पुरवठा, आंतरराष्ट्रीय बाजारातील दर, वाहतूक खर्च आणि जागतिक संघर्ष यांचा परिणाम देशांतर्गत खतांच्या किमतींवर होतो; मात्र या जागतिक अर्थकारणाचा अंतिम फटका शेतकऱ्याच्या बांधावर बसतो. शेतकऱ्याने आंतरराष्ट्रीय अस्थिरतेची किंमत किती काळ मोजायची? खर्च परवडत नसल्याने शेतकरी शिफारस केलेल्या प्रमाणापेक्षा कमी खत वापरू लागला, तर त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होऊ शकतो. दुसरीकडे, तुलनेने स्वस्त पर्याय म्हणून अयोग्य किंवा असंतुलित खतांचा वापर वाढला, तर जमिनीच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.

केंद्र सरकार खतांवर मोठ्या प्रमाणावर अनुदान देते. त्यामागील उद्देश शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात खते उपलब्ध करून देणे हाच आहे. मग, बाजारात विविध खतांच्या किमतीत ५०, २५०, ५००, ११०० किंवा अगदी १४०० रुपयांची वाढ होत असेल, तर अनुदानाचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यापर्यंत किती पोहोचतो, याचा हिशेब मांडला पाहिजे. अनुदान वाढविणे हा कायमस्वरूपी उपाय ठरणार नाही. खतांच्या कच्च्या मालासाठी भारताचे परदेशावरील अवलंबित्व कमी करणे, देशांतर्गत उत्पादन वाढविणे, दीर्घकालीन आयात करार करणे आणि खरीप-रब्बी हंगामाच्या आधी पुरेसा साठा तयार ठेवणे गरजेचे आहे. त्याचबरोबर माती परीक्षणाच्या आधारे खतांचा संतुलित वापर, सेंद्रिय घटकांचा अधिक उपयोग आणि पिकानुसार अचूक मार्गदर्शन यावर भर दिला पाहिजे.

प्रत्येक जिल्ह्यात खतांची उपलब्धता आणि प्रत्यक्ष विक्री दर यांचे निरीक्षण, कृत्रिम टंचाई व जादा दराने विक्रीवर कारवाई आणि गरजेनुसार शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा देणे आवश्यक आहे. आज जागतिक बाजारात अस्थिरता निर्माण झाली की, त्याचे पडसाद काही काळात शेतकऱ्याच्या उत्पादन खर्चात उमटतात.

ही साखळी तोडण्यासाठी देशांतर्गत खतनिर्मिती आणि कच्च्या मालाची उपलब्धता वाढविणे, आयातीचे स्रोत विविध करणे आणि हंगामापूर्वी पुरेसा साठा करणे आवश्यक आहे. शेतकऱ्याला दरवाढीनंतर भरपाई देण्यापेक्षा त्याचा उत्पादन खर्च अनियंत्रित वाढणार नाही अशी व्यवस्था निर्माण करणे अधिक शहाणपणाचे ठरेल. शेतीचे उत्पन्न वाढविण्याची भाषा अर्थपूर्ण व्हायची असेल, तर प्रथम शेतीचा खर्च आवाक्यात ठेवावा लागेल.

**नवनाथे वारे**

# खाजगी सावकारी पुन्हा एकदा वाढण्याचा धोका?




देशात गरिबांसाठीच्या सूक्ष्म कर्जे क्षेत्रात खाजगी सावकारी पुन्हा एकदा वाढण्याचा धोका तयार झाला आहे! आज नसेल तर नजिकच्या काळात होईल. सहज आणि मुबलक मिळणारी सूक्ष्म कर्जे गरिबांवर व्यसनासारखे काम करतात. दारू , ड्रग्ज सारखे. नेहमी जेथून मिळते तेथून काही कारणांनी नाकारले गेले तर ते दुसरा स्रोत शोधून काढणार. काढणार म्हणजे काढणारच. मग तो त्यांना इजा करणारा का असेना !

कॉर्पोरेट जशी हात पिरागळून कर्ज s extract करतात तसे तर कोट्यवधी वित्त निरक्षर गरीब कर्जदार नाही ना करू शकत. मग एवढी लाखो कोटी रुपयांची सूक्ष्म कर्जे एवढ्या आक्रमकपणे गरिबांना पाजण्याचे काय compulsion होते यांच्यावर? विचार तर कराल..

मायक्रो फायनान्स उद्योगाच्या संघटनेने जून २०२६ पर्यंतची आकडेवारी जाहीर केली आहे. त्यानुसार या कर्जसंस्थांचे वित्तीय आरोग्य / फायनान्शियल हेल्थ सुधारली आहे. (पण गरीब कर्जगदारांचे वित्तीय आरोग्य?)

प्रत्येक मायक्रो फायनान्स देणाऱ्या कॉर्पोरेट त्यांच्या व्हिजन / मिशन स्टेटमेंट मध्ये दोन दावे करतात ; एक, आम्ही दारिद्र्य निर्मूलनासाठी काम करतो आणि आम्ही देशातील खाजगी सावकारीचे उच्चाटन करणार आहोत. वस्तुस्थिती काय आहे ?

**वरील आकडेवारीनुसार:**

१.देशातील सर्व गरिबांच्या डोक्यावरील सूक्ष्म कर्जे मार्च २०२४ अखेरीस ४,४३,००० कोटी रुपये होते ते जून २०२६ अखेरीस ३,३३,००० कोटी रुपये झाले आहे. म्हणजे तब्बल १,१०,००० कोटी रूपये कमी !

म्हणजे असे म्हणायचे का की देशातील गरिबांची उत्पन्ने एवढी वाढली आहेत की त्यांची कर्जाची गरज कमी झाली आहे.

२.याच काळात या गरीब कर्जदारांकडून सर्व कर्ज संस्थांचे मिळून एकत्रित थकित झालेल्या कर्जाचे प्रमाण ६.६ टक्क्यांवरून २.४ टक्क्यांवर आले आहे.

म्हणजे असे म्हणायचे का की गरिबांची उत्पन्ने वाढल्यामुळे गरीब आता वेळेवर कर्ज फेडू लागले आहेत

३.गेल्या दोन वर्षात जवळपास दोन कोटी गरीब कर्जदार औपचारिक सूक्ष्म कर्ज क्षेत्राच्या बाहेर गेले आहेत. मग ते कोठे गेले असतील?

सूक्ष्म कर्जसंस्थाचे वित्तीय आरोग्य सुधरण्यामागे त्यांनी कर्ज देण्याच्या धोरणात केलेले तीन प्रकारचे बदल आहेत.

अ.ज्यांनी कर्ज संस्थेकडून आधी कर्जे घेऊन फेडली आहेत अशा कर्जदारांना या कर्ज संस्था प्राधान्याने कर्जे देऊ लागल्या आहेत. किंवा ज्या गरीब कर्जदारांचा ट्रॅक रेकॉर्ड समाधानकारक नाही त्यांना या कर्जसंस्था कर्जे देता येत नाही.

आ. ज्यांच्या मुळात काही ट्रॅक रेकॉर्ड नाही / म्हणजे प्रथमच कर्ज मागणाऱ्या कर्जदाराला कर्ज नाकारले जात आहे.

इ. या कर्ज संस्था आता स्थिर कॅशफ्लो असणाऱ्या , उत्पन्नाची साधने असणाऱ्या कर्जदारांना प्राधान्यानें कर्जे देऊ लागल्या आहेत. ७५,००० रुपये ते १,००,००० रुपये कर्ज घेणाऱ्यांचे पोर्टफोलिओ मधील प्रमाण वाढत आहे. त्यामुळे गरिबांना दिलेल्या कर्जाचा सरासरी आकडा जो चार वर्षपूर्वी ३८,००० होता तो वाढून ६०,००० रुपये झाला आहे.कुटुंबाची नियमित उत्पन्ने वाढून, स्थिरावली आहेत आणि त्यामुळे त्यांची कर्जाची गरज कमी झाली आहे आणि त्यांनी डोक्यावरील कर्जे फेडली आहेत तर चांगलेच आहे. त्याची शक्यता कमी आहे.

कारण देशाच्या स्थूल अर्थव्यवस्थेबाबत आकडेवारी प्रसृत करणाऱ्या संस्था काही तरी वेगळीच स्टोरी सांगत आहेत. उदा. महागाई कमी न होणे, बेरोजगारीचे प्रमाण वाढणे, ग्रामीण अर्थव्यवस्थेतील मागणी कमी होणे, कर्जबाजारीपणामुळे होणाऱ्या आत्महत्यांचे प्रमाण वाढणे इत्यादी.छोटी कर्जे मागणारे कर्जदार तेच असतात , ज्यांच्याकडे असणारी उत्पन्नाची साधने छोटी / अनियमित / कमकुवत असतात. त्यामुळे उत्पन्न आणि खर्चात नेहमीच तफावत राहते. त्यामुळे त्यांना सतत कर्जाची गरज असते. या कर्जदारांना औपचारिक क्षेत्रातील कर्ज संस्था कर्ज नाकारत आहेत.उघड आहे हे कर्जदार आपल्या कर्जाची गरज अनौपचारिक कर्ज बाजारातील खाजगी सावकारी करणाऱ्याकडून भागवत आहेत.

म्हणजे सूक्ष्म कर्जसंस्थांचा जो दुसरा दावा होता की ते खाजगी सावकाराचे उच्चाटन करतील , तो देखील उघडा पडला आहे.आपण कोणत्या अपवादात्मक गरीब कुटुंबाच्या शोकांतिकेबद्दल बोलत नाही आहोत. तर देशातील कोट्यवधी नागरिकांबद्दल बोलत आहोत.सुटेड बुटेड प्रोफेशनल मधील बौद्धिक प्रामाणिकपणा लयाला गेला आहे. फक्त राजकारणी लोकांना शिव्या देणार? या प्रोफेशनल लोकांचे काय?

**संजीव चांदोरकर**

## आरोग्यदायी पदार्थांचा सरकारी पातळीवर अंतर्भाव

महाराष्ट्र मंत्रिमंडळाची मंगळवारी बैठक झाली होती त्या बैठकीत सरकारी बैठक कार्यक्रमातून यापुढे चहा बटाटेवडे , बिस्किटे पुरवली जाणार नाहीत. आरोग्यदायी पदार्थांचा मेनू सरकारी बैठका ,कार्यक्रम , प्रशिक्षण संस्था, परिषदा, तसेच उपहारगृहात अल्पोपहार किंवा भोजन देताना त्यात सफरचंद,केळी पपई, पेरू उकडलेली अंडी, उकडलेले कडधान्य, पोहे, इडली सांबार कोशिंबीर, विविध भाज्या भाकरी इत्यादी पदार्थ द्यावेत असे बंधन घालण्यात आले आहे . ताक तसेच साखर विरहित ग्रीन टी, गरम दूध मागणीनुसार द्यावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत . चहा कटाप करण्यात आला आहे ही बातमी नुकतीच वाचण्यात आली . अल्पोपाहारात तेलकट पदार्थांचा समावेश करू नये असे ठरविण्यात आले आहे. संबंधित कार्यालयामध्ये नवीन खानपान करारामध्ये आरोग्यदायी पदार्थांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे एकूणच महाराष्ट्र सरकारचा हा निर्णय क्रांतिकारी व कर्मचाऱ्यांच्या हिताचा आहे . चहा अशा मेनूमधून वगळला असल्यामुळे काही दिवस अवघड जाणार आहे पण हळूहळू त्याची सवय होईल असे वाटते वडे, तसेच चमचमीत पदार्थ यापुढे दिले जाणार नाहीत महाराष्ट्र सरकारचा हा निर्णय क्रांतिकारी आहे . कर्मचाऱ्यांचे आरोग्य, लक्षात घेऊन हा निर्णय घेतला असावा

**शांताराम वाघ**, पुणे

## आनंद देणारी गोकुळाष्टमी!

श्रावण वद्य अष्टमीला श्रीकृष्णाच्या देवळामध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा करतात. येत्या ४ सप्टेंबर रोजी गोकुळाष्टमी आहे. मोठ्या शहरांमधून आणि गावागावांमधून हा उत्सव साजरा होतो. भगवान श्री विष्णूने श्रीकृष्ण रूपात घेतलेल्या जन्माचा दिवस म्हणजेच गोकुळाष्टमी ! श्रीकृष्णाने त्याच्या आई-वडिलांना बंदीवासातून मुक्त करून कंसाला ठार मारले. पुढे शिशुपाल आणि जरासंध यांचाही वध केला. गौरव पांडव युद्धामध्ये कौरवांचा पराभव केला. दृष्टांच्या संहाराची स्मृती म्हणून 'गोकुळाष्टमी' हा सण साजरा केला जातो. रात्री बारा वाजता श्रीकृष्ण जन्म आणि दुसरे दिवशी पारणे साजरे करण्याची प्रथा आढळते. श्रीकृष्ण जन्माच्या दिवशी आणि गोकुळाष्टमीच्या दिवशी भगवान श्रीकृष्णाचे चैतन्य वातावरणात हजार पटीने कार्यरत असते. मनोभावे श्रीकृष्णाची भक्ती करणाऱ्या मनुष्यावर त्याची कृपा होतेच. या दिवसांमध्ये 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा नामजप खूप लाभदायी आहे. गोपाळकाला म्हणजे गोपगोपिंनी स्वतः सोबत आणलेल्या सर्व पदार्थांचा एकत्रित प्रसाद होय. आपणही आपल्या जीवनातील सर्व सुखदुःखाचे प्रसंग 'देवाने दिलेला गोपाळकाल्याचा प्रसाद आहे', असा विचार ठेवला तर आपले आयुष्य आपल्याला सकारात्मकपणे निश्चितपणे स्वीकारता येईल आणि आनंदही गोप-गोपींच्या प्रमाणे अनुभवता येईल यात शंकाच नाही !

**आदिती देखणे**

## बिहारमध्ये आता नापास ऐवजी 'कौशल्य विकास'

बिहार सरकारने इयत्ता १० वी आणि १२ वीच्या गुणपत्रिकेवरून (मार्कशीट) 'नापास' (फेल) हा शब्द काढून टाकण्याचा निर्णय घेतल्याचे वृत्त आहे 'नापास' ऐवजी गुणपत्रिकेवर 'कौशल्य प्रशिक्षणासाठी पात्र' असा उल्लेख केला जाणार आहे विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण आणि कौशल्य विकास कार्यक्रमांशी जोडणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे 'विद्यार्थ्यांची प्रतिभा केवळ परीक्षेत अपेक्षित गुण मिळवण्यात अपयशी ठरत नाही.' म्हणूनच विद्यार्थ्यांवर अपयशाचा शिक्का मारण्याऐवजी त्यांना नव्या संधी देण्यासाठी घेतलेला बिहार सरकारचा निर्णय निश्चितच स्वागतार्ह म्हणावा लागेल आज भारत सरकार कौशल्य आधारित शिक्षण देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे सर्वकाही आपल्याच देशात निर्माण व्हावे अर्थात आत्मनिर्भर भारत संकल्पनेमुळे आर्थिक, तंत्रज्ञान, व उत्पादनाच्या क्षेत्रात स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी बनवणे ही एक महत्त्वाची राष्ट्रीय संकल्पना आहे त्यामुळे आगामी काळात देशात कौशल्य आधारित शिक्षणाला महत्व येण्याचे संकेत मिळत आहेत तीच दिशा ओळखून बिहार सरकारने कौशल्य शिक्षणाला महत्व देण्यासाठी मॅट्रिक आणि इंटरमीडिएट म्हणजे दहावी, बारावी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण विभागाने मोठा निर्णय घेतला आहे त्यानुसार आता यापूढे विद्यार्थ्यांच्या गुणपत्रकावर नापास (फेल) हा शब्द लिहिला जाणार नाही त्याऐवजी कौशल्य विकासासाठी पात्र असा उल्लेख केला जाणारे आहे त्यामुळे बिहार सरकारचा हा निर्णय निश्चितच विद्यार्थ्यांना बळ देणारा आणि स्वयंपूर्ण, स्वावलंबी बनवणारा आहे.


**राजू जाधव**

## पंजाब विद्यापीठात 'जेन-झी' चा नॅरेटिव्हला धक्का

पंजाब विद्यापीठ विद्यार्थी संघटना निवडणुकीत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने मिळवलेला विजय केवळ एका कॅम्पसपुरता मर्यादित नसून, त्याचे व्यापक राजकीय आणि सामाजिक पडसाद उमटताना दिसत आहेत.विरोधकांच्या 'नॅरेटिव्ह'ला छेद: जंतर-मंतरवरील आंदोलने आणि 'नीट' पेपरफुटीच्या प्रकरणांनंतर देशातील तरुण वर्ग केंद्र सरकार आणि सत्ताधारी पक्षावर प्रचंड नाराज असल्याचा दावा केला जात होता. मात्र, राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील असलेल्या पंजाब विद्यापीठात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद चा विजय या दाव्यांना थेट आव्हान देतो.'नीट' प्रकरणासारख्या संवेदनशील मुद्द्यांनंतरही तरुणांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद च्या नेतृत्वावर विश्वास दाखवला आहे. यावरून राष्ट्रीय स्तरावरील आंदोलने किंवा सोशल मीडियावरील नॅरेटिव्ह हे थेट जमिनीवरील किंवा कॅम्पसमधील जनमताचे पूर्ण प्रतिनिधित्व करत नाहीत, हे स्पष्ट होते. पंजाबमध्ये भाजप आपली स्वतंत्र राजकीय जमीन शोधण्याचा प्रयत्न करत आहे. अशा स्थितीत राज्यातील एका अत्यंत महत्त्वाच्या शैक्षणिक आणि वैचारिक केंद्रात मिळालेला हा विजय भाजप आणि संघ परिवारासाठी आगामी राजकीय रणनीतीच्या दृष्टीने अत्यंत दिलासादायक आणि बळ देणारा ठरतो.एकंदरीत, राष्ट्रीय स्तरावर केंद्र सरकारविरोधात झेनर्जी ची नकारात्मक लाट असल्याचा जो दावा केला जात होता, पंजाब विद्यापीठातील निकालांनी त्याला मोठा धक्का दिला आहे. तरुणांचा एक मोठा वर्ग अजूनही आणि त्यांच्या विचारसरणीशी जोडलेला आहे, हेच या निकालांतून अधोरेखित होते.

**अविनाश देशपांडे**

## फुटबॉलच्या आकाशातील तेजस्वी तारा; लिओनेल मेस्सी



जगभरातील फुटबॉलप्रेमींसाठी ३१ ऑगस्ट २०२६ हा दिवस भावूक करणारा ठरला. अर्जेंटिनाचा महान फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी याने तब्बल दोन दशकांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीनंतर राष्ट्रीय संघातून निवृत्ती जाहीर केली. मेस्सीने संपूर्ण फुटबॉलला अलविदा केलेला नसून, त्याचा हा निर्णय केवळ अर्जेंटिनाच्या राष्ट्रीय संघापुरता आहे. तो इंटर मियामीकडून क्लब फुटबॉलमध्ये खेळत आहे. रोझारियोच्या मातीतून फुटबॉलच्या विश्वात आलेल्या मेस्सीने आपल्या अद्भुत कौशल्याने, अचूक पासिंगने, वेगवान ड्रिब्लिंगने आणि गोल करण्याच्या विलक्षण क्षमतेने जगाला अक्षरशः मंत्रमुग्ध केले. २००५ मध्ये अर्जेंटिनाकडून आंतरराष्ट्रीय पदार्पण केल्यानंतर त्याने २०७ सामने खेळत १२५ गोल केले. तो अर्जेंटिनाचा सर्वाधिक सामने खेळणारा आणि सर्वाधिक गोल करणारा खेळाडू ठरला. मेस्सीच्या कारकिर्दीत यशाबरोबरच अपयशाचीही अनेक पाने होती. २०१४ च्या विश्वचषकातील अंतिम सामन्यातील पराभव आणि कोपा अमेरिका स्पर्धेतील अपयशानंतर त्याच्यावर मोठी टीका झाली. मात्र त्याने हार मानली नाही. २०२१ मध्ये कोपा अमेरिका, २०२२ मध्ये कतार विश्वचषक आणि २०२४ मध्ये पुन्हा कोपा अमेरिका जिंकून त्याने टीकाकारांना आपल्या कामगिरीने उत्तर दिले. २०२२ च्या विश्वचषक विजयाने तर त्याच्या कारकिर्दीला सुवर्णमुकुट मिळाला. २०२६ च्या विश्वचषकातही मेस्सीने अर्जेंटिनाला अंतिम फेरीपर्यंत नेले. मात्र स्पेनविरुद्धच्या अंतिम सामन्यात अर्जेंटिनाला पराभव पत्करावा लागला. त्यानंतर मेस्सीने राष्ट्रीय संघातून बाजूला होण्याचा निर्णय घेतला. वयाची ३९ वर्षे, प्रदीर्घ कारकीर्द आणि नव्या पिढीला संधी देण्याची वेळ आली आहे, या जाणिवेतून त्याने हा निर्णय घेतला.

मेस्सीचा अर्जेंटिनाच्या जर्सीतील प्रवास आता संपला असला तरी त्याच्या पायातील जादू आणि मैदानावरील आठवणी कायम राहतील. अर्जेंटिनासाठी त्याने दिलेले योगदान, देशाला मिळवून दिलेली विश्वचषकाची ऐतिहासिक भेट आणि फुटबॉलप्रेमींच्या मनात निर्माण केलेली असंख्य अविस्मरणीय क्षणे यामुळे मेस्सी हा केवळ एक महान खेळाडू नव्हे, तर फुटबॉलच्या इतिहासातील एक अमिट अध्याय म्हणून सदैव स्मरणात राहील.मेस्सी राष्ट्रीय संघातून निवृत्त झाला आहे; पण त्याची जादू अजून संपलेली नाही. मैदानावरील त्याच्या पावलांचे ठसे पुसणे फुटबॉलच्या इतिहासालाही शक्य होणार नाही.

**श्याम ठाणेदार**

गुरूवार, दि. ३ सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# जिल्हा बँक निवडणुकीच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह!

## मतदार यादी पासून संचालकांच्या पात्रता व आर्थिक स्थितीवरही संतोष बोरेले यांची सरबत्ती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २ :** यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सन २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी होणाऱ्या निवडणुकीची प्रक्रिया वादाच्या भोवऱ्यात सापडण्याची चिन्हे आहेत. मतदारसंघ रचना, अंतिम मतदार यादी, संचालकांची पात्रता आणि बँकेच्या आर्थिक स्थितीवर गंभीर प्रश्न उपस्थित करीत नगरसेवक तथा यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बचाव संघर्ष समितीचे अध्यक्ष संतोष बोरेले यांनी निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्याची मागणी केली आहे.

शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोरेले यांनी निवडणूक प्रक्रियेतील विविध बाबींवर आक्षेप नोंदवत संबंधित यंत्रणेला सवाल केले. त्यांच्या मते, मतदारसंघ रचना 'क' मधील गट क्रमांक १, २, ३ आणि ४ यांना मॉडेल बायलॉजनुसार स्वतंत्र प्रतिनिधित्व मिळणे अपेक्षित असताना सुधारित उपविधीत चारही गटांसाठी एकत्रित चार प्रतिनिधी असा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित गटांच्या स्वतंत्र प्रतिनिधित्वावर परिणाम होण्याची शक्यता असल्याचा दावा त्यांनी केला. दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अंतिम मतदार यादीवरही बोरेले यांनी गंभीर आक्षेप घेतला. त्यांच्या दाव्यानुसार, यादीत सुमारे ३२५ मयत मतदारांची नावे, काही अपात्र सभासद संस्थांची नावे तसेच काही वैयक्तिक मतदारांची अपूर्ण नावे आहेत. मयत आणि अपात्र मतदारांची नावे तत्काळ वगळून त्रुटी विरहित व पारदर्शक मतदार यादी प्रसिद्ध करावी, अशी मागणी त्यांनी केली.आर्थिक स्थितीबाबत चिंता व्यक्त करीत अंदाजे ४१४ कोटींच्या निव्वळ तुटीचा दावा आणि एनपीए ५२ टक्क्यांपर्यंत असल्याचे बोरेले यांचे म्हणणे आहे.



**'दहा वर्षांहून अधिक संचालक' पात्रतेवर सवाल**

दहा वर्षांपेक्षा अधिक काळ संचालक म्हणून कार्यरत असलेल्या व्यक्तींच्या पात्रते बाबतही बोरेले यांनी प्रश्न उपस्थित केला. बँकिंग रेग्युलेशन ॲक्टमधील संबंधित तरतुदींचा निवडणूक प्रक्रियेत योग्य विचार झाला नसल्याचा आरोप त्यांनी केला. या मुद्द्यावर सहकार विभागाच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्याचा इशाराही त्यांनी दिला.

**बँकेच्या आर्थिक आरोग्याचे काय?**

३१ मार्च २०२६ रोजीच्या बॅलन्सशीटच्या प्राथमिक विश्लेषणाचा दाखला देत बोरेले यांनी बँकेच्या आर्थिक स्थिती वरही गंभीर चिंता व्यक्त केली. विविध देणी-येणी, कर्जवसुली आणि एनपीए चा विचार करता अंदाजे ४१४ कोटी रुपयांची निव्वळ तूट असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच बँकेचा एनपीए जवळपास ५२ टक्के असल्याचेही त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. मात्र, ही आकडेवारी बोरेले यांनी केलेल्या प्राथमिक विश्लेषणावर आधारित असून तिची बँकेच्या अधिकृत आर्थिक अहवालातून स्वतंत्र पडताळणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत अधिकृत स्पष्टीकरण समोर येणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**राजकीय हस्तक्षेपाला लगाम घालण्याची मागणी**

बँकेच्या निवडणुकीत राजकीय हस्तक्षेप न होता शेतकरी, ठेवीदार, कर्मचारी आणि बँकेच्या हिताला प्राधान्य देणारे संचालक निवडले जावेत, अशी मागणी बोरेले यांनी केली. काही राजकीय नेत्यांकडून स्वहितासाठी नियमबाह्य पद्धतीने उपविधी मंजूर करून घेण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. निवडणुकीत मतदारांना प्रलोभने दिली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. मात्र, या आरोपांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेतील सर्व आक्षेपांची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी त्यांनी केली. जिल्हा बँकेची निवडणूक कोणत्याही दबावा शिवाय, नियमबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने पार पडावी. मतदार संघांना न्याय मिळावा आणि बँकेच्या कारभारात शेतकरी, ठेवीदार व कर्मचाऱ्यांचे हित केंद्रस्थानी राहावे, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका संतोष बोरेले यांनी मांडली.

## तरुणाने गळफास लावून केली आत्महत्या

**पुसद, दि. २ :** शहर पोलीस स्टेशन हद्दीतील हॉटेल रामकृष्ण मध्ये एका २० वर्षीय तरुणाने गळफास लावून आत्महत्या केल्याने एकच खळबळ उडाली. यात प्राप्त माहितीनुसार दिनांक २ संप्टेंबर २०२६ रोजी रात्री २ वाजताचे सुमारास आतिष सिद्धार्थ धुळे वय २० वर्ष या तरुणाने कारला रोडवरील हॉटेल रामाकृष्ण मधील एका रूममध्ये सिलिंग फॅनला एका ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली परंतु मृतक आतिष याचे पाय रूममधील पलंगाला टेकल्याचे दिसत होते. सदर घटनेची माहिती पुसद शहर पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला व आतिष चा मृतदेह उपजिल्हा रुग्णालय पुसद येथे शवविच्छेदनाकरिता पाठविण्यात आला. आतिष याने गळफास लावून आत्महत्या का केली याचे कारण मात्र अदयापही अस्पष्ट आहे सदर घटनेचा तपास ठाणेदार क्षीरसागर व पोलीस कर्मचारी हे करीत आहेत.



## रेती तस्करांना महसूलचा दणका! दोन ट्रॅक्टर जप्त

**महागाव , दि. २ :** तालुक्यात सुरू असलेल्या अवैध रेती उपसा व वाहतुकीला आळा घालण्यासाठी महसूल विभागाने आता धडक कारवाईचे हत्यार उपसले आहे. हिवरा आणि जनुना येथे करण्यात आलेल्या कारवाईत अवैध रेती वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पकडून प्रत्येकी एक ब्रास रेती जप्त करण्यात आली. या कारवाईमुळे रेती तस्करांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे. प्रशिक्षणार्थी उपविभागीय अधिकारी ओमकार एकाळे आणि तहसीलदार अभय मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी गोविंद ठाकरे, बाळासाहेब माने, महसूल सहाय्यक दीपक चव्हाण व अक्षय बोनगुलवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# स्वातंत्र्यसैनिकांच्या सन्मानाची उपेक्षा..!

## २ ऑक्टोबरला सन्मानपत्रे जिल्हाधिकाऱ्यांकडे परत करणार - नंदकुमार बुटे

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २ :** स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण केवळ राष्ट्रीय सणांच्या दिवशी अभिवादनापुरतीच ठेवायची आणि त्यांच्या स्मृती जपण्यासाठी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी मात्र वर्षानुवर्षे रखडवायची, असा आरोप करीत स्वातंत्र्य संग्राम सैनिक पाल्य समितीने प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.



शासनाकडून स्वातंत्र्यसैनिकांना प्रदान करण्यात आलेली सन्मानपत्रे येत्या २ ऑक्टोबर २०२६ रोजी गांधी जयंतीदिनी जिल्हाधिकाऱ्यांकडे परत करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे. समितीचे प्रमुख नंदकुमार बुटे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. जिल्ह्यात एकूण ५३२ स्वातंत्र्यसंग्राम सैनिक असून, यवतमाळ शहरात २९८ तर तालुक्यांमध्ये २३४ सैनिक आहेत. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी विविध मार्गांना स्वातंत्र्यसैनिकांची नावे देणे, स्मृतिफलक उभारणे, लोकनायक बापूजी अणे यांच्या पुतळ्यामागील उद्यानात सर्व स्वातंत्र्यसैनिकांची नावे लावून सुशोभीकरण करणे, रंगुबाई नाईक (मिडवाईफ) यांच्या नावाने मातृपीठ उभारणे तसेच पृथ्वीगिर हरीगिर गोसावी यांच्या समाधीस्थळाचे सुशोभीकरण करण्याचे निर्णय घेण्यात आले होते. मात्र, वारंवार पाठपुरावा करूनही ही कामे प्रलंबित असल्याचा आरोप पाल्य समितीने केला आहे. विशेषतः स्वातंत्र्यपूर्व काळातील शस्त्रे, छपाई यंत्रे, चरखे, जुने फोटो, पत्रके, लेखन साहित्य तसेच सुभाषचंद्र बोस यांचे भाषण प्रसारित करणारा रेडिओ अशा दुर्मीळ वस्तूंचे संग्रहालय उभारण्याचा प्रस्तावही रखडला आहे. या वस्तू गेल्या चार वर्षांपासून नगरपालिकेत धूळखात पडल्याने त्या नष्ट होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. नगरपालिकेने ११ मे २०२२ आणि १३ ऑगस्ट २०२५ रोजी संग्रहालयाबाबत ठराव केले असून, तांत्रिक मंजुरीसाठी निधी जमा करूनही कार्यारंभ आदेश देण्यात आलेला नसल्याचे समितीचे म्हणणे आहे. २ ऑक्टोबर रोजी आझाद मैदानातून सन्मानपत्रांची मिरवणूक काढून ती जिल्हाधिकारी कार्यालयात समर्पित करण्यात येणार आहे. त्यापूर्वी एक महिन्यात संग्रहालय, मातृपीठ, स्मृतिफलक, अभिवादन ग्रंथ भाग-२ तसेच समाधीस्थळ सुशोभीकरणाची कामे पूर्ण करावीत आणि चार वर्षांच्या कामकाजाचा कार्यपूर्ती अहवाल जाहीर करावा, अशी मागणी समितीने केली आहे.

# पोलीस स्टेशन घाटंजी तर्फे बाल गणेश मंडळाचा सत्कार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**घाटंजी , दि. २ :** घाटंजी पोलिस स्टेशनच्या प्रांगणात दिनांक १.९.२०२६ रोजी गणेश मंडळांची शांतता बैठक उत्साहात पार पडली. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासह शांततामय वातावरणात उत्सव साजरा करण्याबाबत पोलिस प्रशासनाकडून मंडळांना मार्गदर्शन सुचना करण्यात आल्या.



यात डीजेच्या कर्कश आवाजाला 'ब्रेक' लावा व पारंपारिक वाद्य लावून मैदानी साहसिक कृतीचे खेळ व समाजात सलोखा राहील असे संदेश देत उत्साहात पण सामाजात तेढ निर्माण होणार नाही यांची मंडळांनी खबरदारी घ्या. गणेशोत्सव साजरा करा पण, त्याला कुठलेही गालबोट लागता कामा नये असे आवाहण घाटंजी पोलिस स्टेशनचे ठाणेदार केशव ठाकरे यांनी गणेश मंडळांना केले. सोबतच मागिल वर्षी जिल्हास्तरीय बक्षीसपात्र मंडळ यात सार्वजनिक गणेशउत्सव मंडळ व नेहरु नगर येथिल बाल गणेश उत्सव मंडळ व ग्रामिण भागातील एक मंडळ यांनी उत्सव काळात उत्तम समाजसेवी संदेश देत उत्साहात गणेश उत्सव साजरा करुन जिल्हास्तराव बक्षीस पात्र ठरल्याबद्दल या शांतता बैठकीत सन्मान करत प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले . आगामी गणेशोत्स व दूर्गा उत्सव लक्षात घेत येणारी उत्सव ही सामाजिक एकोपा व धार्मिक श्रद्धेचा उत्सव असल्याने तो शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. उत्सव मिरवणुकीदरम्यान वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, याची काळजी घेण्यासह मंडळांनी स्वयंशिस्त पाळावी, सामाजिक सलोखा कायम ठेवावा आणि कोणत्याही प्रकारच्या अनुचित प्रकाराला थारा देऊ नये, असेही पोलिस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.यावेळी पोलिस प्रशासन आणि गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये विविध विषयांवर चर्चा झाली. आगामी गणेशोत्सव शांतता, शिस्त, सामाजिक सलोखा आणि भक्तिमय वातावरणात पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आश्वासन सर्व उपस्थित मंडळ पदाधिकारी यांनी दीले. उपस्थितांना मार्गदर्शन करताना पोलिस स्टेशन घाटंजीचे एपीआय सचिन राठोड़,अमोल कोवे,दिनेश जाधव सह पोलिस प्रशासन कर्मचारी उपस्थित होते.

## थोडक्यात



### मराठा सेवा संघाने सामाजिक उपक्रम राबवून केला वर्धापन दिन साजरा

**यवतमाळ :** मराठा सेवा संघाचा वर्धापन दिन दि. १ सप्टेंबर रोजी सामाजिक उपक्रम राबवून उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी शिवतीर्थ,यवतमाळ येथे राष्ट्रमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. प्रभाकर काळमेघ, गौरी अशोक थोरात, व ज्ञानेश्वर गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर वर्धापन दिनानिमित्त सामाजिक उपक्रम म्हणून "आम्ही साऱ्या सावित्रीच्या लेकी" आदिवासी बहुउद्देशीय संस्था,वाघाडी, यवतमाळ येथे पारधी समाजातील मुलींना कपडे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेच्या वतीने पपीता माळवे व प्रा.सविता हजारे उपस्थित होत्या. या कार्यक्रमाला मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड, गौरी थोरात, नंदकुमार बुटे,चंद्रशेखर कुडूपले, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा निशाताई बुटले, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अभिलाष खंडारे,सुनील कडू, जिल्हासचिव शशिकांत खडसे, शोभा पारधी, वैशाली सवाई, विद्या खडसे, अर्चना देशमुख,अनिता गरड, डॉ.कल्पना कोरडे, स्नेहा निंबाळकर, स्नेहल रेचे, हरीश कुडे, अशोक महल्ले, पुंडलिक बुटले, सतीश काळे, प्रा.पंढरी पाठे, सचिन मनवर, प्रद्युम्न जवळेकर, निरज डफळे, सचिन डफडे, किशोर राऊत, अनिकेत आगलावे, नरेंद्र कदम, उदय सरताबे,आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन प्रवीण भोयर यांनी केले.



### कायदा-सुव्यवस्था प्रभावी कामगिरी..!

**ठाणेदार सदानंद वानखेडे यांचा संघर्ष समितीतर्फे सत्कार**

**महागाव :** महागाव शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी प्रभावी कामगिरी करणारे महागाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार सदानंद वानखेडे यांचा जन आंदोलन आधार संघर्ष समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. समितीच्या शिष्टमंडळाने ठाणेदार वानखेडे यांची सदिच्छा भेट घेत पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव केला.

शहरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांचे यावेळी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी कौतुक केले. मात्र, भविष्यात कायदा-सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राखण्यासाठी रात्रीची गस्त वाढविणे, संवेदनशील भागात पोलिसांची उपस्थिती वाढविणे तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना तत्काळ राबविण्याची मागणी शिष्टमंडळाने केली. यावेळी महागाव शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या विविध प्रश्नांवर ठाणेदार वानखेडे यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्वसामान्य नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर व निष्पक्ष भूमिका घेण्याची अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. यावेळी जन आंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश नरवाडे, सत्य साई समिती महागावचे तालुका अध्यक्ष डॉ. भेंडे, सुधीर पोदुटवार, डॉ. बेलगमवार, सुदाम खंदारे, चेतन चौरे, वैद्यकीय कर्मचारी राहुल जाधव, गजानन मोरे व चिन्मय मंगेश वानखेडे आदी उपस्थित होते.

### कंत्राटदार गजू देवकते यांच्या मृत्यूची सखोल चौकशी करा..!

**पुसद :** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयीन परिसरात महाराष्ट्र राज्य कंत्राटदार संघटना, यवतमाळ जिल्ह्याच्या वतीने स्वर्गीय गजू देवकते यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी त्यांच्या मृत्यूची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी कंत्राटदारांनी केली.

गजू देवकते हे शासकीय कंत्राटदार होते. मुंबई बांधकाम विभागाशी संबंधित त्यांच्या कामाचे सुमारे दोन कोटी रुपयांचे बिल प्रलंबित असल्याचे सांगण्यात आले. या बिलाच्या देयकासाठी संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून कथितरीत्या पैशांची मागणी करण्यात आल्याचा आरोप उपस्थित कंत्राटदारांनी केला. आर्थिक व मानसिक त्रासाला कंटाळून त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती यावेळी देण्यात आली. राज्य उपाध्यक्ष राजू आसेगावकर, जिल्हाध्यक्ष अन्वर अली यांनी कंत्राटदारांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन केले. "कंत्राटदार एकजुटीने त्यांच्या कुटुंबासोबत आहेत," असा विश्वासही त्यांनी दिला. प्रलंबित देयके तातडीने अदा करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी प्रदीप जाधव, संजय तांबेकर, वैभव बजाज, योगेश पांडे, मिलिंद देशमुख यांच्यासह अनेक कंत्राटदार उपस्थित होते.

# डीजे चा दणदणाट नको गणेशोत्सव शांततेतच साजरा करा!

## नियम तोडणाऱ्या मंडळांवर कारवाईचा इशारा, गणेश मंडळांची शांतता समिती बैठक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**फुलसावंगी, दि. २ :** आगामी बैलपोळा, गणेशोत्सव, गौरी-गणपती व नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर फुलसावंगी पोलीस चौकीच्या प्रांगणात शांतता समितीची बैठक घेण्यात आली. सण-उत्सवांच्या काळात सामाजिक सलोखा व कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे आवाहन करत डीजेच्या दणदणाटाला आळा घालण्याच्या सूचना पोलिस प्रशासनाने गणेश मंडळांना दिल्या.



उमरखेड चे नवनियुक्त उपविभागीय पोलीस अधिकारी आयपीएस गौरव कायंदे-पाटील यांनी बैठकीत मार्गदर्शन केले. सण-उत्सव हे समाजाला एकत्र आणणारे आनंदाचे पर्व असल्याने सर्व समाजाला सोबत घेऊन उत्सव शांततेत, सलोख्याने व बंधुभावाने साजरा करावा, असे त्यांनी सांगितले. महागाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सेवानंद वानखेडे यांनीही गणेश मंडळांच्या अध्यक्ष, पदाधिकारी व सदस्यांना विविध सूचना दिल्या. बीटमधील ९ गावांतील सार्वजनिक गणेश मंडळांच्या प्रतिनिधींना ध्वनीप्रदूषण टाळण्याचे निर्देश देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करून डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करावा आणि पारंपरिक वाद्यांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले. नियमांचे उल्लंघन करून डीजे वाजविणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशाराही पोलिसांनी दिला. दरम्यान, फुलसावंगी येथे वाढती लोकसंख्या व सुरक्षेच्या दृष्टीने स्वतंत्र पोलीस चौकी सुरू करण्याची मागणी बाबुराव व्हडगीरे, विजयराव महाजन, समशेर लाला, कुणाल नाईक, योगेश वाजपेयी आदींनी केली. बैठकीस पोलीस पाटील, सरपंच, गणेश मंडळांचे पदाधिकारी व परिसरातील शेकडो नागरिक उपस्थित होते.

# स्कूल ठीक करो' अभियानातून शासकीय शाळांचा कारभार तपासणार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २ :** शासकीय शाळांमधील मूलभूत सुविधांचा अभाव, शिक्षकांची कमतरता, अस्वच्छता आणि विद्यार्थ्यांची घटती पटसंख्या या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कॉक्रोच जनता पार्टीच्या पश्चिम विभागाच्या वतीने 'स्कूल ठीक करो' अभियान राबविण्याचा निर्धार करण्यात आला. याच अनुषंगाने यवतमाळ येथील शासकीय विश्रामगृहात पक्षाची बैठक घेण्यात आली.



पक्षाचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीतील जंतर-मंतर येथे शासकीय शाळांच्या सुधारणांसाठी आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनातील मागण्या मान्य झाल्याने आंदोलन स्थगित करण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. शासनाकडून शाळांसाठी मिळणारा निधी प्रत्यक्ष शाळांच्या विकासावर खर्च व्हावा, विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा मिळाव्यात आणि शाळांमधील गळतीचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला. 'स्कूल ठीक करो' अभियानांतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील विविध शासकीय शाळांना भेटी देऊन तेथील वस्तुस्थितीची पाहणी केली जाणार आहे. शिक्षकांची उपलब्धता, स्वच्छता, स्वच्छतागृहे, शैक्षणिक सुविधा तसेच निधीचा वापर याबाबत माहिती घेऊन संबंधित प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येणार आहेत. यवतमाळ शहरातील भोसा परिसरातील एका शाळेची पटसंख्या पूर्वी सुमारे ३०० होती. ती आता मोठ्या प्रमाणात घटल्याचा मुद्दाही बैठकीत उपस्थित करण्यात आला. यावेळी आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनालाही पक्षाने पाठिंबा जाहीर केला. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे आश्वासन देण्यात आले. बैठकीला डॉ. नितीन दिघे, ॲड. जयसिंग शेरे, निलाक्षी वानखेडे, मयुर मालखेडे, माहिया गौरखेडे, प्रकाश भिसे, आदेश चिकराम, सामाजिक कार्यकर्ते संजय बोरकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत 'स्कूल ठीक करो' अभियान, संघटनात्मक बांधणी आणि सदस्यता नोंदणी या विषयांवर चर्चा करण्यात आली.

# मातंग समाजाचा जन आक्रोश मोर्चा उपविभागीय कार्यालयावर धडकला

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. २ :** अनुसूचित जातीतील अविकसित जातींचे अ ब क ड अशा पद्धतीने उपवर्गीकरण करण्यात यावे यासाठी आज मातंग समाजाच्या वतीने माजी आमदार नामदेव ससाणे यांच्या नेतृत्वात जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला . स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणातून सदर मोर्चा शहरातील मुख्य चौकातून तसेच छत्रपती शिवाजी महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर , महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमा व पुतळ्याला हार अर्पण करून महागाव रस्त्यावरून मोर्चा उपविभागीय कार्यालयावर धडकला . शहरातील प्रमुख मार्गाने डपड्याच्या निनादात तसेच रथामध्ये महामानवांच्या प्रतिमा ठेवून शिस्तबद्ध पद्धतीने मोर्चा काढण्यात आला . हजारोंच्या संख्येने मातंग समाज बांधव व भगिनी मोर्चामध्ये सामील झाले होते .सदर मोर्चा महिलांची संख्या लक्षणीय होती .



उपविभागीय कार्यालयावर मोर्चा धडकल्यानंतर मोर्चाचे रूपांतर सभेमध्ये होऊन या ठिकाणी उपस्थित बांधव व भगिनींना मान्यवरांनी मार्गदर्शन केले . यावेळी बोलताना माजी आमदार नामदेव ससाने यांनी उपवर्गीकरणच्या आंदोलनाचा केंद्रबिंदू उमरखेड असून वंचित समाजातील घटकांचा विकास करण्यासाठी मातंग समाज कटिबद्ध असल्याचे सांगितले .अनुसूचित जातीतील ५९ जातींचा विकास करण्यासाठी १९८७ मध्ये बार्टीचा उदय झाला परंतु त्यांनी व्यवस्थित न्याय दिला असता तर मातंग समाजाला मोर्चे काढण्याची गरज नव्हती असे सांगत बार्टीच्या माध्यमातून ८९.६९ टक्के लाभ एकट्या बौद्ध समाज म्हणजे मोठ्या भावाने घेतला .यासाठी त्यांनी मातंग समाज हाच जबाबदार असल्याचे सांगितले .मातंग समाजासाठी आरटीची स्थापना तसेच लहुजी साळवे यांचे स्मारकासाठी जागा व अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचे काम ते फडणवीस सरकारच्या झाल्याचा त्यांनी आवर्जून संगत उपवर्गीकरणाच्या विरोधात निघाल्या मोर्चामध्ये विरोधकांनी केलेल्या आरोपांचा त्यांनी समाचार घेतला . यावेळी मातंग समाजाचे मारोतराव वाडेकर , गणपत भिसे ,के डी पवार , धृपताबाई कांबळे ,संजय कंठाळे , के मूर्ती , डॉ अंकुश गोतावळे ,विजय रणखांब ,गुणवंत काळे ,लहुजी सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे यांनी समायोजित मार्गदर्शन केले . यावेळी उपस्थित मार्गदर्शकांनी अनुसूचित जातीतील सर्वात मोठा भाऊ असलेल्या बौद्ध समाज व मातंग समाजामध्ये पन्नास हजाराचा फरक असताना जास्त लाभ मोठा भाऊ म्हणून बौद्ध समाज घेत असल्याचे सांगितले .मातंग समाजाच्या मोर्चावर विरोधक सदर कटकारस्थान हे आरएसएस व भाजपचे असल्याचे सांगतात परंतु आरएसएस व भाजपाच्या जन्मा अगोदर उपवर्गीकरणाची मागणी असल्याचे सांगत आरक्षणाच्या आडून मोठ्या भावाचा मुखवटा घालून अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाला विरोध सुरू असल्याचे सुद्धा सांगितले . यावेळी उमरखेड तालुक्यातून मोठ्या प्रमाणात मातंग समाज या जनक मोर्चामध्ये सामील झाला होता .सभेचे प्रास्ताविक दत्तात्रय काळे यांनी केले तर सूत्रसंचालन राजू गायकवाड व जय बनसोडे यांनी तर आभार कृष्णा लामटिळे यांनी मानले .

# मोहदा येथे अवैध दारू विक्रीवर पोलिसांचा छापा; २५ हजारांचा मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २ :** पांढरकवडा पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाने पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मोहदा येथील आठवडी बाजार परिसरात अवैध दारू विक्रीवर छापा टाकून २५ हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत आरोपी अमोल महेश्वर दरवकर (वय ३७, रा. वॉर्ड क्र. २, मोहदा) याच्याकडून विदेशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. यामध्ये रॉयल स्टॅगच्या १८० मिली क्षमतेच्या ४० बाटल्या, किंमत १० हजार रुपये, तसेच मास्टर डिलाइटच्या १८० मिली क्षमतेच्या ६६ बाटल्या, किंमत ९ हजार ९०० रुपये आणि दारू विक्रीतून मिळालेली ५३० रुपये रोख रक्कम असा एकूण २५ हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल पंचनामा करून जप्त करण्यात आला.



याप्रकरणी फिर्यादी पोलीस हवालदार विलास जाधव यांच्या लेखी रिपोर्टवरून आरोपीविरुद्ध कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेश ढकवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक एल.डी. तावरे यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशीर, एस.फो. प्रमोद जन्नुकर, पोलीस हवालदार विलास जाधव, नापोका सुनील राठोड, सचिन काकडे व पोलीस शिपाई राजू मुत्यालवार यांनी केली.

# उद्यान विभागातील 'मक्तेदारी'ला बसणार चाप!

## आयुक्त मंगेश गोंदावले यांचे थेट आदेश; २०० उद्यानांसाठी लवकरच ई-टेंडरिंग

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिकेच्या उद्यान विभागातील ठेक्यांवर वर्षानुवर्षे मोजक्या ठेकेदारांचे असलेले वर्चस्व आता संपुष्टात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सुमारे २०० उद्यानांच्या देखभालीसाठी लवकरच ई-टेंडरिंग प्रक्रिया राबविण्याचे थेट आदेश आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी दिले आहेत. त्यामुळे ठराविक ठेकेदार आणि संबंधित यंत्रणेतील अधिकाऱ्यांचे मनोबल कमी होऊन खुल्या स्पर्धेला चालना मिळणार आहे.

**एका ठेकेदाराकडे ३०, दुसऱ्याकडे २५, तर तिसऱ्याकडे १५ उद्याने?**

उद्यान विभागातील कामांच्या वाटपावरून यापूर्वी अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. एका ठेकेदाराकडे तब्बल ३० उद्याने, दुसऱ्याकडे २५, तर तिसऱ्या ठेकेदाराकडे १५ उद्यानांची देखभाल असल्याची चर्चा आहे. त्यामुळे मोजक्याच ठेकेदारांच्या हातात मोठ्या प्रमाणावर कामे केंद्रित झाल्याचे चित्र दिसून येते.याशिवाय अनेक उद्यानांच्या देखभालीसाठी एकसारखे दर निश्चित असतानाही कामांचे वाटप नेमक्या कोणत्या पद्धतीने होते, याबाबतही पारदर्शकतेचा प्रश्न उपस्थित होत आहे. या संपूर्ण प्रक्रियेची खुली स्पर्धा आणि ई-टेंडरिंगच्या माध्यमातून पुनर्रचना झाल्यास ठेकेदारांच्या मक्तेदारीला आळा बसण्याची शक्यता आहे.



**बेरोजगार संस्थांना मिळणार संधी**

ई-टेंडरिंगमुळे केवळ मोजक्या ठेकेदारांपुरती मर्यादित राहिलेली कामे खुल्या स्पर्धेत येणार आहेत. त्यामुळे पात्र असलेल्या लहान ठेकेदारांसह बेरोजगार संस्था आणि नव्या संस्थांनाही काम मिळविण्याची संधी निर्माण होणार आहे.आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्या या निर्णयामुळे उद्यान विभागातील कामकाजात पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. अनेक वर्षांपासून उद्यान विभागात ठराविक ठेकेदारांचे वर्चस्व असल्याच्या चर्चांना आता ई-टेंडरिंगच्या निर्णयामुळे पूर्णविराम मिळण्याची शक्यता आहे.

**'एकाला' नव्हे, खुल्या स्पर्धेला प्राधान्य**

'आता कोणत्याही एका व्यक्तीला किंवा संस्थेला ठेका दिला जाणार नाही. सुमारे २०० उद्यानांच्या समग्र देखभालीसाठी लवकरच ई-टेंडरिंग करण्यात येईल आणि खुल्या स्पर्धेच्या आधारावर कामे दिली जातील,' असे आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी स्पष्ट केले आहे.आयुक्तांच्या या निर्णयाचे बेरोजगार संस्था आणि नव्या उद्योजकांकडून स्वागत होत असून, 'मक्तेदारीला चाप आणि खुल्या स्पर्धेला संधी दिल्याबद्दल आयुक्तांचे आभार,' अशी भावना व्यक्त होत आहे.

# डोमा आश्रमशाळेत विद्यार्थ्यांचे प्रबोधन; आमदारांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांचा मुक्काम

**अचलपूर/वार्ताहर**

चिखलदरा तालुक्यातील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, डोमा येथे विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याच्या उद्देशाने 'प्रबोधन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना सकारात्मक, सुरक्षित आणि विश्वासाचे वातावरण मिळावे, यासाठी जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी, शिक्षक,कर्मचारी, पत्रकार, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डोमा आश्रमशाळेतील काही विद्यार्थ्यांना कथितरीत्या भूतबाधा झाल्याच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे प्रबोधन व समुपदेशन करण्यात आले. संदीपपाल महाराज व त्यांच्या संपूर्ण टीमने विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या मनातील भीती दूर करण्याचा प्रयत्न केला.विशेष म्हणजे, अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी एक-एक करून



संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि त्यांच्या भविष्यासंदर्भात मार्गदर्शन केले. शिक्षणावर लक्ष केंद्रित करून नियमितपणे शाळेत उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच लवकरात लवकर सर्व विद्यार्थ्यांनी शाळेत उपस्थित राहावे, यासाठी पालक व विद्यार्थ्यांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी आ.केवलराम काळे, जिल्हाधिकारी येरेकर, ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी,गटशिक्षणाधिकारी गिरासे, ठाणेदार पाटील यांच्यासह सरपंच सुनील उईके, मुख्याध्यापक चौधरी तसेच शैलेश म्हाला, कृष्णा बछले, श्रीराम आठवले,भूषण देवहस,स्वप्नील भक्ते, आकाश खैरकर आदी उपस्थित होते.कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांसोबत सामूहिक भोजन केले. तसेच शाळेतील वसतिगृहाचे उद्घाटन विद्यार्थिनी गायत्री उईके यांच्या हस्ते करण्यात आले.विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली असून, जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह संबंधित अधिकारी डोमा आश्रमशाळेत मुक्कामी राहिले.विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करून त्यांना सुरक्षित, सकारात्मक आणि विश्वासाचे वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होऊ नये आणि सर्व विद्यार्थी पुन्हा नियमितपणे शाळेत उपस्थित राहावेत,यासाठी प्रशासन व शाळा व्यवस्थापनाकडून सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

# तमिळनाडूच्या धर्तीवर टीईटी पात्रता परीक्षेतून सूट द्यावी

## न्याय न मिळाल्यास राज्यव्यापी आंदोलन



**अमरावती/का.प्र.**

२३ ऑगस्ट २०१० पूर्वी सेवेत रुजू झालेल्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा सक्तीमधून कायमस्वरूपी सूट देण्यात यावी, या मागणीने महाराष्ट्रातील शिक्षक संघटना आक्रमक झाल्या आहेत. तमिळनाडूच्या धर्तीवर आगामी हिवाळी अधिवेशनात यासंदर्भात सर्वपक्षीय ठराव मंजूर करून तो राज्यपालांच्या स्वाक्षरीने केंद्र सरकारकडे पाठवावा, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तमिळनाडू विधानसभेने २३ ऑगस्ट २०१० पूर्वी नियुक्त शिक्षकांना TET सक्तीमधून सूट देण्यासंदर्भात ठराव मंजूर करून केंद्राकडे पाठविल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले आहे. या निर्णयाला १ सप्टेंबर २०२६ रोजी एक वर्ष पूर्ण होत असताना महाराष्ट्र सरकारनेही ठोस पाऊल उचलावे, अशी अपेक्षा समितीने व्यक्त केली आहे.हिवाळी अधिवेशनात TET सक्तीमधून कायमस्वरूपी सूट देणारा ठराव मंजूर करून केंद्राकडे पाठवावा, अशी मागणी समितीने केली आहे. शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी दिला.

# मोर्शीसारख्या सपाट भागात शेतकऱ्याचा जीव घेणारी वाघीण आली कुठून?

## वाघिणीला दोन बछड्यांसह पकडण्यासाठी युद्धपातळीवर मोहीम राबविण्याची गरज

**मेळघाट/वार्ताहर**

मोर्शीसारख्या सपाट आणि शेतीप्रधान भागात शेतकऱ्याचा जीव घेणारी वाघीण नेमकी आली कुठून, हा अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मोर्शी तालुक्याचा काही भाग सातपुडा पर्वतरांगेच्या पायथ्याशी लागून असला तरी ज्या भागात वाघिणीने शेतकऱ्याचा बळी घेतला, त्या परिसराच्या पलीकडे जंगलाचा भाग नसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील एखादी वाघीण जंगलाबाहेर तर गेली नाही ना, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

यापूर्वी मेळघाट परिसरात एका वाघिणीने आणि तिच्या दोन बछड्यांनीही धिंगाणा घातल्याचे प्रकरण समोर आले होते. जंगलाचा भाग सोडून ही जनावरे मोर्शीसारख्या सपाट भागात गेली असतील, तर ही परिस्थिती अत्यंत भयावह आणि चिंताजनक आहे. वाघीण आणि तिच्या बछड्यांच्या हालचालींमुळे नागरिक आणि शेतकऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी या घटनेकडे अत्यंत गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. वाघिणीचा वावर निश्चित करून तिच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी तातडीने व्यापक शोधमोहीम सुरू करण्यात यावी. आवश्यक त्या ठिकाणी पिंजरे लावून, गस्त वाढवून आणि विशेष पथके तैनात करून या वाघिणीला तिच्या बछड्यांसह पकडण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्यात यावेत.मेळघाटात यापूर्वी चार नागरिकांचा बळी गेल्यानंतर आणि वरिष्ठांचे आदेश झाल्यानंतरही संबंधित वाघीण आजपर्यंत पकडण्यात आलेली नसून ती स्वतंत्रपणे फिरत असल्याचा मुद्दा गंभीर आहे. मोर्शीतील घटनेनंतर पुन्हा तशीच परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी वनविभागाने मानवहानी वाढण्याची वाट न पाहता तातडीने मोठी शोधमोहीम उघडावी.

वनविभागाने तातडीने कॅमेरा ट्रॅप लावून, विशेष पथके तैनात करून आणि वाघिणीच्या पाऊलखुणांचा मागोवा घेऊन तिच्या अस्तित्वाची खात्री करावी. वाघिणीसोबत बछडे असल्याची शक्यता असेल, तर शोधमोहीम आणखी व्यापक करण्याची गरज आहे. केवळ मोर्शीपुरतेच मर्यादित न राहता तिच्या संभाव्य मार्गावरील सर्व परिसरात गस्त वाढविण्यात यावी.नागरिकांचा जीव धोक्यात येण्याची वाट न पाहता वाघिणीला आणि तिच्या बछड्यांना शोधून जेरबंद करण्यासाठी चक्रव्यूह उभारावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ऑक्टोंबरपासून अमरावती-मुंबई विमानसेवा आठवड्यातून पाच दिवस

**अमरावती/का.प्र.**

अलायन्स एअर कंपनीची मुंबई-अमरावती-मुंबई ही विमानसेवा पुन्हा एकदा आठवड्यातून पाच दिवस सुरू होणार आहे,पण त्यासाठी प्रवाशांना महिनाभर प्रतीक्षा करावी लागणार आहे.येत्या ४ ऑक्टोबरपासून दर आठवड्याला पाच दिवस ही सेवा उपलब्ध होऊ शकेल.

अलायन्स एअरने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थाप कीय संचालक दीपक कपूर यांना ई-मेल पाठवून वेळा पत्रकातील बदला विषयी माहिती दिली होती. दीपक कपूर यांनी त्यानंतर समाज माध्यमांद्वारे प्रवाशांना २५ ऑगस्ट ते ३० सप्टेंबरपर्यंत आठवड्यातून चारच दिवस विमानसेवा सुरू राहील, अशी सूचना दिली होती.आता ४ ऑक्टोबर पासून आठवड्या तून पाच दिवस विमान प्रवासाचे बुकिंग सुरू झाले आहे.सध्या दर आठवड्याला रविवार, सोमवार, बुधवार आणि शुक्रवार असे चार दिवस मुंबई-अमरावती-मुंबई ही विमानसेवा सुरू आहे. ४ ऑक्टोबरपासून दर रविवार,सोमवार, मंगळवार, बुधवार आणि शुक्रवार असे पाच दिवस विमानसेवा उपलब्ध राहणार आहे.विमानाच्या वेळेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. मुंबई विमानतळावरून सकाळी ७.०५ वाजता विमान उड्डाण घेते आणि सकाळी ८.५० वाजता अमरावती विमानतळावर पोहचते. तर परतीच्या वेळी अमरावती विमानतळावरून सकाळी ९.१५ वाजता विमानोड्डाण होते आणि सकाळी ११ वाजता मुंबई विमानतळावर पोहचते.या महिन्यावर विमान आठवड्यातून चार दिवस उड्डाण भरणार आहे. त्यानंतर आठवड्यातून पाच दिवस सेवा सुरू होणार आहे.

विविध कारणांमुळे प्रवाशांना या विमानसेवेसाठी जादा पैसे मोजावे लागत आहेत. सध्या सामान्य प्रवास भाडे हे ३ हजार ४०० रुपये ते ४ हजार रुपयांपर्यंत आहे. गर्दीच्या वेळी त्याहून अधिक पैसे मोजावे लागतात. अलायन्स एअरने सुरूवातीला अमरावती ते मुंबई प्रवासाचे तिकिटाचे किमान दर २ हजार १०० रुपये इतके ठेवले होते. पण गर्दीच्या दिवशी जास्त रक्कम मोजावी लागत होती. आता सामान्य दर दुपटीने वाढले आहेत.

# झोन सभापती स्वाती कुलकर्णी यांनी घेतला विविध विषयांचा आढावा

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिकेच्या मध्य झोन क्र. २ अंतर्गत येणाऱ्या विविध भागांतील नागरी समस्या आणि मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांवर राजापेठ येथील सभागृहात महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. मध्य झोन क्र. २ च्या झोन सभापती स्वाती कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत स्वच्छता, उद्यान, बांधकाम, मालमत्ता कर, विद्युत तसेच अतिक्रमण या विविध विभागांशी संबंधित विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

मध्य झोन क्र. २ अंतर्गत विविध परिसरांमध्ये स्वच्छतेची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. नियमित कचरा संकलन, रस्ते व सार्वजनिक



ठिकाणांची स्वच्छता, कचऱ्याची योग्य विल्हेवाट आणि नागरिकांना स्वच्छ वातावरण उपलब्ध करून देणे या अनुषंगाने स्वच्छता विभागाशी संबंधित बाबींवर बैठकीत चर्चा करण्यात आली.मालमत्ता कर विभागाशी संबंधित नागरिकांच्या अडचणी, कर आकारणी, थकीत कर तसेच करसंबंधित विविध प्रश्नांवरही बैठकीत चर्चा करण्यात आली. झोनमधील विद्युत व्यवस्थेशी संबंधित विविध बाबींचाही बैठकीत समावेश होता. सार्वजनिक ठिकाणांवरील विद्युत व्यवस्था, आवश्यक दुरुस्तीची कामे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. विद्युत विभागाशी संबंधित प्रश्नांवर योग्य ती कार्यवाही करण्याच्या दृष्टीने विचारविनिमय करण्यात आला.बैठकीत शहर सुधार समिती सभापती राधा कुरील, शिक्षण समिती सभापती ॲड,प्रीती रेवणे, नगरसेवक मनिष बजाज, महेश मुलचंदानी, नगरसेविका नंदा सावदे, स्मिता सुर्यवंशी, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी नर्मदा चव्हाण, अभियंता लक्ष्मण पावडे, वैद्यकीय अधिकारी डॉ.स्वाती कोवे, डॉ.संदिप पाटबागे, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# वडिलांचा जीव वाचविण्यासाठी मुलीचे यकृतदान


## विशाखाच्या त्यागाने समाजासमोर ठेवला आदर्श
## नियतीने मात्र हिरावून घेतले वडिलांचे छत्र

**अमरावती/का.प्र.**

'वंशाला दिवा हवा' या संकुचित विचारातून आजही समाजातील काही ठिकाणी मुलींच्या जन्माकडे नकारात्मक दृष्टीने पाहिले जाते. मुलगा-मुलगी असा भेदभाव करत मुलींच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या मानसिकतेसमोर आज मुलीच आपल्या आई-वडिलांचा आणि कुटुंबाचा खंबीर आधारस्तंभ बनत असल्याची अनेक प्रेरणादायी उदाहरणे समाजात पाहायला मिळतात. त्यापैकीच एक अत्यंत हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी उदाहरण दर्यापूर शहरात पाहायला मिळाले आहे.

जिल्हा परिषद शिक्षक सुधीर पातुरकर यांचे यकृत गंभीररीत्या निकामी झाल्याने त्यांच्यावर मुंबई येथील रुग्णालयात उपचार सुरू होते.डॉक्टरांनी यकृत प्रत्यारोपणाची आवश्यकता व्यक्त केल्यानंतर पातुरकर कुटुंबावर मोठे संकट कोसळले.अशा अत्यंत कठीण परिस्थितीत त्यांच्या मोठ्या मुलीने विशाखा सुधीर पातुरकर हिने वडिलांचा जीव वाचविण्यासाठी खंबीरपणे पुढे येत स्वतःच्या यकृताचा भाग दान करण्याचा धाडसी आणि त्यागमय निर्णय घेतला.

आपल्या वडिलांना नवजीवन मिळावे, त्यांचे प्राण वाचावेत, हीच एकमेव भावना मनात ठेवून विशाखाने हा मोठा त्याग केला. तिच्या या निर्णयातून वडिलांप्रती असलेले निस्सीम प्रेम, कर्तव्यभावना आणि धैर्य दिसून आले. विशाखाच्या यकृतदानानंतर २० ऑगस्ट रोजी मुंबई येथील



रुग्णालयात यकृत प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याने कुटुंबीयांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. वडिलांना नवजीवन मिळेल आणि ते पुन्हा कुटुंबात परततील, अशी अपेक्षा सर्वांना होती.

मात्र नियतीला काही वेगळेच मंजूर होते. उपचार सुरू असतानाच अखेर ३० ऑगस्ट रोजी सुधीर पातुरकर यांचे वयाच्या ५६ व्या वर्षी मुंबई येथील रुग्णालयात निधन झाले. वडिलांचा जीव वाचविण्यासाठी स्वतःच्या शरीराचा एक भाग दान करणाऱ्या मुलीकडून काळाने अखेर वडिलांचे छत्र हिरावून घेतले. हा प्रसंग पातुरकर कुटुंबासह संपूर्ण परिसराला दुःखाच्या छायेत लोटणारा ठरला आहे.वडिलांना वाचविण्याचा प्रयत्न नियतीमुळे पूर्णत्वास जाऊ शकला नसला, तरी विशाखाने केलेला त्याग कधीही व्यर्थ ठरणार नाही. कारण तिच्या या कृतीतून समाजाला एक अत्यंत महत्त्वाचा आणि प्रेरणादायी संदेश मिळाला आहे.आई-वडिलांवरील प्रेम हे केवळ शब्दांत व्यक्त होत नाही; वेळ आली तर त्यांच्यासाठी स्वतःचा त्याग करण्याचीही तयारी असते.आजच्या धावपळीच्या आणि बदलत्या काळात मुली आपल्या आई-वडिलांच्या सुख-दुःखात खंबीरपणे उभ्या राहत आहेत. मुलगी ही केवळ घराची लाडकी कन्या नसून संकटाच्या काळात संपूर्ण कुटुंबाला आधार देणारी शक्ती आहे, हे विशाखाने आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखविले आहे.

## संक्षिप्त

### खेळाडूंचा गौरव करत क्रीडादिन साजरा



**अमरावती-** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्यावतीने विविध क्रीडा स्पर्धा, सायकल रॅली आणि खेळाडूंचा गौरव करून राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला.राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या औचित्याने 'एक घंटा खेल के मैदान मे' या संकल्पनेवर आधारीत विशेष क्रीडा उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.विभागीय क्रीडा संकुलात बॅडमिंटन,टेबल टेनिस,स्क्वॅश,आर्चरी,व्हॉलीबॉल या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेच्या समारोपीय कार्यक्रमात क्रीडा उपसंचालक अविनाश पुंड यांच्या हस्ते क्रीडा स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना सन्मान चिन्ह आणि सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले. शिव छत्रपती पुरस्कारार्थी नितीन चव्हाळे ,मंगेश व्यवहारे यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले.आमदार संजय खोडके आणि राज्य उत्पादन शुल्कचे विभागीय उपायुक्त पराग नवलकर यांनी हिरवी झेंडी दाखवून सायकस्वारांना रवाना केले. अमरावती सायकलींग असोसिएशनचे सायकलपटू ,खेळाडू,नागरीक, युवक-युवती या सायकल रॅलीमध्ये मोठया संख्येने सहभागी झाले.

### सावंगपूर नगरी जन्माष्टमीच्या भक्तिरसात रंगणार



**चांदुर रेल्वे-** तालुक्यातील श्री विठोबा संस्थान, श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे ४ सप्टेंबर शुक्रवार रोजी जन्माष्टमी निमित्त विविध भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.श्रावण मास मांड अंतर्गत अखंड रात्रंदिन भजन सुरू राहणार असून दुपारी ४ वाजता जन्माष्टमी विशेष चंदनउटी उत्सव होईल. त्यानंतर संध्याकाळी ६ वाजता बाहेर गावातील भाविकांना महाप्रसाद वितरण करण्यात येईल.रात्री ८ वाजता मुख्य मंदिरातून लहान मंदिरात पान, काकडी, मकई-कणीस, नारळ, फुलोरा, लाया-फुटाणे, कापूर ज्योत आदींसह आरतीच्या गजराने 'जन्माष्टमी विशेष सोहळा' पार पडेल. मध्यरात्री १२ वाजता कापूर ज्योत आणि आरतीसह जन्मोत्सव साजरा होईल.५ सप्टेंबर शनिवार रोजी रात्री ८ वाजता कापूर ज्योतसह आरती आणि जन्माष्टमी निमित्त गोपाळकाला प्रसाद वितरण होईल.भाविक भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून या अध्यात्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, तसेच सर्व विश्वस्त मंडळ वसंत शेंडे , गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रवीण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी यांनी केले आहे.

### कौंडण्यपूर येथील इस्कॉन मंदिरात जन्माष्टमी महोत्सव

**अमरावती-** इस्कॉन संस्थापक आचार्य श्रील भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांचे शिष्य त्रिदंडी संन्यासी परम पूज्य लोकनाथ स्वामी महाराज यांच्या प्रेरणेने इस्कॉन कौंडण्यपूर येथील श्री श्री रुक्मिणी द्वारकानाथ मंदिर तर्फे ४ सप्टेंबर रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ४ रोजी पहाटे ४:३० वाजता श्री श्री रुक्मिणी द्वारकानाथ आणि गोवर्धन (गिरीराज) भगवान यांच्या शुभमंगल आरतीने होईल त्यानंतर 'हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे, हरे राम हरे राम राम राम हरे हरे' या महामंत्राचा सामूहिक जप होईल. त्यानंतर ७:३० वाजता दर्शनआरती होईल आणि त्यानंतर इस्कॉन संस्थापक आचार्य ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांची गुरुपूजा संपन्न होईल. त्यानंतर रात्री १०:०० ते ११:०० या दरम्यान कृष्णकथामृत कथा श्रीमान अक्रुर प्रभुजी यांच्याद्वारे होईल. त्यानंतर मध्यरात्री १२:०० वाजता कृष्ण जन्म, झुला दर्शन, महाआरती संपन्न होईल. ५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता इस्कॉन संस्थापकाचार्य श्रील ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांच्या व्यासपूजे निमित्त श्रील प्रभूपाद यांचा महाअभिषेक संपन्न होईल त्यासोबतच श्रील प्रभूपाद यांना ५६ भोगार्पण होईल. दुपारी १२:०० वाजता श्रील प्रभूपाद यांची महाआरती संपन्न होईल.

**आंदोलन मागण्या हा नागरिकांचा अधिकार आहेच पण त्याचा मार्ग संवैधानिक हवा. संवैधांनिक लोकांना संवैधानिक वागणूक आणि अराजकांना कठोर शासन आवश्यक आहे. मायबाप सरकारने मायबाप सरकार सारखे रहावे..सरकार म्हणून देशाचे भविष्य बिघडविण्याचा अधिकार तुम्हाला नाही..**



# सरकारची वागणूक!

सरकार कोणत्याही पक्षाचे असो ते मायबाप सरकार असते. मायबाप जसे आपल्या मुलाबाळाची काळजी करतात, त्याचे संगोपन करतात, व्यवस्था करतात. हे सर्व करीत असतांना मुलगा जर वाममार्गाला जात असेल, चुकत असेल, आगाऊ उंडारत असेल तर त्याला शिक्षा, दाट देण्याची, त्याचे कान पकडण्याची प्रसंगी दोन फटके देण्याची जवाबदारी पण मायबापाची आहे. शाबासकी आणि शिक्षा याबाबत तारतम्य बाळगले नाही तर मुलगा वाया जातो. परिणामी घर बिघडते.

बस नेमकी हीच भूमिका मायबाप सरकारची जनतेच्या बाबतीत असावी लागते. इथले नागरिक म्हणजे मायबाप सरकारची संततीसारखी असते. त्यांची संपूर्ण जवाबदारी सरकारची असते. समाजातील विधायक कामांना सहकार्य आणि विघातक कामांना शासन देण्याची जवाबदारी मायबाप सरकारची आहे. विद्यमान सर्व सरकारे आपल्या जबाबदारीबाबत बेजबाबदार वागतांना दिसते.

त्यातील काही मुद्दे महत्वाचे वाटतात.

१) मोफत योजना-जवळ जवळ सर्वच सरकारांची मोफत देण्याची स्पर्धा लागली आहे. मतांवर डोळा ठेवून लाडकी बहीण, मोफत प्रवास, हज सबसिडी, कर्जमाफी अशा योजना जनतेला बिघडवण्याचे काम करीत आहेत. मोफत योजना आता सर्वांना हक्क वाटू लागल्या. श्रमाचे महत्व कमी होऊन ऐतखाऊ वृत्ती वाढीस लागली आहे. परिणामी समाज कर्तव्यापासून दूर पळतांना दिसतो. त्यामुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडून अनेक प्रश्न पुढे उभे राहिले आहेत. मायबापाच्या अतिलाडाने पोरगं वाया जाते तशी अवस्था समाजाची झाली आहे. मोफत देण्याच्या स्पर्धेने आर्थिक स्थिती कोलमडली जात असली तरी मतांच्या स्वार्थापायी मोफत योजना बंद करण्याची हिंमत कोणी करीत नाही. एखादी योजना बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला तर विरोधी पक्ष रस्त्यावर उतरतात.

परिणामी महाराष्ट्र कर्जबाजारी झाला तरी चालेल पण आम्ही योजनांचा पुनर्विचार करणार नाही. मायबापांनी केलेली चुकीची कृती पोराला बिघडवते. मग तो त्याच्या मनाविरुद्ध झाले की मायबापाच्या जीवावर उठते. सरकारने सरकारसारखे न वागण्याचे हे परिणाम आहेत.

२) विविध आंदोलनातील असंवैधानिक मागण्या-जनता आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करू शकते. हा संविधानाने दिलेला अधिकार आहे. सरकारनेही त्यांनी वापरलेल्या आंदोलन या आयुधाला व्यवस्थित प्रतिसाद दिला पाहिजे. हे सरकारचे कर्तव्य आहे. पण आंदोलकांच्या असंवैधानिक मागण्यांवर मूग गिळून बसणे ही सरकारची घोडचूक आहे. जर सरकारने काही पाऊल उचलण्याचा प्रयत्न केला तर विरोधक असंवैधानिक मागणी असूनही आगीत तेल ओततात. त्यामुळे असंवैधानिक आंदोलनावरही सरकार 'हाताची घडी अन् तोंडावर बोट' ठेवून वागते. त्यामुळे हल्ली संपूर्ण देशभर अशा असंवैधानिक मागण्याची स्पर्धा लागली आहे. त्यामुळे समाजात वातावरण बिघडले आहे. आरक्षणाची आंदोलने हा त्यातला एक प्रकार आहे.

३) शिवराळ भाषेला मुक्त परवानगी- देशातील अनेक आंदोलनस्थळी असणाऱ्या आंदोलनकर्त्यांची शिवराळ भाषा आणि त्यावर सरकारची चुप्पी देशातील वातावरणावर दूरगामी विघातक परिणाम करणारा आहे. अशा लोकांवर कोणतीही कायदेशीर कार्यवाही न होणे हे सामाजिक स्वास्थ्यास घातक आहे. पण तरीही सरकार जर बोटचेपी भूमिका घेत असेल तर सरकार देशाचे भविष्य बिघडवत आहे. अशी शिवराळ भाषा वापरण्याचा कुणालाही अधिकार नाही. सरकार निमूट सहन करीत असेल तर सरकारने सरकार सारखे वागण्याची आवश्यकता आहे.

४) स्वैराचाराकडे दुर्लक्ष-सर्वच कामात पारदर्शकता असावी हे लोकशाहीला अभिप्रेत आहेच. ती सरकारची प्रमुख जवाबदारी आहे. जनतेला सर्व जाणून घेण्याचा अधिकार आहेच. पण आता काही लोकांचा स्वैराचार असहनीय होत आहे.


परवा एक नेते एका कार्यालयात गेले, झुंडशाही करून पंतप्रधानाचा फोटो काढून टाकला. त्यासाठी कोणताही संवैधानिक मार्गाचा वापर नाही. याच नेत्यांचे फोटो त्यांच्या कार्यालयात शिवछत्रपतींच्या रांगेत असतात. जर पंतप्रधानाच्या फोटोत नियम पाळले नसतील तर त्यासाठी विधायक मार्ग आहेत. एक नेते शाळेत जातात आणि उगाच दमदाटी करून धमक्या देतात. चूक असेल तर त्याला विरोधाचा संवैधानिक मार्ग आहे. पण कुणालाही कशाचाही धाक उरला नाही. कारण कोणतीही कार्यवाही होत नाही.

अमरावतीमध्ये नवजात अर्भकांच्या मृत्यूची घटना दुर्दैवीच पण विनाकारण जो तो उठतो त्या हॉस्पिटलला भेट देतो, दमदाट्या करतो. सरकार नावाची गोष्ट आहे की नाही? कोणीही येते कोणत्याही कार्यालयात जाते आणि लगेच तोडफोड सुरू. प्रश्न विचारण्याचा अधिकार आहेच पण तोडफोडीचा अधिकार कोणी दिला? सरकार सरकारसारखे वागत नाही म्हणून ही अराजकता आहे. कोणी टरबुज्या म्हणते, कोणी पप्पू म्हणते, कोणी महिला नेत्यांना वाटेल त्या अर्वाच्च भाषेत फोनवर बोलते. कोणालाही धरबंध राहिला नाही.

'वंदे मातरम्'साठी जर संसदेने ठराव पारित केला आहे. आता त्याहून मोठे कोणीच नाही पण सरेआम नियम मोडीत काढल्या जातो आणि सरकार गप्प बसते. संसदेवर हल्लाबोल करण्याचा प्रयत्न होतो आणि सरकार गप्प. सैनिकांना वाटेल ते बोलल्या जाते आणि सरकार गप्प. उपमुख्यमंत्र्यांना सभा होऊ देणार नाहीची धमकी दिली जाते आणि सरकार गप्प. श्रीराममंदिरात घोटाळा होतो आणि सरकार गप्प. कुंभमेळ्यात बनावट निविदा बनतात आणि सरकार चूप. कोणीही उठावे आणि प्रधानमंत्र्यांची मायबहीण काढावी आणि सरकार गप्प. अधिकाऱ्यांना मारणे, त्यांचे कपडे फाडणे, सरकारी कार्यालयात कपडे काढून नग्न होणे नित्याचेच झाले. सरकार सरकारसारखे वागत नसल्याचे हे परिणाम.

अफाट गर्दी गोळा करायची आणि अराजक माजवायचे. पोलिसांनी बंदोबस्ताचा प्रयत्न केला तर त्यांच्यावरच हल्ले करायचे, आरोप करायचे. पोलिसांच्या कटपुतळी होतात. सरकारनेही संयम विवेक पाळायचा असतो हे मान्यच आहे. सरसकट गोळ्या घालता येत नसतात हे ही एकदम बरोबर पण गर्दी गोळा करून सरकारला झुकवण्याचा प्रकार कमजोर सरकारचे लक्षण ठरेल. उद्या कुणीही उठेल, गर्दी गोळा करेल आणि गर्दीच्या धाकाने सरकारला वेशीवर टांगेल तर भारताच्या दृष्टीने हे योग्य नाही. निदान कायद्याचा धाक शिल्लक असायला हवा.

**प्रा. दिलीप जोशी,**
वाशिम.
मो.९८२२२६२७३५



# एआयचा बुडबुडा फुटणार?

७० टक्के अमेरिकन नागरीक एआयला नकार देत आहेत. डेटा गोळाकरून त्याचा वापर करणाऱ्या कंपन्यांना अमेरिकन जनता आपल्या गावात यायला मनाई करत आहे. इलिनॉय, ओहायो, टेक्सस, कॅलिफोर्निया, वॉशिंग्टन, मेन, न्यू यॉर्क, व्हर्जिनिया, न्यू जर्सी या राज्यांतले एआयचे प्रस्तावित प्रकल्प थांबवण्यात आले आहेत. नव्या प्रकल्पाना सरकार परवानगी देत नाही येत. या वातावरणाचा एक परिणाम असा की या उद्योगातून लोक आता पैसे काढून घेऊ लागलेत.

एआयवर (डेटा मायनिंग, प्रोसेसिंग इत्यादी) अमेरिकन सरकार ट्रिलियन डॉलर रक्कम खर्च करायचं म्हणत होतं. एआयमधे गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांनी निवडणुकीत अब्जावधी डॉलर ओतले. माध्यमांचा, सरकारी संस्थांचा, वापर करून एआय उद्योगाने एक एआय गारूड तयार केले. एआय म्हणजे सारे काही अशा वेडाने अमेरिका पछाडली. सर्व समस्यांवर अक्सीर इलाज, एआय. खेळ स्पर्धेत भरपूर पदकं हवीत? एआय. उपचार चांगले व्हायला हवेत? एआय. तंगड्या दुखत आहेत? एआय. केस गळत आहेत? एआय. बद्धकोष्ठ झालेय? एआय. कॉलेजेसना सांगण्यात आले एआय शिकवा. भाषा, इतिहास, कला, साहित्य इत्यादी सारे बंद करा. पोरे आणि त्यांचे आईबापही येड लागल्या सारखे एआयएआय करू लागले.

एआयमुळे किती नोकऱ्या नव्याने निर्माण होतील, एकूण रोजगार किती वाढेल या बद्दल खात्रीलायक माहिती अजून मिळालेली नाही. किती रोजगार जातील आणि किती नव्याने होतील याचा अंदाज अजून आलेला नाही. दुसऱ्या बाजूला एआय उद्योगामुळं नुकसान किती होईल त्याचा अनुभव मात्र अमेरिकन जनता आत्ताच घेतेय. जिथं जिथं एआय प्रकल्पांची उभारणी सुरु झालीय तिथं निसर्गाचा नाश होतोय. एआय प्रकल्प खूप पाणी पितो. प्रकल्पाच्या आसपासच्या लोकांना पाण्याची टंचाई भासू लागलीय. एआय खूप वीज वापरतो. अमेरिकेत वीज महाग होतेय, विजेची टंचाई निर्माण झालीय.

अमेरिकन माणूस म्हणतोय की अगदी मूलभूत अशी पाण्याची समस्या आधी सोडवा नंतर एआयची क्रांती करा. अमेरिकेत सध्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवतेय. नद्यांची पात्रं कोरडी पडलीत. पाऊस लहरी झालाय. पाणी जमिनीत मुरत नाही, भूगर्भातली पाण्याची पातळी खालावत चाललीय. पाण्याचा उपसा जितका होतो तितकी पुन्हा भरपाई होत नाही. त्यात या खूप पाणी पिणाऱ्या प्रकल्पाची भर. पाणी ही अमेरिकेची खरी समस्या आहे.

कोलोराडो नदीवरचे हूव्हर धरण जागतीक पर्यटनाचं केंद्र आहे. पर्यटक तिथं पोचतात तर जलाशय रोडावलेला दिसतो. कोलोराडो खोऱ्यात आणि जलाशयात पाणीसाठा ४० टक्क्याच्या खाली घसरलाय. कोलोराडो नदी ७ राज्यातल्या ४ कोटी लोकांना पाणी पुरवते. कोलोराडो खोऱ्यातले लोक एआय प्रकल्पाला विरोध करत आहेत. कोलोराडोतल्या पाण्याचे रेशनिंग सरकारने सुरु केले आहे.

एआयचा उपयोग आहे हे तर खरंच आहे. माहिती गोळा करण्याचा वेग, विश्लेषण करण्याचा वेग, नवे ज्ञान तयार करण्याचा वेग एआयने प्रचंड वाढवला. ज्ञानाची सर्व क्षेत्रं अधिक समृद्ध झाली. माणसाचे दैनंदिन जीवनही प्रचंड सुकर आणि सुखी झाले. एआयचे दुष्परिणाम दिसू लागले. अगदी मोजक्या क्षेत्रांत ल्या अगदी मोजक्या व्यक्तींची बौद्दिक क्षमता वाढली. नव्वद टक्के जनता मेंदूचा वापर करेनाशी झाली. मापन, गणन, विश्लेषण, क्रियेटिविटी या गोष्टी सामान्य माणसाच्या जीवनातून गायब होऊ लागल्या.

दोष एआयचा नाही. दोष एआयचे उद्योग उभारणाऱ्यांचा आहे. ज्याना ज्ञानाच्या कक्षा वाढवायच्या आहेत ते लोक एआयचा विकास करत नाहीयेत. केवळ पैसा हेच उद्दीष्ट असलेले धनीक एआय उद्योग उभारत आहेत. उदा. ईलॉन मस्क. लहान मुलांना नादी लावून त्यांचं आयुष्य नासवण्याच्या आरोपाला आता मेटा इत्यादी कंपन्या तोंड देत आहेत. कला जाणीवांचा प्रसार करण्याऐवजी त्या बोथट करण्याकडं एआयच्या मनोरंजन शाखेचे लक्ष आहे.

दुसरे म्हणजे एआय हा उद्योग फार म्हणजे फार गुंतवणूक खाणारा आहे. दुनियेला निर्बुद्ध करणारा हा उद्योग जगातले खूप भांडवल खातो आहे. एआयवाले आणि एआयच्या परिणामांचे बळी असे दोन वर्ग समाजात होऊ घातलेत. एआयवाले अतीधनीक आणि पोटभरूनिर्बुद्द बळी अशा फळ्या समाजात पडत आहेत. पुन्हा तेच. दोष एआयचा नाही. एआयमधला विकास ही समाजातली आधुनिक क्रांती आहे. एआयचा गैरवापर हा प्रॉब्लेम आहे.

साधनांचा वापर आणि वाटप महत्वाचा असतो. आज बेकारी, अशिक्षा, आरोग्य, उपासमारी या समस्या जगाच्या साठेक टक्के नागरिकांना भेडसावत आहेत. त्या सोडवण्याला अग्रक्रम हवा की सेलफोन, कंप्यूटर, सिनेमा, टीव्ही, विमानप्रवास यांच्यावर अधिक पैसे गुंतवायला हवेत? एआयचा वापर अलिकडे शस्त्रांची मारक क्षमता वाढवण्याकडे होऊ लागलाय. माणसे जगवण्यापेक्षा मारण्याकडं एआयचं लक्ष अधिक आहे.

अमेरिकेत एआय नको असे फलक जागोजागी, व्हाईट हाऊससमोर लागलेत ही गोष्ट आश्चर्याची आहे. अमेरिकन समाजाचे निर्णय एके काळी जनता घेत असे. अमरिका स्थापन झाली तेव्हा टाऊन हॉल हा अमेरिकन समाज जीवनाचा आत्मा होता. दुसऱ्या महायुद्धाच्या आसपास अमेरिकेचा ताबा बाजारानं आणि धनिकांनी घेतला. ईलॉन मस्क याच्यासारखा मानसीक आणि बौद्दीक तोल गेलेला माणूस अमेरिकेची धोरणं ठरवतो, अमेरिकन सरकारचा भाग होतो ही घटना अमेरिकेतल्या वातावरणाची निदर्शक आहे. अशा परिस्थितीत, धनिकांनी प्रचंड पैसा बाजारात लोटला असताना, माध्यमांनी लोकांना वेडे केले असताना, लोकांनी आपल्या पातळीवर एकत्र येऊन एआयला विरोध केला. ही फार मोठी गोष्ट आहे. हे सारे लिहीत असताना भारतात विशाखा पट्नम, हैदराबाद, बंगलोर, नवी मुंबई या ठिकाणी धडाधड डेटा सेंटर तयार होत आहेत, सरकार त्यांना प्रोत्साहन देत आहे. स्थानिक लोक अस्वस्थ आहेत, पण काही करू शकत नाहीत अशी स्थिती आहे.

**निळू दामले**

## श्रीकृष्ण उवाच...

देण्यासाठी न्याय जगाला
दृष्टांना करण्या ताडण
धर्मयुक्त समाज स्थापनेसाठी
मी येणार हे माझे आश्वासन..!

स्वार्थाच्या जाऊ नको आहारी
कर्म तसे फळ पडेल पदरी
विचारांती करणे कर्म
जाणिजे हेची मुक्तिचे मर्म..!

**प्रा. अशोक सारडा**
मेहकर
मो९४२१३९४३३९

# आद्यकवी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज

मानवतेचे मूल्य समाजाला देणारे, ज्ञानीयांचा राजा, वेदांचा ज्ञाता, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज हे तेराव्या शतकातील प्रसिद्ध आद्य श्रेष्ठ संत कवी होते. त्यांचा जन्म २२ ऑगस्ट १२७५ साली श्रावण कृष्ण अष्टमीला आपेगाव, पैठण येथे झाला. यावर्षी दिनांकानुसार ४ सप्टेंबर रोजी संत ज्ञानेश्वर महाराजांची जयंती आहे. निवृत्तीनाथ हे संत ज्ञानेश्वर यांचे गुरु. निवृत्तीनाथांना नवनाथांपैकी श्री गहिनीनाथ यांनी दीक्षा दिली होती. त्यामुळे ज्ञानेश्वर हे नाथ संप्रदायाच्या शिष्य परंपरेतील होते. तसेच त्यांनी वारकरी वैष्णव भक्ती परंपरेची मुहूर्त मेढ रोवली. 'ज्ञाना रचिला पाया तुका केलासे कळस' हे सार्थ झाले. ज्या वारकरी संप्रदायाचे आज आपण विराट स्वरुप बघतो आहोत. त्याचा पाया ज्ञानेश्वरांनी रचला आणि बाकी संतश्रेष्ठींसह तुकाराम महाराजांनी त्याला अत्युच्च शिखरावर नेले. स्वतःच्या आचरणातून त्यांनी समाजाला कृतीप्रवण केले. संत ज्ञानेश्वर महाराजांना महाराष्ट्रात भक्ती भावाने माऊली म्हटल्या जाते. ते सतत विठ्ठल भक्तीत लीन असायचे. त्यांनी संस्कृत भाषेतील भगवद्गीता प्राकृत मराठीत लिहून ज्ञानाचे दरवाजे सर्वसामान्यांसाठी खुले केले. तीच भावार्थदीपिका म्हणजे ज्ञानेश्वरी लिहिली. अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, हरिपाठ, अभंग इत्यादी काव्य स्वरूपात लिहिले. त्यांनी ज्ञानेश्वरीत 'सुमारे ९ हजार ओव्या' लिहिल्या. स्वतःला प्रस्थापित करताना त्यांना अनेक दिव्यातून जावे लागले. त्यांनी पसायदान लिहिले ते संपूर्ण जगाच्या कल्याणा करताच. जो जे वांछिल! तो ते लाहो! प्राणीजात! हेच त्यांचे ध्येय होते. केवळ मनुष्यच नव्हे, तर प्राणी, पक्षी, झाडे सर्व सुखी आणि आनंदी असावे असेच त्यांचे ईश्वराकडे मागणे होते. असे हे



संतश्रेष्ठ कवी आपल्या महाराष्ट्रात जन्माला आले यासारखे दुसरे भाग्य ते काय! त्यांनी स्वतः चा नाही तर कायम विश्वाचाच विचार केला. साहित्य आणि काव्यरूपाने भक्तीचे भांडार त्यांनी समाजाला दिले. हरिपाठ ज्यांनी म्हटला नसेल, किंवा ऐकला नसेल त्यांनी जरूर एकदा ऐकावा. इतके चैतन्य त्यात ओतप्रोत भरले आहे. देवाचिये द्वारी उभा क्षणभरी! हरी मुखे म्हणा! हरी मुखे म्हणा! पुण्याची गणना कोण करी! हरी मुखे म्हणा याचा अर्थ अखंड नामस्मरण करण्याचा प्रयत्न करा, असे माऊलींनी सांगितले आहे. तीच कलियुगातील सर्वश्रेष्ठ साधना आहे. ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणी कोटी कोटी कृतज्ञता.

**माधवी पत्की**

# डिजिटल युगातील 'प्रोझ्युमर' पत्रकारिता : टॉफ्लरच्या संकल्पनेपासून 'बाईमाणूस' आणि 'खबर लहरिया'पर्यंत...




एकविसाव्या शतकात स्मार्टफोन हा केवळ संवादाचे साधन राहिलेला नाही. तो कॅमेरा, स्टुडिओ, छापखाना आणि प्रसारण केंद्र एकत्र झालेला आहे. पूर्वी बातमी तयार करणे हे वृत्तपत्र, दूरदर्शन आणि रेडिओ या संस्थांचे काम होते. नागरिक फक्त वाचक किंवा प्रेक्षक असतात. आज मात्र सामान्य माणूस घटना चित्रित करतो, स्थानिक प्रश्न लिहितो, व्हिडिओ संपादित करतो आणि तोच मजकूर स्वतः वाचतो किंवा पाहतो. उत्पादक आणि उपभोक्ता या दोन भूमिका एकाच व्यक्तीत येऊन मिळाल्या आहेत. या वास्तवाला अमेरिकन भविष्यवेत्ता अल्विन टॉफ्लर यांनी १९८० मध्ये The Third Wave या ग्रंथात 'प्रोझ्युमर' ही संज्ञा दिली.

टॉफ्लरच्या मते पहिल्या लाटेत, म्हणजे शेतीप्रधान समाजात, लोक स्वतः पिकवत आणि स्वतःच त्याचा उपभोग घेत. दुसऱ्या लाटेत औद्योगिक क्रांतीने उत्पादन आणि उपभोग वेगळे केले. कारखाना उत्पादक ठरला, नागरिक ग्राहक बनला. तिसरी लाट माहितीयुगाची आहे. येथे पुन्हा उत्पादक आणि ग्राहक यांच्यातील भिंत रहात नाही इंटरनेट, मोबाइल आणि सामाजिक माध्यमांनी ही भविष्यवाणी प्रत्यक्षात आणली. आज प्रत्येक स्मार्टफोनधारक संभाव्य पत्रकार, छायाचित्रकार आणि संपादक आहे. यालाच नागरिक पत्रकारिता आणि हायपरलोकल पत्रकारिता म्हणतात.

या प्रक्रियेमुळे माहितीचा प्रवाह अधिक लोकशाहीवादी झाला. मुख्य प्रवाहातील माध्यमे राजकीय सत्ताकेंद्र, महानगरे आणि उच्चभ्रू वर्ग यांच्याभोवती फिरतात. खेड्यातील पाणीटंचाई, जातीय हिंसा, स्त्रियांच्या मजुरीचे शोषण, शाळेतील शिष्यवृत्तीचा गंडा किंवा जंगल हक्काचे प्रश्न अनेकदा बाजूला राहतात. प्रोझ्युमर पत्रकारिता या पोकळीत उतरते. व्यक्ती स्वतःच्या समुदायाची कहाणी स्वतःच्या भाषेत सांगते. याचे सर्वात प्रभावी भारतीय उदाहरण म्हणजे उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशातील बुंदेलखंड परिसरातील खबर लहरिया. २००२ मध्ये काही ग्रामीण महिलांनी स्थानिक बोलीत चार पानी वृत्तपत्र सुरू केले. बहुतेक पत्रकार दलित, आदिवासी आणि मुस्लिम समुदायातील होत्या. सुरुवातीला त्यांना 'गावातील मुली बिघडतील' असे म्हटले जायचे. महिला पत्रकार म्हणून ओळख देण्यास समाज तयार नव्हता. तरीही त्या गावोगाव फिरून पाणी, आरोग्य, जातीय अत्याचार, घरगुती हिंसा आणि प्रशासकीय दुर्लक्ष यांचे वृत्तांकन करू लागल्या. त्या स्वतः त्याच समाजाच्या भाग होत्या. म्हणजे त्या बातमी तयार करत आणि तीच बातमी वाचतही. हाच प्रोझ्युमरचा गाभा.

कालांतराने खबर लहरियाने छपाई सोडून डिजिटल रूप स्वीकारले. यूट्यूब, फेसबुक आणि मोबाइल रिपोर्टिंगमुळे त्यांचा आवाज लाखोंपर्यंत पोहोचला. Writing with Fire या चित्रपटाने त्यांच्या कामाची जागतिक ओळख करून दिली. अलीकडे The Good Reporter अर्थात बड़ी आई पत्रकार या सामूहिक आठवणींमध्ये त्यांनी सांगितले आहे की, हथरस प्रकरणासारख्या घटनांमध्येही त्यांनी केवळ घटनाच नव्हे तर त्यामागील जात आणि पितृसत्ता दाखवली. एक पत्रकार सांगते की मृतदेह पाहिल्यानंतर गावातील लोक तिच्याकडे वेगळ्या नजरेने पाहू लागले. ती केवळ बातमीदार नव्हती, ती त्या समाजाची साक्षीदार आणि निर्माती होती.

महाराष्ट्रात याच विचारसरणीचे नवे रूप म्हणजे बाईमाणूस. ज्येष्ठ पत्रकार प्रशांत पवार आणि छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम विद्यापीठाच्या पत्रकारिता महाविद्यालयाच्या सहकार्याने हा प्रयोग आकाराला आला. १८ मे २०२२ पासून सुरू झालेल्या या डिजिटल प्लॅटफॉर्मवर ग्रामीण, दलित, आदिवासी, भटके आणि कामगार महिला स्वतःच्या अनुभवातून मजकूर तयार करतात. गडचिरोलीतील भामरागडची तरुण सरपंच भाग्यश्री लेखामी, नंदुरबारची भिल्ल आदिवासी सुमित्रा वसावे, पुण्यातील मुस्लिम तरुणी अप्सरा आगा अशा विविध पार्श्वभूमीच्या स्त्रिया मोबाइल पत्रकारिता शिकून आपल्या परिसरातील प्रश्न मांडतात.

बाईमाणूसचे वैशिष्ट्य म्हणजे येथे स्त्री केवळ विषय नसते, ती संपादक, कॅमेरामन आणि सूत्रसंचालकही असते. मुख्य प्रवाहातील माध्यमांमध्ये संपादकीय पदांवर उच्चवर्णीय पुरुषांचे वर्चस्व असल्याचे अहवाल दाखवतात. या पार्श्वभूमीवर बाईमाणूस हा पर्यायी आवाज आहे. आदिवासींचे जंगल हक्क, शेतमजुरांच्या मजुरीचे प्रश्न, अंधश्रद्धा, घरगुती हिंसा आणि स्थानिक प्रशासनातील दुर्लक्ष यांना येथे प्राधान्य मिळते. स्त्रिया स्वतःची कहाणी सांगतात म्हणून ती अधिक प्रामाणिक आणि जमिनीशी जोडलेली असते.

या दोन्ही प्रयोगांव्यतिरिक्त प्रोझ्युमर पत्रकारितेची छोटी छोटी उदाहरणे सर्वत्र दिसतात. कोविडकाळात गावातील तरुणांनी ऑक्सिजनची कमतरता, अंत्यविधी आणि लसीकरणाच्या अडचणी मोबाइलवर टिपून दाखवल्या. शेतकरी आंदोलनात शेतकरी स्वतःचे व्हिडिओ प्रसारित करत होते. अनेक खेड्यांतील युट्यूब चॅनेल्स स्थानिक पंचायत, बाजारभाव आणि पाणी योजना यांची माहिती देतात. विकिपीडियाचे संपादक, ब्लॉगर आणि इन्स्टाग्रामवरील सामुदायिक पृष्ठेही याच श्रेणीत येतात. फरक इतकाच की खबर लहरिया आणि बाईमाणूस यांनी या प्रक्रियेला संघटित, स्त्रीवादी आणि जाणीवपूर्वक समुदायाधारित रूप दिले. सामाजिक महत्त्व स्पष्ट आहे. माध्यमांचे केंद्रीकरण कमी होते. वंचित समुदायांना प्रतिनिधित्व मिळते. स्थानिक प्रश्न राष्ट्रीय चर्चेत येतात. स्त्रिया सार्वजनिक क्षेत्रात बोलू लागतात. माहिती निर्मितीचे लोकशाहीकरण होते. मात्र याच वेळी गंभीर आव्हानेही उभी राहतात.

पारंपरिक पत्रकारितेत संपादक, तथ्य पडताळणी आणि आचारसंहिता असते. प्रोझ्युमर पत्रकारितेत ही जबाबदारी अनेकदा व्यक्तीवर येते. अपूर्ण माहिती, अफवा, बनावट व्हिडिओ आणि द्वेषपूर्ण प्रचार वेगाने पसरतो. डिजिटल दरीमुळे ज्यांच्याकडे स्मार्टफोन आणि नेट नाही त्यांचा आवाज अजूनही बाहेर राहतो. ग्रामीण महिला पत्रकारांना सुरक्षा, कौटुंबिक विरोध आणि जातीय तिरस्कार यांचा सामना करावा लागतो. खबर लहरियाच्या पत्रकारांना सुरुवातीला वृत्तपत्र विकताना टोमणे ऐकावे लागले. बाईमाणूसच्या काही पत्रकारांनाही समाजातील दबाव जाणवतो.

म्हणून प्रोझ्युमर पत्रकारिता यशस्वी व्हायची असेल तर केवळ तंत्रज्ञान पुरेसे नाही. माध्यम साक्षरता, तथ्य पडताळणीची सवय, समुदाय स्तरावरील प्रशिक्षण आणि नैतिक जाणीव आवश्यक आहे. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आणि जबाबदारी यांचा समतोल राखला तरच ही पत्रकारिता विश्वासार्ह राहील. निष्कर्ष असा की टॉफ्लरने कल्पिलेला प्रोझ्युमर आज भारतीय ग्रामीण आणि स्त्री जीवनात जिवंत दिसतो. खबर लहरिया आणि बाईमाणूस हे दाखवतात की जे लोक पूर्वी फक्त बातमीचे विषय होते, ते आता बातमीचे निर्माते बनू शकतात. ही केवळ माध्यमांची नवी शैली नाही. ही सत्तेच्या रचनेत, आवाजाच्या मालकीत आणि लोकशाहीच्या अर्थात होणारी महत्त्वाची सामाजिक क्रांती आहे. भविष्यातील पत्रकारिता अधिक लोकाभिमुख असेल, पण ती सत्य आणि जबाबदारी या दोन खांबाशिवाय टिकणार नाही.

**डॉ. रेखा शेळके**

# उर्दू शिक्षकांवरील अन्यायाचा 'हिशेब' पंचायत राज समितीसमोर!

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा परिषद अंतर्गत उर्दू माध्यमाच्या शिक्षकांवर अन्याय झाल्याचा आरोप करीत अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांनी पंचायत राज समितीचे प्रमुख संतोषजी दानवे यांच्याकडे तक्रार केली आहे. या प्रकरणातील विविध बाबींची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. आमदार पठाण यांनी तक्रारीत जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाशी संबंधित चार महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत.



## आ.साजिद खान पठाण आक्रमक

ऑगस्ट २०२४ मध्ये पवित्र पोर्टलच्या माध्यमातून १३ उर्दू शिक्षक जिल्हा परिषदेत रुजू झाले. मात्र, त्यांना तब्बल सहा महिने कोणतीही शाळा देण्यात आली नसल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे या कालावधीत उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. तसेच संबंधित शिक्षकांची सहा महिन्यांची सेवाज्येष्ठता कमी झाली असून, त्यांना मासिक वेतनाच्या बाबतीतही अन्याय सहन करावा लागल्याचे तक्रारीत नमूद आहे.

दुसऱ्या मुद्द्यात १ डिसेंबर २०२२ रोजीच्या शासन निर्णयाचा संदर्भ देण्यात आला आहे. अकोला जिल्हा परिषद अंतर्गत उर्दू माध्यमाच्या १०४ शाळा असताना किमान १० उर्दू केंद्र समन्वयक पदांची पदनिश्चिती करणे आवश्यक असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. मात्र, उर्दू माध्यमासाठी स्वतंत्र पदनिश्चिती न करता विभागीय स्पर्धेच्या माध्यमातून ४२ केंद्र समन्वयकांची पदोन्नती करण्यात आल्याचा आरोप आहे. यासंदर्भात संघटनेने वेळोवेळी निवेदने देऊनही त्याची दखल घेण्यात आली नसल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

सन २०२५ मध्ये जिल्हा परिषद अंतर्गत झालेल्या शिक्षकांच्या बदल्यांच्या प्रक्रियेवरही आमदार पठाण यांनी आक्षेप घेतला आहे. काही शिक्षकांनी कथित खोटी प्रमाणपत्रे सादर करून सोयीच्या ठिकाणी बदल्या करून घेतल्याच्या तक्रारी झाल्यानंतर ३३ शिक्षकांना निलंबित करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यात उर्दू माध्यमाच्या तीन शिक्षकांचाही समावेश असल्याचे सांगण्यात आले आहे.

मात्र, निलंबनानंतर मुख्यालय निश्चित करताना दुटप्पी धोरण अवलंबण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. ३३ निलंबित शिक्षकांपैकी २२ शिक्षक अकोला पंचायत समितीमध्ये कार्यरत होते. त्यापैकी १५ शिक्षकांना निलंबनानंतरही अकोला पंचायत समिती मुख्यालयी ठेवण्यात आले; तर उर्दू माध्यमाच्या तीन शिक्षकांचे मुख्यालय इतर पंचायत समित्यांमध्ये बदलण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या निर्णयामागील निकषांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.अकोला शहरातील जिल्हा परिषद उर्दू शहर कन्याशाळेतील मुख्याध्यापकाचे पदही सुमारे एक वर्षापासून रिक्त असल्याचा मुद्दा तक्रारीत मांडण्यात आला आहे. याबाबत वारंवार सूचना करूनही पद भरण्याची कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप आहे.

या सर्व प्रकरणांची कागदपत्रांच्या आधारे सखोल चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी आणि दोषी आढळल्यास संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रतनसिंग पवार यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी आमदार साजिद खान पठाण यांनी पंचायत राज समितीकडे केली आहे.

## शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार यांच्यावर कारवाईची मागणी

### '१३ शिक्षकांचा सहा महिन्यांचा हिशेब कोण देणार?'

पवित्र पोर्टलमधून नियुक्त झालेले १३ शिक्षक ऑगस्ट २०२४ मध्ये रुजू झाले. मात्र, त्यांना सहा महिने शाळा मिळाली नसल्याचा आरोप आहे. त्यामुळे त्या कालावधीतील सेवाज्येष्ठता, वेतन आणि विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान याची जबाबदारी कोणाची, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. पंचायत राज समितीने नियुक्तीपासून प्रत्यक्ष शाळा वाटपापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया तपासण्याची मागणी आहे.

### '४२ केंद्र समन्वयकांची पदोन्नती; उर्दूसाठी पदनिश्चिती का नाही?'

जिल्ह्यात १०४ उर्दू माध्यमाच्या शाळा असताना किमान १० उर्दू केंद्र समन्वयक पदांची पदनिश्चिती आवश्यक असल्याचा दावा तक्रारीत आहे. मात्र, त्याऐवजी ४२ केंद्र समन्वयकांची पदोन्नती करण्यात आल्याचा आरोप आहे. १ डिसेंबर २०२२ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी झाली की नाही? याची कागदपत्रांसह तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### 'निलंबन समान; मग मुख्यालयाचे निकष वेगळे का?'

३३ शिक्षकांच्या निलंबनानंतर मुख्यालय निश्चित करताना समान निकष वापरण्यात आले का, हा कळीचा मुद्दा आहे. तक्रारीनुसार २२ शिक्षक अकोला पंचायत समितीतील होते. त्यापैकी १५ जणांना त्याच मुख्यालयी ठेवण्यात आले, तर तीन उर्दू शिक्षकांचे मुख्यालय बदलण्यात आले. प्रशासकीय निर्णय कोणत्या नियमाच्या आधारे घेण्यात आला? याचे उत्तर चौकशीतून स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे.

## व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी असामाजिक तत्वावर अंकुश लावण्याची चेंबरची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील एका व्यापाऱ्याच्या प्रतिष्ठानावर अलीकडे झालेल्या लुटेच्या घटनेनंतर विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री अकोला यांनी गंभीर चिंता व्यक्त करत या घटनेची तीव्र शब्दांत निंदा केली आहे. चेंबरने पोलिस प्रशासनाकडे अशा घटनांची पुनरावृत्ती रोखण्यासाठी व असामाजिक तत्वावर तत्काळ ठोस व प्रभावी पावले उचलण्याची मागणी केली आहे.

पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कार्यक्षमतेवर व्यापारी वर्गाचा पूर्ण विश्वास आहे. तरीही काही काळापासून व्यापाऱ्यांना लक्ष्य करून होणाऱ्या गुन्हेगारी घटना नक्कीच चिंतेचे विषय ठरल्या आहेत. यामुळे व्यापारी व त्यांच्या कुटुंबात असुरक्षिततेची भावना वाढत आहे. काही असामाजिक घटक व्यापारी समुदायाला सुलभ 'सॉफ्ट टार्गेट' समजून धाडसी कारवाया करत आहेत. या प्रवृत्तीकडे वेळोवेळी प्रभावी प्रतिबंध न केल्यास शहराच्या व्यावसायिक व सामाजिक वातावरण व आर्थिक गतिशीलतेवर थेट परिणाम होऊ शकतो. म्हणून व्यावसायिक भागात प्रभावी पोलिस गस्त, सतत देखरेख आणि संशयास्पद गतिविधींवर काटेकोरपणे लक्ष ठेवण्यासोबतच गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक व भय निर्माण करणाऱ्या ठोस यंत्रणा तत्काळ सक्रिय करण्यात याव्यात. तसेच अलीकडील घटनांमध्ये दोषीं विरुद्ध त्वरीत आणि काटेकोर कारवाई करून व्यापारी वर्गाला स्पष्ट सुरक्षा संदेश द्यावा. व्यापारी व उद्योजक हे शहराच्या अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत.

# अकोल्याच्या रंगभूमीचा समृद्ध वारसा 'रंगसंवाद'मधून उलगडला

## १९ ज्येष्ठ रंगकर्मींनी गाजलेल्या नाटकांतील स्वगतांतून रसिकांना दिली नाट्यविश्वाची अनुभूती



■ प्रतिनिधी | अकोला ■

प्रभात चॅरिटेबल सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष स्व. साहेबरावजी नारे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित 'रंगसंवाद' या अभिनव कार्यक्रमातून अकोल्याच्या समृद्ध नाट्यपरंपरेचा जागर झाला. विदर्भ साहित्य संघ, शाखा अकोला आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मलकापूर-अकोला शाखेच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी प्रभात किड्स स्कूल, तोष्णीवाल ले-आउट येथे हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते नटराज पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर सहभागी कलावंतांनी सामूहिक नांदी सादर करून कार्यक्रमाला नाट्यमय सुरुवात केली. अकोल्यातील तब्बल १९ ज्येष्ठ रंगकर्मींनी विविध गाजलेल्या नाटकांतील स्वगतांचे प्रभावी सादरीकरण केले.

यामध्ये दिलीप देशपांडे यांनी 'मेड इन इंडिया', डॉ. रमेश थोरात यांनी 'आले आले शिवराय आले', विष्णू निंबाळकर यांनी 'तहान', डॉ. सुनील गजरे यांनी 'कापूस कोंड्याची गोष्ट', वंदना बाबर यांनी 'मी काहीही विसरलो नाही', विद्या बनाफर व प्रमोद गोलडे यांनी 'नटसम्राट', राजेश तराळे यांनी 'पाझर', डॉ. रावसाहेब काळे यांनी 'फाशी', विवेक वडशिंगीकर यांनी 'आरसा आणि मी', गीता जोशी यांनी 'उद्या नावाचा दिवस', राहुल भगत यांनी 'धुईधान', विनय बोदडे यांनी 'पुत्र कामेष्टी', श्रद्धा वरणकार यांनी 'शांतता! कोर्ट चालू आहे', अभय कुलट यांनी 'व्हिडिओ कॉलिंग', अमोल ताले यांनी 'लेखकाचा कुत्रा', अमृता जोशी-जटाळे यांनी 'ती फुलराणी', भूषण सराग यांनी 'रायगडाला जेव्हा जाग येते...' आणि सचिन पाटील यांनी 'अंधायुग' या नाटकांतील स्वगत सादर केले. प्रत्येक रंगकर्मीने आपल्या अभिनयातून व्यक्तिरेखेचे भावविश्व, अंतर्द्वंद्व आणि सामाजिक आशय प्रभावीपणे उलगडला. त्यामुळे विविध नाटकांतील व्यक्तिरेखा रंगमंचावर जिवंत झाल्याचा अनुभव रसिकांना आला. ज्येष्ठ रंगकर्मींच्या अनुभवष्संपन्न अभिनयाची मेजवानी मिळाल्याने विशेष रंगत आली.

### 'नाट्यकला समाजाच्या भावविश्वाचे प्रतिबिंब'

प्रमुख अतिथी म्हणून बोलताना विदर्भ साहित्य संघ, अकोला शाखेचे अध्यक्ष विजय कौसल यांनी नाट्यकला ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजाच्या भावविश्वाचे प्रतिबिंब दाखविणारी आणि माणसाला अंतर्मुख करणारी सशक्त कला असल्याचे सांगितले. 'रंगसंवाद'च्या माध्यमातून अकोल्याची समृद्ध नाट्यपरंपरा नव्या पिढीसमोर आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य झाल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक विदर्भ साहित्य संघ केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य डॉ. गजानन नारे यांनी केले. प्रभात अकॅडेमिक एज्युकेशन फाउंडेशनचे संचालक ॲड. वल्लभ नारे यांनी सूत्रसंचालन केले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मलकापूर-अकोला शाखेचे कार्यवाह अशोक ढेरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला अकोलेकर नाट्यरसिकांसह विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य तसेच विविध क्षेत्रांतील रंगकर्मी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्व. साहेबरावजी नारे यांच्या स्मृतींना नाट्यकलेच्या माध्यमातून अभिवादन करणारा 'रंगसंवाद' हा उपक्रम अकोल्याच्या सांस्कृतिक विश्वात संस्मरणीय ठरला.

## व्हॉईस ऑफ अकोलाचे विजेते ठरलेत सोळंके, देवपूजे व सोनोने

**अकोला :** महानगरातील प्रतिभावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित व्हॉइस ऑफ अकोला सीझन २ या गीत गायन व टॅलेंट हंट कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तीन गटात सम्पन्न झालेल्या या स्पर्धेत गट ए मधून प्रथम युग सोळंके विजेता ठरला.बी गटातून ओम देवपूजे हा विजेता ठरला, तर अंतिम डी गटातून प्रथम राजेश सोनोने ठरला.जेसीआय अकोला सिटी,लायन्स क्लब मिडटाऊन गोल्ड,लायन्स सफायर लायन्स क्लब राजपुताना यांच्या संयुक्त विद्यमाने निर्वाण सभागृहात संपन्न या भव्य गीत गायन व प्रतिभा शोध स्पर्धेचे ऑडिशन घेण्यात आले होते. ही स्पर्धाअ वयोगट ५ ते १४ वर्षं, ब गट १५ ते ३५ वर्ष व ड गट ३५ वर्षावरील सर्व महिला पुरुष अश्या तीन गटात घेण्यात आली होती.या स्पर्धेत अ व ब श्रेणीतील स्पर्धकांनी तानपूरावर सादरीकरण केले तर केवळ ड श्रेणीसाठी कॅराओके ट्रॅक्स ठेवण्यात आले होते.

**Change In Name**

I Have change My Name from
**A MUTALLIB A KARIM** -TO-
**ABDUL MUTALLIB ABDUL KALIM**
My Residential Address In Ansar Colony, Muzaffar Nagar Akola 444001

**NAME CHANGE DECLARATION**

I **AKASH DESHMUKH** hereby declare that I have changed my name from **"AKASH DESHMUKH"** -to- **"AKASH SURESH DESHMUKH"** for the purpose of obtaining a passport and updating my name in all official records. Hence forth, I shall be known as **AKASH SURESH DESHMUKH** Old Name: **AKASH DESHMUKH** New Name: **AKASH SURESH DESHMUKH** Both names refer to one and the same person.

Date :02/09/2026
Place : Akola **AKASH SURESH DESHMUKH**

**जाहीर सूचना**

माझे पक्षकार यांनी दिलेल्या महिती वरून सर्व नागरिकांना तसेच वित्तीय संस्था व बँक यांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार श्री. मोहम्मद रोशन युनुस मोहम्मद, रा. अकोट ता. अकोट आणि जिल्हा. यांच्या मालकी व अताब्यातील मौजे - अकोट भाग २, येथील सर्वे नं. ६८३ / १ मधील अकृषक प्लॉट नं. १६-अ, ज्यास सध्या नझूल शीट क्र. ४, नझूल प्लॉट क्र. २/२/२/१६/१, सीटीएस क्र. २/२/२/१६/१, भोगवटा वर्ग 'ई', एकूण क्षेत्रफळ ९७. ५३ चौ.मी. क्षेत्रफळ, ता अकोट आणि जि. अकोला; हे सदर मालमत्ता रजिस्टर खरेदीखताने ज्याचा र.द.क्र. २१५४, दि. ०६/०५/२०२६ अन्वये श्री. नादिमुल्ला बेग कलीमुल्ला बेग आणि श्री. मोहम्मद शकील मोहम्मद शफी यांच्या कडून खरेदी केली आहे. सदर मालमत्तेची जुनी मूळ खरेदी ज्याचा र. द.क्र. २७८८; दि. ०३/०८/२०१८ हि अकोट बस स्थानक परिसरात त्यांच्या पिशवीतून पडून गहाळ झाली आहे. तसेच माझे पक्षकार सदर मालमत्तेवर Bajaj Housing Finance Ltd, अकोला शाखा मार्फत कर्ज घेण्याकरीता अर्ज केला असून त्याकरिता नमूद मालमत्ता गहाण देत आहेत, म्हणून सदर गहाळ दस्ताची अत्यन्त अवशक्त आहे.

तरी जाहीर नोटीस द्वारे, आपणास कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हिस्सा, अधिकार किवां गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केला असल्यास, तथा ताबा असल्यास, किंव्हा कुठलाही दिवाणी अथवा फौजदारी दावा प्रलंबित व निकाली असल्यास, संबंधित व्यक्तीने नीटीस वृत्तपत्रात जाहीर झाला तारखे पासून ७ दिवसांच्या आत संपर्क साधावा; अन्यथा सदर मालमत्तेवर कोणाचाही कुठल्याही प्रकारे काहीहि ऐक हक्क, अधिकार, हित-संबंध आणि आक्षेप नसल्याचे समजले जाईल.

तसेच भविष्यात सदर गहाळ दस्त विचारात घेऊन कुठलाही व्यवहार जसेकी खरेदी, गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केलेले आढळल्यास त्यास सर्वस्वी लिहून घेणार/देणार जबाबदार राहील.

अकोला
दिनक:- ०२/०९/२०२६

**अँड. गौरव शि. देशमुख**
'वैष्णवी कॉम्प्लेक्स', फ्लॅट क्र. S4 (दुसरा मजला),
गौरक्षण रोड, ता व जिल्हा - अकोला
संपर्क: ९०२८२३२२४६ / ९४०४०९२०२४ (W)

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २६४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**अकोला महानगरपालिका, अकोला**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मनपा अकोला**

**निविदा सुचना क्र. १७ (२६-२७)**

आयुक्त, अकोला महानगरपालिका मनपा निधी अंतर्गत ०३ काम या कामांकरीता निविदा मागविण्यात येत आहे. करीता विस्तृत माहितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोलाच्या निविदा शाखेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर तसेच खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal https://amcakola.in

**कार्यकारी अभियंता**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/साबावि/४२८/२०२६,
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : २१/०९/२०२६

**जाहीर नोटीस**

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४७५/२०२६ प्रोसेस नं. ११०६०/२०२६
चौ.ता. १४/१०/२०२६ दिनांक : २९/०८/२०२६

**अर्जदार :** १. स्नेहलता सोहनलाल मेहता रा. १ / ९, व्ही. एच. बी. कॉलनी, रतनलाल प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. २. विजयकुमार सोहनलाल मेहता रा. वार्ड नं. ९, भूपाल सागर, चित्तोरगड, राजस्थान- ३१२२०४ ३. अजय सोहनलाल मेहता मयत तर्फे वारस अ. भाविका अजय मेहता २. सिद्ध अजय मेहता ३. सिया अजय मेहता सर्व रा. सी-८०३, आदिनाथ अव्हेन्यू, एस. व्ही. रोड, एन. एल. हायस्कूल, नर्सिंग लेन, मुंबई. ४०००६४ ४. राहुल सोहनलाल मेहता रा. १/९, व्ही. एच. बी. कॉलनी, रतनलाल प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. ५. संगिता रमेशकुमार डुंगरवाल रा. रेल्वे गेट जवळ, निंबाहेडा, चित्तोरगड, राजस्थान. ३१२६०१

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सोहनलाल लक्ष्मीलाल मेहता
**पत्ता :-** रा. १/९, व्ही. एच. बी. कॉलनी, रतनलाल प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सोहनलाल लक्ष्मीलाल मेहता यांचे दि. ०१/०९/२०१५ रोजी भूपालसागर चित्तरगड, राजस्थान येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १४/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# शिरला ग्रामपंचायतीत कोट्यवधींच्या भ्रष्टाचाराच्या आरोपांनी खळबळ!

## पंचायत राज समितीने 'कागदां'ऐवजी गावात उतरून कारभार तपासण्याची नागरिकांची मागणी

■ प्रतिनिधी | पातूर ■

ग्रामपंचायत म्हटली की गावाच्या विकासाची जबाबदारी! मात्र, पातूर तालुक्यातील शिरला ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत आता याच विकासाच्या नावाखाली निधीच्या वापराचा नेमका हिशेब कुठे आहे? असा थेट सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांमध्ये वाढ झाल्याचे सांगितले जात असतानाच विविध विकासकामे, बांधकामे आणि निधीच्या विनियोगात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आल्याने ग्रामपंचायतीच्या कारभाराची चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

अकोला जिल्ह्यात पंचायत राज समितीचा दौरा सुरू असतानाच शिरला ग्रामपंचायतीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. त्यामुळे समितीने केवळ कार्यालयातील फाईलींचा ढिगारा पाहण्यापेक्षा शिरला गावात प्रत्यक्ष दाखल होऊन विकासकामांची पाहणी करावी आणि आर्थिक व्यवहारांचा 'हिशेब' तपासावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



### पैसा वाढला; मग विकास कुठे गेला?

शिरला ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील बदल आणि पातूर नगरपरिषदेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या भागाच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांमध्ये वाढ झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. उत्पन्न वाढले, निधी उपलब्ध झाला; मग गावातील मूलभूत सुविधांमध्ये त्याचा परिणाम किती दिसतो, हा प्रश्न आता ग्रामस्थ विचारत आहेत. ग्रामपंचायतीच्या तिजोरीत आलेला पैसा नेमका कोणत्या कामासाठी गेला? किती खर्च झाला? कोणत्या कामावर किती खर्च दाखविण्यात आला? आणि प्रत्यक्षात त्या कामाची अवस्था काय आहे? या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे.

### उत्पन्नाचे स्त्रोत वाढले, तरी विकासकामांचा पत्ता नाही

### कागदावरची कामे, प्रत्यक्षात काय?

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध विकासकामे झाल्याची नोंद असेल तर त्या कामांची प्रत्यक्ष स्थळपाहणी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. मंजूर काम, अंदाजपत्रक, प्रत्यक्ष खर्च, देयके आणि कामाची गुणवत्ता यांचा ताळमेळ तपासला जाणे गरजेचे आहे. कागदावर विकासकामे पूर्ण आणि प्रत्यक्षात मात्र परिस्थिती जैसे थे, असा प्रकार कुठे घडला आहे का, याची चौकशी समितीने करावी, अशी मागणी होत आहे.

### निविदांपासून देयकांपर्यंत 'ऑडिट' करा!

ग्रामपंचायतीच्या मागील काही वर्षांतील आर्थिक व्यवहारांची सखोल तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. विकासकामांसाठी मंजूर निधी, निविदा प्रक्रिया, संबंधित कंत्राटदार, कामाचे आदेश, मोजमाप पुस्तिका, पूर्णत्वाचे दाखले, देयके आणि प्रत्यक्ष काम यांची पडताळणी झाल्यास निधीच्या वापराचे वास्तव समोर येऊ शकते, असे नागरिकांचे म्हणणे आहे. याशिवाय ग्रामपंचायतीला प्राप्त झालेला निधी आणि त्यातून झालेला खर्च याची वर्षनिहाय तुलना करण्याची मागणीही करण्यात येत आहे.

### समितीने 'फाईल'वर विसंबू नये!

पंचायत राज समिती गावोगावी जाऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराची पाहणी करीत असताना शिरला ग्रामपंचायतीचीही प्रत्यक्ष तपासणी व्हावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. कार्यालयात बसून फाईली तपासण्यापेक्षा ज्या कामांसाठी निधी खर्च झाल्याचे दाखविले आहे, त्या ठिकाणी समितीने स्वतः जाऊन पाहावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा, स्वच्छता, बांधकामे आणि अन्य विकासकामांवर झालेल्या खर्चाची प्रत्यक्ष स्थिती तपासली तर कागदोपत्री आणि जमिनीवरील विकासातील फरक स्पष्ट होऊ शकतो.

### 'कोट्यवधींचा भ्रष्टाचार' की केवळ आरोप?

दरम्यान, ग्रामपंचायतीच्या कारभारात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करण्यात आला असला तरी त्याची अद्याप अधिकृत चौकशी झालेली नाही. त्यामुळे हे आरोप सिद्ध झालेले तथ्य नसून त्यांची सत्यता तपासणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत प्रशासनाची अधिकृत भूमिका आणि संबंधित कागदपत्रे समोर आल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. मात्र, आरोपांची व्याप्ती लक्षात घेता पंचायत राज समितीने या प्रकरणाकडे दुर्लक्ष न करता विशेष तपासणी करून ग्रामपंचायतीच्या आर्थिक कारभाराचा लेखाजोखा जनतेसमोर आणावा, अशी मागणी आता जोर धरत आहे. ग्रामपंचायतीच्या तिजोरीत किती पैसा आला आणि तो नेमका कुठे गेला? या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी आता पंचायत राज समिती नेमकी काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# आदिवासी क्षेत्रातील रिक्त पदांची भरती सहा महिन्यांत करावी-मुख्यमंत्री

## अधिसंख्य पदांवरील कर्मचाऱ्यांची माहिती दोन आठवड्यांत सादर करण्याचे निर्देश

**मुंबई/जनमाध्यम**

विविध शासकीय विभागांमध्ये अधिसंख्य पदांवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची तसेच त्या अनुषंगाने उपलब्ध मूळ रिक्त पदांची सविस्तर माहिती दोन आठवड्यांच्या आत सादर करावी. आदिवासी क्षेत्रातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया सहा महिन्यांच्या आत करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मंत्रालय येथे आदिवासी क्षेत्रातील (पेसा) रिक्त पदांबाबत बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मंत्रिमंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेश अग्रवाल सर्व विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित कर्मचाऱ्यांना मूळ पदांवरून कार्यमुक्त करण्यात आले. मात्र, अनेक कर्मचाऱ्यांनी दीर्घकाळ सेवा बजावल्याने मानवतावादी दृष्टिकोनातून त्यांना अधिसंख्य पदांवर सामावून घेण्यात आले.

प्रत्येक विभागाने आपल्या विभागात अधिसंख्य पदांवर किती कर्मचारी कार्यरत आहेत, त्यापैकी किती कर्मचारी निवृत्त झाले आहेत आणि त्या अनुषंगाने रिक्त मूळ पदे, याची अचूक माहिती तातडीने संकलित करावी, असे निर्देश सर्व



जिल्हाधिकाऱ्यांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. ही सर्व माहिती मुख्य सचिव कार्यालयाकडे सादर करण्यात येणार असून, त्यानंतर संबंधित विभागांनी रिक्त पदांवरील भरतीसाठी आवश्यक व्यवस्था उभारावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या संदर्भातील कालमर्यादा कोणत्याही परिस्थितीत बदलली जाणार नसून, सर्व संबंधित विभागांनी निश्चित वेळेत माहिती सादर करून भरती प्रक्रियेची तयारी पूर्ण करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. बैठकीत अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील नियुक्त्यांच्या पडताळणी प्रक्रियेबाबत चर्चा करण्यात आली. २०१५ मध्ये करण्यात आलेल्या आढाव्यानुसार काही कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर झाले नव्हते. त्यानंतर २०१९ मध्ये करण्यात आलेल्या पडताळणीत वैधता प्रमाणपत्र नसलेल्या सुमारे ६,८६० कर्मचाऱ्यांचा प्रश्न समोर आला. यापैकी १३४६ पदे भरलेली आहेत.

# राज्यस्तरीय पालक अधिकाऱ्यांकडून आरोग्य संस्थांची पाहणी

## ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य सेवांचा घेतला सविस्तर आढावा

**वर्धा/जनमाध्यम**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, उपलब्ध सुविधा आणि नागरिकांना मिळणाऱ्या आरोग्य सेवांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी राज्यस्तरीय पालक अधिकारी तथा आरोग्य सेवा, रुग्णालय-राज्यस्तर, मुंबई आयुक्तालयाचे उपसंचालक डॉ. डी. के. सोयाम यांनी जिल्ह्यातील विविध ग्रामीण व शहरी आरोग्य संस्थांना भेट देऊन सविस्तर पाहणी केली.

या पाहणी दौऱ्याप्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.राजसिंह पवार, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.मंगेश रेवतकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.विद्या पवार, आयुष अधिकारी डॉ.संदीप नखाते, वर्धा तालुका आरोग्य अधिकारी डॉ.दिघेकर, जिल्हा कार्यक्रम प्रमुख डॉ.हाडके आणि जिल्हा सनियंत्रण व मूल्यमापन अधिकारी स्मिता वासनिक यांच्यासह संबंधित जिल्हास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

डॉ.सोयाम यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, वायगाव निपाणी येथे भेट देऊन तेथील कामकाज, बाह्यरुग्ण सेवा, औषध उपलब्धता, तपासणी सुविधा आणि माता-बाल आरोग्य सेवांचा आढावा घेतला.

तसेच आरोग्य केंद्रात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला वेळेत, सुलभ व दर्जात्मक सेवा देण्याचे निर्देश त्यांनी दिले. यानंतर जिल्हा रुग्णालय, वर्धा येथे भेट देऊन रुग्णालयातील विविध विभाग, वैद्यकीय सेवा, निदान सुविधा, स्वच्छता आणि औषधांच्या उपलब्धतेची पाहणी करण्यात आली.

त्यानंतर ग्रामीण रुग्णालय, सेलू येथे भेट देऊन तेथील रुग्णसेवा, औषधसाठा व एकंदरीत कार्यक्षमतेची तपासणी करण्यात आली. शहरी भागाचा विचार करता वर्धा शहरातील स्नेहल नगर येथील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, इंदिरा नगर येथील नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र, तसेच आयुष्यमान आरोग्य मंदिर व नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र येथेही भेट देऊन पाहणी करण्यात आली.

या पाहणीदरम्यान डॉ.सोयाम यांनी आरोग्य संस्थांमधील साधनसामग्री व मनुष्यबळाचा प्रभावी वापर करणे, आवश्यक औषधे व तपासणी सुविधा निरंतर उपलब्ध ठेवणे आणि आरोग्य कार्यक्रमांची सक्षम अंमलबजावणी करण्याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. या राज्यस्तरीय पाहणीमुळे जिल्ह्यातील आरोग्य सेवांची प्रत्यक्ष स्थिती स्पष्ट झाली असून, आरोग्य सेवा अधिक सक्षम व गुणवत्तापूर्ण करण्यासाठी आवश्यक सुधारणांना नक्कीच चालना मिळणार आहे.

# आर्वीत ८ सप्टेंबरला दहीहंडीचा भक्तिमय जल्लोष

## देवाभाऊ दहीहंडी'सह सांस्कृतिक महोत्सवाची रंगणार पर्वणी विजेत्यांना लाखोंची बक्षिसे

**आर्वी/जनमाध्यम**

श्रीकृष्णाच्या भक्तीने आणि गोविंदांच्या जल्लोषाने आर्वी शहर दुमदुमणार आहे. स्व. यादव?ाव के?चे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मंगळवार, ८ सप्टेंबर रोजी 'भव्य खुली देवाभाऊ दहीहंडी व सांस्कृतिक महोत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. गांधी चौक येथे दुपारी १२ वाजता या सोहळ्याला प्रारंभ होणार आहे. दहीहंडी फोडण्यासाठी विदर्भातील नामवंत गोविंदा पथके सहभागी होणार असून, मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडण्याचा थरार आर्वीकरांना अनुभवता येणार आहे. श्रीकृष्णाच्या जयघोषात रंगणाऱ्या या सोहळ्यामुळे शहरात भक्तिमय वातावरणासोबतच उत्साह आणि जल्लोषाची पर्वणी पाहायला मिळणार आहे. स्पर्धेतील विजेत्या पथकाला १ लाख ५१ हजार १ रुपये व आकर्षक शिल्ड, तर उपविजेत्या पथकाला ७१ हजार १ रुपये व शिल्ड देण्यात येणार आहे. यासोबतच नृत्य, कला आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानीही नागरिकांना अनुभवता येणार आहे. परंपरा, भक्ती आणि मनोरंजनाचा संगम असलेल्या या भव्य सोहळ्याला आर्वी शहरासह परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन माजी आमदार दादाराव केचे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### पर्समधून ३.२५ लाखांचे दागिने लंपास

**समुद्रपूर**-बसने प्रवास करणाऱ्या महिलेच्या पर्समधून अज्ञात चोरट्याने तब्बल ३ लाख २५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले. उमरेड ते हिंगणघाट प्रवासादरम्यान ही घटना घडली. याप्रकरणी समुद्रपूर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील पूजा निब्रड या उमरेड येथे गेल्या होत्या. उमरेडहून हिंगणघाटकडे बसने येत असताना त्यांच्या पर्समधून दागिने चोरीस गेले. यात एक लाख रुपयांचे मंगळसूत्र, ५० हजारांची सोन्याची अंगठी, ७५ हजारांची सोन्याची चैन, २५ हजारांची दुसरी चैन, ५० हजारांचे कानातले आणि ५५ हजार रुपयांची पोथ असा ऐवज आहे. मोबाईल पाहण्यासाठी पर्स उघडली असता दागिने चोरीस गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### पेन्शन कार्डच्या नावावर शिक्षकाला ६.४० लाखांचा गंडा

**वर्धा**-पेन्शन कार्ड तयार झाल्याची खोटी माहिती देत सायबर ठगांनी सेवानिवृत्त शिक्षकाला ६ लाख ४० हजार रुपयांचा गंडा घातला. बँक खात्याची माहिती घेत परस्पर रक्कम काढून घेण्यात आली. याप्रकरणी वर्धा सायबर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.गणेशनगर येथील पंढरी ठाकरे हे सेवानिवृत्त शिक्षक आहेत. त्यांना अज्ञात व्यक्तीने फोन करून तुमचे पेन्शन कार्ड तयार झाले असून त्याचे व्हेरिफिकेशन करायचे असल्याचे सांगितले. आरोपीने विश्वास संपादन करून ठाकरे यांच्याकडून बँक ऑफ इंडियाच्या खात्याची माहिती घेतली. त्यानंतर त्यांच्या खात्यातून ६ लाख ४० हजार रुपये काढण्यात आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर ठाकरे यांनी सायबर पोलिसांत तक्रार दिली. त्यावरून गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### घर बांधकामावरून महिलेला शिवीगाळ

**हिंगणघाट**-घराचे बांधकाम सुरू असल्याच्या कारणावरून झालेल्या वादात महिलेला शिवीगाळ केल्याप्रकरणी मधुसूदन हारगोडे याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ही घटना संत गोमाजी वॉर्ड परिसरात घडली.तक्रारदार महिलेच्या घराचे बांधकाम सुरू आहे. याच कारणावरून तिचा मधुसूदन हारगोडे याच्याशी वाद झाला होता. त्यानंतर काही वेळाने महिला घराबाहेर आली असता आरोपी घराच्या बांधकामातील विटा पाडताना दिसून आला. याबाबत महिलेने त्याला विचारणा केली. त्यावेळी आरोपीने महिलेस शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घटनेनंतर महिलेने पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### पुलफैलमध्ये जुगार अड्ड्यावर धाड

**वर्धा**-शहरातील पुलफैल परिसरातील मोकळ्या जागेवर सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकून पाच जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल आणि दोन दुचाकी असा २ लाख ३९ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.पुलफैल परिसरात जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी मोकळ्या जागेवर छापा टाकला. यावेळी लखन लोंढे, सुनील सकटे, श्रीकांत लटारे, रोहित कासारे आणि अलकेश मोगरे हे जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी त्यांच्याकडून रोख रक्कम, तीन मोबाईल तसेच एमएच ३२ एवाय ७९७१ आणि एमएच ३२ एयू १४१९ क्रमांकाच्या दोन दुचाकी जप्त केल्या. या कारवाईनंतर पाचही जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

पुलगाव - शहरातील सुभाषनगर परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून आठ जणांविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल, दुचाकी आणि अन्य साहित्य असा एकूण २ लाख ७७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.पोलिसांना सुभाषनगर परिसरात जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्याआधारे पोलिसांनी जुगार अड्ड्यावर अचानक छापा टाकला. यावेळी अश्विनी मेहर, प्रणीत सहारे, जॉन पिंटो, अनुराग खडसे, ज्ञानेश्वर बाबुळकर, फरजीन खान, अजर खान आणि दौलत खान पठाण हे जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल, तीन दुचाकी आणि अन्य साहित्य जप्त केले.

# कीटकनाशक प्राशन केलेल्या युवकाचा मृत्यू

**हिंगणघाट**-कीटकनाशक प्राशन केल्याने प्रकृती गंभीर झालेल्या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना त्याची प्राणज्योत मालवली. याप्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.प्रफुल लोखंडे वय ४३ रा. इंदिरा गांधी वॉर्ड असे मृत युवकाचे नाव आहे. प्रफुल यांनी कीटकनाशक प्राशन केल्याने त्यांची प्रकृती बिघडली होती. त्यांना उपचारासाठी सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी रुग्णालयात दाखल नोंदी व इतर माहितीच्या आधारे तपास सुरू केला. या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

# सिझेरियननंतर गर्भवती महिलेचा मृत्यू

## प्रकृती खालावल्याने नागपुरातील एम्समध्ये उपचारादरम्यान मृत्यू; सेवाग्राम पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद

**वर्धा जनमाध्यम :** सिझेरियन प्रसूतीनंतर प्रकृती खालावलेल्या ३४ वर्षीय महिलेचा नागपुरातील एम्स रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. निकीता प्रसन्ना बलवीर, रा. वैशालीनगर रोड, गजानन मंदिर परिसर, वर्धा, असे मृत महिलेचे नाव आहे. याप्रकरणी सेवाग्राम पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून चौकशी सुरू केली आहे.

निकीता या आठ महिन्यांच्या गर्भवती होत्या. नियमित तपासणीसाठी त्या सेवाग्राम येथील रुग्णालयात गेल्या असता डॉक्टरांनी प्रसूती करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सिझेरियन शस्त्रक्रिया करून बाळाचा जन्म झाला. मात्र, प्रसूतीनंतर निकीता यांची प्रकृती अचानक खालावली.

डॉक्टरांनी तपासणी केली असता त्यांच्या पोटात रक्तस्त्राव होत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर पुन्हा शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र, प्रकृती अधिकच गंभीर झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नागपुरातील एम्स रुग्णालयात हलविण्यात आले.

उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. घटनेची सुरुवातीची नोंद नागपुरातील सोनेगाव पोलिस ठाण्यात झाली होती. मात्र, घटनास्थळ सेवाग्राम पोलिस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने संबंधित कागदपत्रे व केस डायरी सेवाग्राम पोलिसांकडे वर्ग करण्यात आली. त्यानुसार सेवाग्राम पोलिसांनी मर्ग क्रमांक ४१/२०२६, कलम १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता अंतर्गत अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रदीप फडणवीस करीत आहेत.

# हिंगणघाट येथे विशेष अनुज्ञप्ती शिबिरांचे आयोजन

**वर्धा/जनमाध्यम**

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वर्धाद्वारे हिंगणघाट येथे दरमहा नियमितपणे दोन अनुज्ञप्ती (ड्रायव्हिंग लायसन्स) शिबिरांचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार सप्टेंबर महिन्यातील नियमित शिबिरे २ आणि १७ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात येणार आहे.याशिवाय, मोटार ड्रायव्हिंग स्कूल, तालुका हिंगणघाट यांच्या सामूहिक निवेदनाची दखल घेत, नागरिकांच्या सोयीसाठी फक्त सप्टेंबर महिन्याकरिता अतिरिक्त विशेष अनुज्ञप्ती शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. ही विशेष शिबिरे ११ आणि २३ सप्टेंबर रोजी हिंगणघाट येथे पार पडणार आहेत.या विशेष शिबिरांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी अनुज्ञप्तीबाबतची ऑनलाईन अपॉइंटमेंट घेऊन सर्व आवश्यक कागदपत्रांसह शिबिराच्या ठिकाणी उपस्थित राहावे, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

# मेहंदीच्या रंगातून खुलली मुलींच्या कलेची जादू

## सिदरा मेहंदी क्लासच्या स्पर्धेत सानिया सैय्यद प्रथम; २१ विद्यार्थिनींचा गौरव

**सेलू/जनमाध्यम**

शिव-पार्वती मंगल कार्यालयात ३० ऑगस्ट रोजी सिदरा मेहंदी क्लासच्या वतीने आयोजित भव्य मेहंदी स्पर्धा व प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात पार पडला. सेलू शहर व परिसरातील विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग घेत विविध आकर्षक मेहंदी डिझाईन्स साकारत आपल्या कलागुणांचे प्रभावी दर्शन घडविले.

स्पर्धेचे परीक्षण नागपूरच्या प्रसिद्ध मेहंदी डिझायनर खुशबू पठाण, हिना पठाण आणि सायमा फातेमा यांनी केले. सहभागी विद्यार्थिनींच्या कलाकृतींचे बारकाईने परीक्षण करून उत्कृष्ट पाच विजेत्यांची निवड करण्यात आली.स्पर्धेत सानिया सैय्यद हिने प्रथम क्रमांक, प्रांजली वाघे हिने द्वितीय, आयशा शेख हिने तृतीय, खुशी अन्सारी हिने चतुर्थ, तर प्रेरणा मांडवकर हिने पाचवा क्रमांक पटकावला. विजेत्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. तसेच सहभागी सर्व विद्यार्थिनींना प्रोत्साहनपर ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात आले.

मेहंदी प्रशिक्षणाचा एक महिन्याचा कालावधी पूर्ण केलेल्या २१ विद्यार्थिनींनाही सिदरा मेहंदी क्लासच्या संचालिका नाजिया साजिद पठाण यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार रवींद्र कोटंबकार होते. प्रमुख पाहुणे म्हणून शहेजाद शेख, शकील सुभान शेख, रफीक शेख, सईद शेख, वकील शेख, शौकत पठाण, खुशबू पठाण आणि हिना पठाण उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन साक्षी बर्डे हिने केले.



आभार नाजिया साजिद पठाण यांनी मानले. यावेळी ड्रेस डिझायनर रुबिना ऊर्फ सानिया शेख, शमा पठाण, शबाना महाजन, आफरीन शेख, आसमा शेख यांच्यासह नंदिनी, जान्हवी, स्नेहल, अल्फिया, निकिता आदी विद्यार्थिनी, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नोकरीच्या शोधात भटकणाऱ्या युवकांना मिळाला दिशादर्शक हात

## रोजगार व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद, ४५० विद्यार्थी, युवक-युवतींचा सहभाग

**विरुळ-आकाजी/जनमाध्यम**

रोजगाराच्या संधींच्या शोधात असलेल्या ग्रामीण आणि शहरी भागातील युवकांना योग्य दिशा मिळावी, तसेच स्पर्धा परीक्षांच्या तयारीला बळ मिळावे, या उद्देशाने पुलगाव येथे आयोजित रोजगार व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे ४५० विद्यार्थी आणि युवक-युवतींनी सहभाग घेतला.पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. वंदना अ. कारखेले यांच्या पुढाकाराने शनिवारी लक्ष्मी सेलिब्रेशन येथे



शिबीर झाले. प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्र, राळेगाव यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. पुलगाव, देवळी, अल्लीपूर व खरांगणा परिसरातील युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. प्रमोद कांबळे व राज्य समन्वयक कोरडे यांनी व्यक्तिमत्त्व विकास, इंग्रजी संभाषण, संगणक ज्ञान, हॉटेलिंग, यांत्रिकी क्षेत्रातील प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. डॉ. कारखेले यांनी स्पर्धा परीक्षांसाठी सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य नियोजन आणि आत्मविश्वासाचे महत्त्व पटवून दिले. रोजगारासाठी धावणाऱ्या तरुणाईला केवळ आश्वासन नव्हे, तर कौशल्य आणि योग्य दिशा देणे हीच काळाची गरज आहे, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

# जिल्हा परिषद समाजकल्याणच्या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत इयत्ता १ ली ते १० वीत शिकणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्राची पूर्तता करून लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

साफसफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मॅट्रिकपुर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ३ हजार ५०० रुपये देण्यात येते. यासाठी पालक साफसफाई क्षेत्रात काम करीत असल्याचे प्रमाणपत्र व स्वयंघोषणापत्र आवश्यक आहे. इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ३ हजार ५०० रुपये दिले जातात. यासाठी पालकाचे वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार रुपयाच्या आत असावे. मागासवर्गीय विद्यार्थीनींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेंतर्गत इयत्ता ५ ते ७ वी पर्यंत ६०० रुपये आणि ८ वी ते १० पर्य १ हजार रुपये देण्यात येते. यासाठी विद्यार्थ्यांनी नियमित उपस्थित असावी.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण फि व परीक्षा फी योजना ही योजना खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शाळेत शिकणाऱ्या दारिद्रय रेषेखालील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येते. योजनेंतर्गत इयत्ता १ ली ते ४ थीपर्यंत १ हजार रुपये, इयत्ता ५ वी ७ वी १ हजार ५०० रुपये आणि इयत्ता ८ वी ते १० वी २ हजार रुपये देण्यात येतात. गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थी मागास प्रवर्गातून प्रथम किंवा द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेला असावा व किमान गुण ५० टक्के असावे. पात्र इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंत ५०० रुपये आणि ८ वी ते १० वी पर्यंत १ हजार रुपये देण्यात येणार आहे.

या योजनांचा लाभ आधारसंलग्नित बँक खात्यात जमा करण्यात येणार असल्याने विद्यार्थी तथा पालकाचे आधार अपडेट असणे अनिवार्य आहे. पालक व विद्यार्थ्यांनी मोबाईल क्रमांक आधार सोबत लिंक करावा. सोबतच विद्यार्थ्याचे स्वतः चे आधार संलग्नित बँक खाते असणे आवश्यक आहे. शाळा मुख्याध्यापकांनी शिष्यवृत्ती अर्जासाठी आवश्यक कागदपत्रांची मागणी करताच कागदपत्रे पुरविण्यात यावे. त्यासाठी शाळेच्या संपर्कात राहून आपल्या पाल्याचा अर्ज भरणेसाठी सहकार्य करावे.

तसेच इ. ९ वी १० वी मधे शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेकरीता उत्पन्न प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. उत्पन्न व जात प्रमाणपत्र काढले नसल्यास उपविभागीय अधिकारी यांच्याद्वारे शाळास्तरावर शिबीराचे आयोजन करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावेत, असे जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी कळविले आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २७७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# नेरपिंगळाई स्मशानभूमीच्या दुरवस्थेबाबत आजाद समाज पक्षाचे निवेदन

## तातडीने स्वच्छता व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी

**मोर्शी/प्रतिनिधीः-** तालुक्यातील नेरपिंगळाई गावातील धानोरा रोडवरील स्मशानभूमीची सध्या अत्यंत दुरवस्था झाली असून, नागरिकांना अंत्यविधीच्या वेळी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या स्मशानभूमीची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती व सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी आजाद समाज पार्टीच्या वतीने ग्रामपंचायत प्रशासनाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, स्मशानभूमी परिसरात स्वच्छतेकडे दुर्लक्ष झाले असून पाण्याची व्यवस्था उपलब्ध नाही. तसेच विद्युत दिव्यांची व्यवस्था, संरक्षण भिंत, शेड आदी आवश्यक सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे अंत्यविधीच्या वेळी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.



गावातील नागरिकांच्या सोयीसाठी स्मशानभूमीची तातडीने पाहणी करून स्वच्छता, पाणी, विद्युत व्यवस्था, संरक्षण भिंत व शेड यांसह आवश्यक दुरुस्तीची कामे करण्यात यावीत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. संबंधित मागण्यांची दखल घेऊन कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत, अन्यथा आजाद समाज पार्टीच्या वतीने जनआंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

यावेळी आझाद समाज पार्टीचे तालुकाध्यक्ष अक्षय दीपक पांडे, नितेश उत्तमराव इंगळे, सागर खंडारे, प्रफुल कीर्तकार, विवेक पांडे, अक्षय रा. पांडे, राहुल पांडे, अनिकेत गौ. पांडे, गजानन वानखडे यांच्यासह इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात पार्डी ग्रामपंचायतीची राज्यस्तरीय निवड



**मोर्शी/प्रतिनिधीः-** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत मोर्शी तालुक्यातील ग्रामपंचायत पार्डीने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय तपासणीसाठी पात्रता मिळविली आहे. शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. चंद्रकांत कुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती पार्डी ग्रामपंचायतीस भेट देऊन अभियानांतर्गत करण्यात आलेल्या विविध कामांचे प्रत्यक्ष मूल्यमापन करणार आहे.

राज्यात दि. १७ सप्टेंबर २०२५ पासून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात आले. या अभियानाच्या पहिल्या टप्प्यात मोर्शी तालुक्यातील १३ ग्रामपंचायतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अभियानाच्या पुढील टप्प्यांमध्ये तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय तसेच विभागीय पातळीवर तपासणी व मूल्यमापन करण्यात आले.

या सर्व टप्प्यांमध्ये पार्डी ग्रामपंचायतीने सातत्यपूर्ण व उल्लेखनीय कामगिरी केली. त्यानंतर अमरावती विभागातून राज्यस्तरीय तपासणीसाठी दोन ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली असून त्यामध्ये अमरावती जिल्ह्यातील पार्डी आणि बुलढाणा जिल्ह्यातील सावळी या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. पार्डी ग्रामपंचायतीच्या राज्यस्तरीय तपासणीसाठी ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. चंद्रकांत कुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखालील नऊ सदस्यीय समिती भेट देणार आहे. समितीमध्ये आदर्श गाव संकल्प समितीचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार, यशदा पुणेचे संचालक मल्लिनाथ कलशेट्टी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर दुबे, संचालक पंचायतराज गिरीश भालेराव, संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण राजाराम दिघे, शारदा गायधने, उपसचिव ग्रामविकास विभाग प्रशांत पाटील आणि कक्ष अधिकारी ग्रामविकास विभाग सागर मनोरे यांचा समावेश आहे.

समितीकडून ग्रामपंचायतीने अभियानाच्या कालावधीत केलेल्या विविध विकासकामांचे, सुशासन, लोकसहभाग, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, मूलभूत नागरी सुविधा, डिजिटल सेवा, विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच ग्रामविकासाच्या दृष्टीने करण्यात आलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे प्रत्यक्ष मूल्यमापन करण्यात येणार आहे.

# सायबर गुन्ह्यातील आरोपी क्रमांक २ ला जामीन

## -ॲड. भावेश भिसे यांच्या प्रभावी युक्तिवाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** सायबर गुन्ह्याशी संबंधित महत्त्वाच्या प्रकरणात आरोपी क्रमांक २ रोहन प्रभाकर वैद्य याला अमरावती येथील न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे. सदर प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲडव्होकेट भावेश भिसे यांनी प्रभावीपणे बाजू मांडत जामिनासाठी युक्तिवाद केला. सदर प्रकरण सायबर पोलीस स्टेशन, अमरावती शहर येथे Crime No. २१/२०२६ अन्वये नोंदविण्यात आले असून, आरोपी रोहन प्रभाकर वैद्य याने जामिनासाठी Criminal Bail Application No. २१/२०२६ दाखल केली होती. सदर जामीन अर्जावर सुनावणी होऊन मा. अतिरिक्त सत्र न्यायालयाने दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ रोजी आदेश पारित केला. आरोपीच्या वतीने ॲड. भावेश भिसे यांनी न्यायालयासमोर विविध कायदेशीर बाबी मांडत आरोपीस जामीन देण्याची विनंती केली.



सुनावणीदरम्यान तपासाची सद्यस्थिती, आरोपीची भूमिका तसेच जामीन मंजूर करण्यासंदर्भातील कायदेशीर मुद्द्यांवर प्रभावी युक्तिवाद करण्यात आला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर विद्यमान न्यायालयाने आरोपी क्रमांक २ याचा जामीन अर्ज मंजूर केला. मात्र, जामीन मंजूर करताना न्यायालयाने आरोपीवर एकूण १४ अटी व शर्ती घातल्या आहेत.

न्यायालयाने आरोपीला तपास प्रक्रियेत पूर्ण सहकार्य करण्याचे निर्देश देताना, जामिनाच्या अटींचा भंग झाल्यास जामीन रद्द करण्यासाठी कायदेशीर कार्यवाही होऊ शकते, याचीही स्पष्टता आदेशातून केली आहे.

सायबर गुन्ह्याच्या या प्रकरणात आरोपी क्रमांक २ च्या वतीने ॲडव्होकेट भावेश भिसे यांनी केलेल्या प्रभावी कायदेशीर युक्तिवादानंतर आरोपीस जामीन मिळाला आहे. जामीन मंजूर करताना न्यायालयाने तपासाच्या हिताचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने कठोर अटी लागू केल्या आहेत.

१४ कठोर अटींसह आरोपी क्रमांक २ ला मिळालेला हा जामीन आदेश अमरावतीतील कायदेवर्तुळात विशेष चर्चेचा विषय ठरत आहे.

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

## मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२५०/२०२६** — **ने.ता.०५.१०.२०२६**

**१. प्रमिला देविदासराव वैद्य**
**२. पूनम विश्वास खोब्रागडे** रा.परडी नसकरी, ता.घाटंजी, जि.यवतमाळ
**३. वर्षा देविदास वैद्य**
**४. जुलग देविदास वैद्य**
क्र.१,३,४ रा.शिवणी रसूलापूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

// वि //
निरंक

ज्याअर्थी, **मयत देविदास काशिनाथ वैद्य** यांचा **मृत्यू दि.२४.०६.२०२६** मध्ये **शिवणी रसुलापुर, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती** येथे झाला. मयताचे आई नामे **अलोकाबाई काशिनाथ वैद्य** यांचा **मृत्यू दि.१७.१०.२०१५** मध्ये **शिवणी रसुलापुर, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती** येथे झाला.मयताचे **अर्जदार क्र.१ ही पत्नी असून अर्जदार क्र.२ व ३ हया मुली आहेत तर अर्जदार क्र.४ हा मुलगा आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार **श्री भिमा सीताराम कडमंची आणि श्री लकी भीमा कडमंची दोघेही रा.जनता कॉलनी, गोपाल नगर, साई नगर, अमरावती** यांनी मला दिलेल्या माहिती व अधिकारावरुन मी सर्वत्र आम जनतेस जाहीर नोटीस देतो की, माझे पक्षकार यांनी खालील नमुद शेत मालकासोबत त्यांची शेत जमीन झाडाझुडपासह, अंगभूत वस्तूसह व पोटखराबसह खरेदी करण्याचा सौदा केला आहे, शेतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

शेत मालक जगदीश गौरीशंकर जयस्वाल, राजकुमार मिश्रीलाल जयस्वाल, गीता राजकुमार जयस्वाल, रा.मेहकर जि.बुलढाणा व जगदीश गौरीशंकर जयस्वाल रा.भाजी बाजार चौक, अमरावती, ता.जि.अमरावती यांचे मालकीची शेती यांचे तर्फे गौरव रविंद्र देशमुख रा.जयप्रभा कॉलोनी अमरावती, ता.जि.अमरावती यांचे सोबत,

**१)** शेतमालक जगदीश गौरीशंकर जयस्वाल यांचे मौजा धनोडी,ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती या शेतीचा शेत भूमापन क्र.१३५ भो.व.१, मधील ०.६८ आर + पोट खराब ०.०२ आर एकूण क्षेत्रफळ ० हे ७० आर.आकारणी १ रु ५० पै.या शेतीच्या चतुर्सिमा पूर्वेस - रस्ता व त्या पलीकडे गाव क्र.१३२ व १३३ चे शेत, पश्चिमेस -दुस-याचे शेत, उत्तरेस-रस्ता,दक्षिणेस- दुस-याचे शेत व

**२)** वरील नमुद शेत मालक यांचे संयुक्त मालकीचे मौजा शेंदूरजना खुर्द भाग १, ता.धामणगाव रेल्वे जि.अमरावती या शेतीचा शेत भूमापन क्र.५३, भो.व.१, एकूण क्षेत्रफळ १.४६ हे आर,आकारणी ४ रु ७५ पै.या शेतीच्या चतुर्सिमा पूर्वेस -गट क्र.५४,५५,५६ व ५७, पश्चिमेस - गट क्र.५२, उत्तरेस - धनोडी शिव, दक्षिणेस - शेत गट क्र.४१.

या नमुद शेती विषयी कुणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, ताबा, कर्ज, गहाण, दान, बोजा, बक्षीस, खरेदी, लीज, हिस्सा, करार, जप्ती, जामीन, अन्न वस्त्र करार, नोटरी केलेला करार, खरेदी करारनामा, इतर वारस, मृत्यू पत्र न्यायालयीन व न्यायालयाबाहेरील वाद, चर्तुसिमा बददल वाद वगैरे, ताब्यावरुन वाद, कसलाही प्रकारचा हक्क, अधिकार, संबंध इत्यादी असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आम्हाला लेखी कागदपत्रासह सह कळवावे व आमची खात्री करुन घ्यावी. वरील मुदतीत कोणाचेही कसल्याही प्रकारची लेखी तक्रार, हरकत न आल्यास वरील नमुद शेती ही खरेदी व्यवहार करण्यास योग्य व निर्जोखमी आहे असे समजून माझे पक्षकार वरील नमुद शेतीविषयी, शेत मालकाशी खरेदीचा व्यवहार पूर्ण करुन घेतील. मग त्या नंतर वरील नमुद शेती संबंधी कोणाचीही, कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार चालणार नाही. विहीत कालावधी नंतर केलेल्या तक्रारीच्या परिणामास व खर्चास ती तक्रार करणारी व्यक्ती सर्वस्वी जबाबदार राहील व माझे पक्षकार यांची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**खरेदी घेणार तर्फे अधिवक्ता**
**(ॲड.निखिल पुरुषोत्तमराव देशमुख)**
**एन.डी.लिगल सर्विस**, "शिवप्रस्थ" १२ ब
वृंदावन कॉलनी, स्कूल ऑफ स्कॉलर
शाळेमागे निंभोरा, अमरावती.
**मो.- ९०९६०२८७२०**

## विकणे आहे

**४ व्हीलर गाडी विकणे आहे.**

**सोसायटी ऑफ अमरावती सिस्टर्स यांच्या मालकी हक्काची गाडी विकणे आहे.**

**SUMO GOLD EX/BS IV/2425**
**MH- 27- BE-5036**

**संपर्क- होली क्रॉस मरियमपुर चिखलदरा-अमरावती**

**मोबाईल- 7089812376 / 7447569432 / 9322145547**

## सार्वजनिक सूचना एवं धर्मार्थ उद्देश्य की घोषणा

### सार्वजनिक सूचना

**हम निम्नलिखित हस्ताक्षरकर्ता-**

१) श्री.संतोष पुंडलिकराव भालावी
२) श्रीमती रेखा तुलसीराम उईके (भालावी)
३) श्रीमती ललिताबाई आत्माराम तोरम
निवासी चिरोडी, चांदूर रेल्वे, जि.अमरावती (महाराष्ट्र)

एतदद्वारा आम जनता, संबंधित हितधारको तथा अपने परिवार एवं संभावित विधिक उत्तराधिकारीयोंको सुचित एवं घोषित करते है कि हमारी संबंधित भूमि/भूमि-अंश के संबंध में हमने श्रीमती वर्षा हरजीतसिंह मोंगा, निवासी अमरावती, महाराष्ट्र के पक्षमें दिनांक / /२०२ को आवश्यक करार/दस्तावेज निष्पादित किए है.

उक्त भूमि/भूमि-अंश के संबंध मे हमारी स्वतंत्र, स्वैच्छिक एवं स्पष्ट मंशा है कि इसका उपयोग गौशाला, गौसेवा, गौसंरक्षण, पशू कल्याण एवं अन्य सार्वजनिक धर्मार्थ कार्योके लिए किया जाए.

हम इस बात से भी सहमत है कि श्रीमती वर्षा हरजीतसिंह मोंगा, लागू कानून एवं आवश्यक शासकीय अनुमति के अधीन, उक्त भूमि का उपयोग स्वयं गौसेवा के लिए कर सकती है अथवा किसी विधिवत स्थापित गौशाला, सार्वजनिक धर्मार्थ न्यास, गौसंरक्षण संस्था अथवा अन्य पात्र धर्मार्थ संस्था को गौसेवाएवं पशू कल्याण के उद्देश्य से उपयोग हेतू उपलब्ध करा सकती है.

**भूमि का विवरण-**

गट क्र./सर्व्हे क्र.७०/१, **मौजा**- चिरोडी, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
कुल क्षेत्रफल - ९ हे.६२ आर, आकार २.०० **संबंधित** भूमि-अंश १ एकर ६८ आर

**सीमाएँ-**

पूर्व - या शेताचा भाग व नंतर राम तोर यांचे शेत,
पश्चिम - वन विभागाची जमीन
उत्तर - हायवे, चांदूर रेल्वे डांबरी रस्ता
दक्षिण- याच शेताचा भाग

**महत्वपूर्ण वैधानिक घोषणा-**

यह सूचना केवल हमारी वास्तविक, स्वैच्छिक एवं धर्मार्थ मंशा तथा संबंधित करार/दस्तावेज के सार्वजनिक अभिलेखीकरण हेतु प्रकाशित की जा रही है.

यदि किसी व्यक्ति के पास उक्त भूमि/भूमि-अंश के संबंध में कोई वास्तविक एवं वैधानिक अधिकार या दावा है, तो वह अपने मूल दस्तावेजो सहीत सक्षम प्राधिकारी के समक्ष ७ दिन के अंदर विधि के अनुसार प्रस्तुत कर सकता है.

हमारी ओर से किसी भी वास्तविक वैधानिक दावे को कानून के अनुसार ही देखा जाएगा.

**घोषणाकर्ता / संबंधित विक्रेता**
**१. श्री.संतोष पुंडलिकराव भालावी**
**हस्ताक्षर (संतोष पुं.भलावी)**
**२. श्रीमती रेखा तुलसीराम उईके (भालावी)**
**हस्ताक्षर (सौ.रेखा तु.उईके)**
**३) श्रीमती ललिताबाई आत्माराम तोरम**
**हस्ताक्षर (सौ.ललिता आ.तोराम)**
**दि.३१.०८.२०२६**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती वि.श्री.ए.बी.कट्टे, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.१७९४/२०२६**
**सिमरन व इतर विरुध्द निरंक**
**पुढील ता.०६.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
1. **Dnyaneshwar S/o. Rajaram Ugale**
Age 64 years. Occu.: Nil
R/o. Gopal Nagar, Maya Nagar, Amravati
2. **Atul S/o. Dnyaneshwar Ugale**
Age 39 years. Occu.: Labourer
R/o. Kumbharwada, Maya Nagar, Rukhmini Nagar, Amravati
3. **Dinesh S/o. Dnyaneshwar Ugale**
Aged 37 years. Occu.: Labourer
R/o.Janata Colony, Navdurgavihar, Kumbharwada, Sainagar, Amravati, Tq. & Dist.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत राजेश चिमनदास मेठानी** हे दिनांक **२०.०१.२०१६** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार सिमरनबाई व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सिमरनबाई व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २७.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## जाहीर सुचना

माझे अशील **राशीद खान समद खान** यांची खालील मिळकतीचे मुळ खरेदीखत दि.२५/०७/२०२५ र.द.क्र.६३६४ हे गहाळ झाले असून कोणास या बाबत माहिती असल्यास किंवा कोणाला सापडली असल्यास किंवा कुठे गहाण असल्यास त्यांनी खालील पत्त्यावर कळविणे किंवा आणुन देणे.

याव्दारे सर्वाना कळविण्यात येते की, या मिळकतीबाबत वरील दस्ताऐवज ला घेऊन कोणतेही व्यवहार करु नये व केल्यास माझे अशील होणा-या नुकसानास जबाबदार राहणार नाही व त्यांच्यावर कुठलेही बंधन राहणार नाही.

वरील मिळकती खरेदी संदर्भात कुठलीही आक्षेप/माहिती ०७ दिवसात प्राप्त झाली नाही तर माझे अशील सदर मिळकतीचे दस्त गहाळ झाले असे समजून पुढील कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

सदर मिळकत ही मनपा अमरावती व दु.नि.अमरावती यांच्या अधिकारा खालील येत असून, याचा **शे.स.क्र.८/२/३, ८/२/५** नझुल शिट क्र.----, **प्लॉट क्र.९८** याचे क्षेत्रफळ **१९७.८३ चौ.मि.** या वर मौजे तारखेडा,प्रगणे बडनेरा, ता अमरावती व जि.अमरावती याची चतुःसिमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस - प्लॉट क्र.९६,९७ — पश्चिमेस - रोड
उत्तरेस- प्लॉट क्र.९९ — दक्षिणेस - दुस-याचे शेत

**सही/-**
**(ॲड.वैभव न.काकिर्डे )**
**१९, हरिओम कॉलनी,**
**संताजी नगर, अमरावती**
**मो. ९६७३८२१००१**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.१८२९/२०२६**
**ज्ञानेश्वर + २ वि निरंक**
**पुढील ता.०१.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार**
1. **Dnyaneshwar S/o. Rajaram Ugale**
Age 64 years. Occu.: Nil
R/o. Gopal Nagar, Maya Nagar, Amravati
2. **Atul S/o. Dnyaneshwar Ugale**
Age 39 years. Occu.: Labourer
R/o. Kumbharwada, Maya Nagar, Rukhmini Nagar, Amravati
3. **Dinesh S/o. Dnyaneshwar Ugale**
Aged 37 years. Occu.: Labourer
R/o.Janata Colony, Navdurgavihar, Kumbharwada, Sainagar, Amravati, Tq. & Dist.Amravati

**विरुध्द**

**गैरअर्जदार - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Bebital Dnyaneshwar Ugale** हया **दि. १९.०३.२०१९** रोजी अमरावती येथे मयत झाले. **Dnyaneshwar S/o. Rajaram Ugale + 2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Dnyaneshwar S/o. Rajaram Ugale + 2** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३१.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार **श्री गणपत सीताराम कडमंची आणि श्री लोकेश गणपत कडमंची दोघेही रा.जनता कॉलनी, गोपाल नगर, साई नगर, अमरावती** यांनी मला दिलेल्या माहिती व अधिकारावरुन मी सर्वत्र आम जनतेस जाहीर नोटीस देतो की, माझे पक्षकार यांनी खालील नमुद शेत मालकासोबत त्यांची शेत जमीन झाडाझुडपासह, अंगभूत वस्तूसह व पोटखराबसह खरेदी करण्याचा सौदा केला आहे, शेतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

शेत मालक जगदीश गौरीशंकर जयस्वाल, राजकुमार मिश्रीलाल जयस्वाल, गीता राजकुमार जयस्वाल, रा.मेहकर जि.बुलढाणा व जगदीश गौरीशंकर जयस्वाल रा.भाजी बाजार चौक, अमरावती, ता.जि.अमरावती यांचे संयुक्त मालकीची शेती यांचे शैलजा रविंद्र देशमुख रा.जयप्रभा कॉलोनी अमरावती, ता.जि.अमरावती यांचे सोबत,

**१)** मौजा शेंदूरजना खुर्द भाग १, ता.धामणगाव रेल्वे जि.अमरावती या शेतीचा शेत भूमापन क्र.५१ भो.व.१, एकूण क्षेत्रफळ १.५२ आर, आकारणी ५ रु ०० पै.या शेतीच्या चतुर्सिमा पूर्वेस - शेत गट क्र.५२, पश्चिमेस - गट क्र.५०, उत्तरेस - धनोडी शिव, दक्षिणेस - धनोडी पांदन व

**२)** मौजा शेंदूरजना खुर्द भाग १, ता.धामणगाव रेल्वे जि.अमरावती या शेतीचा शेत भूमापन क्र.५२ भो.व.१, क्षेत्रफळ १.८८ हे आर + ०.०३ आर पोट खराब, एकूण क्षेत्रफळ १ हे ९१ आर, आकारणी ६ रु २० पै.या शेतीच्या चतुर्सिमा पूर्वेस - शेत गट क्र.५२, पश्चिमेस - गट क्र.५०, उत्तरेस - धनोडी शिव,दक्षिणेस - शेत गट क्र.४१.

या नमुद शेती विषयी कुणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, ताबा, कर्ज, गहाण, दान, बोजा, बक्षीस, खरेदी, लीज, हिस्सा, करार, जप्ती, जामीन, अन्न वस्त्र करार, नोटरी केलेला करार, खरेदी करारनामा, इतर वारस, मृत्यू पत्र न्यायालयीन व न्यायालयाबाहेरील वाद, चर्तुसिमा बददल वाद वगैरे, ताब्यावरुन वाद, कसलाही प्रकारचा हक्क, अधिकार, संबंध इत्यादी असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आम्हाला लेखी कागदपत्रासह सह कळवावे व आमची खात्री करुन घ्यावी. वरील मुदतीत कोणाचेही कसल्याही प्रकारची लेखी तक्रार, हरकत न आल्यास वरील नमुद शेती ही खरेदी व्यवहार करण्यास योग्य व निर्जोखमी आहे असे समजून माझे पक्षकार वरील नमुद शेतीविषयी, शेत मालकाशी खरेदीचा व्यवहार पूर्ण करुन घेतील. मग त्या नंतर वरील नमुद शेती संबंधी कोणाचीही, कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार चालणार नाही. विहीत कालावधी नंतर केलेल्या तक्रारीच्या परिणामास व खर्चास ती तक्रार करणारी व्यक्ती सर्वस्वी जबाबदार राहील व माझे पक्षकार यांची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**खरेदी घेणार तर्फे अधिवक्ता**
**(ॲड.निखिल पुरुषोत्तमराव देशमुख)**
**एन.डी.लिगल सर्विस**, "शिवप्रस्थ" १२ ब
वृंदावन कॉलनी, स्कूल ऑफ स्कॉलर
शाळेमागे निंभोरा, अमरावती.
**मो.- ९०९६०२८७२०**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१७३३/२०२६
**सौ.अलका अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२२.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. सौ.अलका संजय इंगळे, वय ४८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. आदित्य संजय इंगळे, वय २३ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
३. सम्यक संजय इंगळे, वय २१ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
वरील सर्व रा.शितला विहार, महादेव खोरी, रुक्मिणीनगर, अमरावती
४. सुशिला पांडुरंग इंगळे, वय ७६ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.आसेगांव पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत संजय पांडूरंगजी इंगळे** यांचे दिनांक **०९.०७.२०२६** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार सौ.अलका संजय इंगळे अधिक तीन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सौ.अलका संजय इंगळे अधिक तीन** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर सुचना

माझे अशील **दिनेश शालिग्राम वासेवाय** यांची खालील मिळकतीचे मुळ खरेदीखत दि.०७/०६/२०१६ र.द.क्र.२६२७ व दि.०७/०५/२०१८ र.द.क्र.१८०९ हे गहाळ झाले असून कोणास या बाबत माहिती असल्यास किंवा कोणाला सापडली असल्यास किंवा कुठे गहाण असल्यास त्यांनी खालील पत्त्यावर कळविणे किंवा आणुन देणे.

याव्दारे सर्वाना कळविण्यात येते की, या मिळकतीबाबत वरील दस्ताऐवज ला घेऊन कोणतेही व्यवहार करु नये व केल्यास माझे अशील होणा-या नुकसानास जबाबदार राहणार नाही व त्यांच्यावर कुठलेही बंधन राहणार नाही.

वरील मिळकती खरेदी संदर्भात कुठलीही आक्षेप/माहिती १५ दिवसात प्राप्त झाली नाही तर माझे अशील सदर मिळकतीचे दस्त गहाळ झाले असे समजून पुढील कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

सदर मिळकत ही मनपा अमरावती व दु.नि.अमरावती यांच्या अधिकारा खालील येत असून, याचा **शे.स.क्र.१/२/A व १/२/B**, नझुल शिट क्र.----, **प्लॉट क्र.१८** याचे क्षेत्रफळ **१०१.२० चौ.मि.(१०८९.३९ चौ.फुट)** या वर रहाते.घर मौजे महाजनपुर प्रगणे बडनेरा, ता व जि.अमरावती याची चतुःसिमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस - प्लॉट क्र.१७ , — पश्चिमेस - प्लॉट क्र.१९
उत्तरेस- प्लॉट क्र.१४ व १५ व — दक्षिणेस - रोड

**सही/-**
**(ॲड.वैभव न.काकिर्डे )**
**१९, हरिओम कॉलनी,**
**संताजी नगर, अमरावती**
**मो. ९६७३८२१००१**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.ए.बी.कट्टे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७८२/२०२६
**बाळू व ईतर विरुध्द निरंक**
पुढील ता.०६.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Mr.Balu Dagdu Gaikwad
Age 62 Yrs. Occu.: Retired
R/o Paramhans Colony, Hari Shanti Colony No.2, Sai Nagar, Akoli Road, Amravati. Tq. Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **दगडू मुकूंदा गायकवाड आणि पार्वती दगडू गायकवाड** हे अनुकमे दिनांक 17.09.1971 & 07.02.1995 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **बाळू विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **बाळू विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७३१/२०२६
Punam Kundan Goyar+1 Versus Nil
पुढील ता.०६.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Punam Kundan Goyar, Age 50 Yrs. Occu.: Home maker
2. Dipak Kundan Goyar, Age 28 Yrs. Occu.: Labour
Both R/o Near Meherbaba Colony, Jevad Nagar, Rukhmini Nagar, Amt.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Kundan Bhaulal Goyar हे दिनांक 15.04.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Punam Kundan Goyar + 1 Versus Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Punam Kundan Goyar + 1 Versus Nil वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५०५/२०२६
**श्रीमती सुशिला अधिक पाच -वि- निरंक**
पुढील ता.०२.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sushila Suresh Lajewar, Age 73 Yrs. Occu.: Household
2. Ajay Suresh Lanjewar, Age 50 Yrs. Occu.: Labour
3. Pankaj Suresh Lanjewar, Age 44 Yrs. Occu.: Labour
4. Ashish Suresh Lanjewar, Age 42 Yrs. Occu.: Labour
5. Rohit Suresh Lanjewar, Age 36 Yrs. Occu.: Labour
All R/o Congress Nagar Road, Galli No.3, Near Usmania Masjid, Ambar Tower, Amravati.
6. Deepali Atish Umare, Age 39 Yrs. Occu.: Household
R/o Siddarth Nagar, Nachangaon, Tq.Deoli, Dist.Wardha.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Suresh Arjun Lanjewar हे दिनांक 09.10.2020 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुशिला अधिक पाच विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुशिला अधिक पाच विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२८.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३५६
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### जनता विद्यालयात शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा

**अंजनगाव बारी-**जनता विद्यालय, अंजनगाव बारी येथे विद्यार्थ्यांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या सुविधेचे उद्घाटन शाळा समितीचे सभापती महादेवराव चकुले व संस्थाध्यक्ष डॉ. हेमंतजी देव यांच्या हस्ते झाले.विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने शुद्ध व स्वच्छ पाण्याचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले. तसेच पाण्याची बचत, स्वच्छता व जलसंवर्धनाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष आनंदराव इंगोले, रामेश्वरराव लाड, सोमेश्वरराव इंगोले, रमेशभाऊ सुने, प्राचार्य गजेंद्र अवघड व पर्यवेक्षिका मनीषा चिंचोळकर उपस्थित होते.दरम्यान, संस्थेच्या वतीने आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या आरोग्यासोबतच त्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

### विद्यापीठात पदव्युत्तर संस्कृत विषयात प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती-**संस्कृत ही प्राचीन भारतीय भाषा असून भारतीय ज्ञान परंपरेत तिचे महत्त्व आहे. प्राचीन समाज, धर्म, संस्कृती, साहित्य, इतिहास इत्यादी दृष्टीकोनातून संस्कृत भाषेचे अध्ययन महत्त्वपूर्ण ठरते. त्यादृष्टीने संस्कृत विषयात एम.ए. करण्याची सुवर्णसंधी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात उपलब्ध झाली असून पदव्युत्तर संस्कृत विषयात एम.ए. भाग एक व दोन प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. याबाबत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर २०२६-२७ प्रवेश प्रक्रीयेकरिता लिंक देण्यात आली असून अधिक माहितीकरीता विद्यार्थ्यांना संस्कृत विभागाचे समन्वयक डॉ. किशोर राऊत यांचेशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी क्रमांक ९८५०२५१७२५ यावर संपर्क साधता येईल. तरी संबंधितांनी याची नोंद घ्यावी व जास्तीतजास्त संख्येने याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्कृत विभागाचे समन्वयक डॉ. किशोर राऊत यांनी विद्यापीठाच्यावतीने केले आहे.



### वृक्षाला राखी बांधून रक्षाबंधन साजरे

**शिराळा-**दुर्गा इंग्लिश प्रायमरी स्कूल शिराळा येथे रक्षाबंधन साजरे करण्यात आले हाताने बनवलेल्या राख्यांनी मुलांनी झाडाला बांधून रक्षाबंधन साजरे केले. विद्यार्थ्यांनी राख्या तयार करून वृक्षाला बांधून रक्षाबंधन साजरे केले.तसेच मुलींनी शाळेतील विद्यार्थ्यांना राख्या बांधल्या हे विशेष शिवाय वृक्षसंवर्धन म्हणून वृक्षाला राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले. यावेळी विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी मुख्याध्यापक प्रवीण मोहरे शिक्षिका अर्चना नागे, अंकिता घोंगडे, प्राची माकोडे, ऋषिकेश इंगळे, शालिनी कडू, निकिता उके, ऋतुजा रहाटे आदी उपस्थित होते.



### पूर्णा नदीच्या पुलावरून दुचाकीस्वार पडून जखमी

**ब्राह्मणवाडा थडी-**येथील पोलीस स्टेशन समोरील पूर्णा नदीच्या पुलावरून चिंचोली कडे जात असलेल्या उंच रस्त्यावरून रोशन कनीराम पानवे रा. खरपी हा दुचाकी वाहन क्रमांक MH27 AL5897 सहित नदीच्या पत्रात पडून जबर जखमी झाल्याची घटना आज सकाळी साडेदहाच्या दरम्यान घडली असून इसमाला ब्राह्मणवाडा थडी पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रशांत जाधव यांनी तात्काळ चांदूरबाजार येथील सरकारी रुग्णालयामध्ये दाखल केले असून त्याच्या तोंडाला जबर दुखापत झाली असून हातापायाला सुद्धा जखमा पडलेल्या आहे. रोशन पानवे हा खरपी येथून मजुरी करिता गावामध्ये येत होता चिंचोली कडे जात असलेल्या रस्त्याच्या कडे वरून त्याला बॅरिकेट नसल्यामुळे रोशन हा सरळ नदीपात्रात पडला.

# अमरावती संगा विद्यापीठात सुरू आहे कागदोपत्री महाविद्यालये व परीक्षा केंद्रांचा सुळसुळाट!

## विरोधात अहवाल असतानाही परीक्षा केंद्र, एकाच खोलीत शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये

**अमरावती/का.प्र.**

गेल्या काही वर्षांपासून सर्व निकष धाब्यावर बसवून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातंर्गत महाविद्यालये उघडली जात असून संलग्नीकरणही दिल्या जात आहे. बहुतांश अनुदानित महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या रोडावली असताना कागदावर चालविल्या जात आहे तर अनेक ठिकाणी एकाच खोलीत शाळा,कनिष्ट व वरिष्ठ महाविद्यालये आहे. कायम विनाअनुदानित महाविद्यालयांच्या भरमसाठ वाढीमुळे अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त होत असल्याचा आरोप कळंब येथील इंदिरा महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी वरिष्ठांकडे सादर केलेल्या तक्रारीतून केला आहे.तसेच अशा महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्यात यावी अशी मागणी इंदिरा महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अधिष्ठाता, अधिसभा, विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषद सदस्य,संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्याकडे केली आहे. कळंबसारख्या ग्रामीण भागात केवळ १ महाविद्यालय व्यवस्थित चालण्याची स्थिती असताना आजूबाजूलाच किमान २ ते ३ महाविद्यालये दर एक दोन वर्षांतून सुरू होत आहेत. बहुतेक महाविद्यालये केवळ कागदावरून चालवली जातात. प्रत्यक्षात ती महाविद्यालये कुठेही दिसत नाहीत. एखाद्या खोलीतून ती चालवली जातात. प्रयोशशाळेची गरज नाही, नॅकची गरज नाही, प्राचार्य, प्राध्यापकांची गरज नाही, प्रात्यक्षिकांची गरज नाही. अनेक समित्या तपासणीसाठी येतात आणि कुठलीही कारवाई न करता निघून जातात.




निकषानुसार ग्रामीण भागात जागा नसते.जी जागा दाखवली जाते, तिथे शाळा सुरू असतात.महाविद्यालयाच्या निकषांनुसार सदर महाविद्यालयाजवळ शाळेपासून स्वतंत्र स्वतःची जागा व इमारत नाही.सकाळच्या पाळीत आणि दुपारच्या पाळीत वर्ग ५ ते १२ पर्यंतच्या शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालये ज्या खोल्यांत भरतात, त्याच खोल्या वरिष्ठ महाविद्यालयाकरिता दाखविण्यात आल्या आहेत.खोल्यांवर टिनाचे शेड असून कोणत्याही भौतिक सुविधा महाविद्यालयाच्या व परीक्षा केंद्राच्या सुविधांच्या निकषांनुसार नाहीं.दहावीचे परीक्षा केंद्र असल्याने तेही विद्यार्थी तिथेच बसतात. शाळेचे पटांगण लग्नसमारंभाकरिता वापरले जात असल्याने अडथळा निर्माण होतो.

प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी नसतानाही संलग्नीकरण, नामांकन आणि परीक्षा केंद्र कसे मिळते, हा प्रश्न उपस्थित होतो. अंतर्गत मूल्यमापनाचे अनेक व्हर्टिकल्स आलेले असताना घरबसल्या डिग्री वाटप करणाऱ्या या महाविद्यालयांत हे सर्व मूल्यपापन कोण करतात, पोर्टलवर गुण कोण भरतात, प्रात्यक्षिक परीक्षा कोण घेतात हे तपासणे गरजेचे आहे. विद्यापीठात उत्तरपत्रिका तपासणीसाठी अनुदानित महाविद्यालयांच्या प्राध्यापकांवर या सर्व कागदावरच्या महाविद्यालयांचा भार येऊन पडतो आहे.

कळंबमध्ये इंदिरा महाविद्यालय हे १९८३ पासून अनुदानित महाविद्यालय असून येथे तीनही शाखांचे पदवी आणि पदव्युत्तर वर्ग चालवले जातात. १५ एकरचा परिसर, ८८ खोल्या, विद्यापीठाचे कायम संलग्नीकरण, नॅकचा ए ग्रेड, अनेक पुरस्कार अशी एकंदरीत महाविद्यालयाची वैशिष्ट्ये असून आज विद्यार्थी घरबसल्या विद्यापीठाची पदवी मिळत असल्याने खालील आभासी महाविद्यालयांकडे वळताना दिसतात. एकंदरीत गरजेपेक्षा खूप अधिक कागदावर एक खोली महाविद्यालयांना शासनाने आणि विद्यापीठाने कळंब येथे मान्यता दिली आहे. त्यामुळे कायम संलग्नित सर्वात जुन्या नॅक ए ग्रेडच्या अनुदानित इंदिरा महाविद्यालयावर वाईट परिणाम होत आहे. इतर महाविद्यालयांमध्ये प्राचार्य, शिक्षक यांना विद्यापीठाची मान्यता नसल्यास त्यांना संलग्नीकरण आणि नामांकनासह प्रवेशाला परवानगी देण्याची होत असलेली चूक की समितीप्रमाणेच विद्यापीठाचीही आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या कार्यप्रणालीची बदनामी होत आहे.आपण विविध प्राधिकरणांवर असल्याने तिथे हा प्रश्न उपस्थित करावा व योग्य त्या उपाययोजना कराव्यात अशी मागणी कळंब येथील इंदिरा महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अधिष्ठाता, अधिसभा, विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषद सदस्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्याकडे केली आहे.

## उमेद महिला व्यावसायिक युनिटच्या राखी हस्तकला स्टॉलला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती/का.प्र.**

डॉ. श्रीकांत देशमुख संचालित, मानस उपक्रमित बाबा व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्रामध्ये निवासी स्वरूपात उपचार घेत असलेल्या महिला सहभागींसाठी 'उमेद' महिला व्यावसायिक युनिटच्या माध्यमातून विविध कौशल्यविकास व व्यवसायाभिमुख उपक्रम राबविले जातात. याच उपक्रमांतर्गत महिलांनी तयार केलेल्या राखी हस्तकलेचा स्टॉल मानस हॉस्पिटलच्या बाहेर लावण्यात आला. या स्टॉलला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या उपक्रमाच्या माध्यमातून उपचार घेत असलेल्या महिला सहभागींच्या मनात स्वावलंबन, सशक्तपणा, आत्मविश्वास व स्वाभिमानाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.या उपक्रमासाठी माधुरी व पल्लवी सविता व राखी बनवण्याकरता काजल यांनी



मेहनत घेतली,तसेच पर्यवेक्षक विनोद भाके यांनी चारही दिवस महिलांना आवश्यक ती सर्व प्रकारची मदत व सहकार्य केले.

डॉ. रोहित देशमुख यांनी अशा प्रकारचे स्टॉल आयोजित केल्यामुळे महिलांच्या कलागुणांना सन्मान व प्रोत्साहन मिळते, अशी अपेक्षा व्यक्त केली. तर सेंटर इन्चार्ज डॉ. विक्रम वानखडे यांनी अशा उपक्रमांमुळे महिलांचे सशक्तीकरण होऊन त्यांची निर्णयक्षमता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला.या स्टॉलला डॉ. पंकज वसाडकर, डॉ. रश्मी, श्रीवास्तव तसेच बाबा केंद्र व मानस केंद्रातील विविध कर्मचारी, सहकारी व मित्रपरिवाराने भेट देऊन महिला सहभागींचा उत्साह वाढविला. प्रशासन विभागातील जया राघोर्ते यांनी महिलांमधील सुप्त गुणांना वाव मिळणे आणि त्यांना प्रत्यक्ष व्यावसायिक अनुभव मिळणे यावर भर दिला. तसेच 'उमेद' व्यावसायिक युनिटच्या युनिट हेड मीनल घुरडे यांनी राख्या तयार करण्यापासून ते स्टॉलची मांडणी व व्यवस्थापनापर्यंत विशेष मेहनत घेत महिलांना त्यांच्या कौशल्याची व कलेची किंमत जाणवून दिली.

या उपक्रमासाठी बाबा केंद्रातील सोनाली राणे,कांचन पाठबाजे,शरद मानकर, रितिक कासवटे यांच्यासह सर्व कर्मचारी वर्गाने प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या सहकार्य केले.'उमेद' व्यावसायिक युनिटच्या माध्यमातून महिलांना केवळ कौशल्य शिकविणे हा उद्देश नसून, 'मीही काही करू शकते' हा आत्मविश्वास निर्माण करून त्यांना स्वावलंबनाच्या दिशेने घेऊन जाणे हा या उपक्रमाचा खरा हेतू आहे. राखी हस्तकला स्टॉलला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा या प्रयत्नांना मिळालेली प्रेरणादायी पावती ठरली.मोर्शी रोडवरील रहाटगाव समोरील नायरा पेट्रोल पंपाजवळ असलेल्या बाबा व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्रातील 'उमेद' महिला व्यावसायिक युनिटला नागरिकांनी अवश्य भेट देऊन या महिलांच्या कलाकौशल्याला प्रोत्साहीत करण्यात आले आहे.

## सावंगा आसरा येथील मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर यशस्वी



**शिराळा-**नजिकच्या सावंगा (आसरा) येथे राम उमेकर (रुग्णसेवक) तथा संचालक हनुमान नवयुवक मंडळ यांच्या वाढदिवसानिमित्त श्री हनुमान नवयुवक मंडळ व भिमशक्ती युवा क्रीडा मंडळ, सावंगा (आसरा) यांच्या पुढाकाराने तसेच समता फाउंडेशन, मुंबई आणि महात्मे हॉस्पिटल, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले होते. शस्त्रक्रियेसाठी रुग्णांना मोफत ने-आण करण्याची वाहन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली. या शिबिरासाठी महात्मे हॉस्पिटल, अमरावतीचे मॅनेजर डॉ. माजरे, डॉ. करण डिकर तसेच समता फाउंडेशनचे नागेश पळसकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

शिबीर यशस्वी करण्यासाठी भिमशक्ती युवा क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष भावेश खेडकर, शैलेश खेडकर, हनुमान नवयुवक मंडळाचे उपाध्यक्ष अजिंक्य उमेकर, आशिष उमेकर, तसेच भिमशक्ती युवा क्रीडा मंडळ व श्री हनुमान नवयुवक मंडळाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.'रुग्णसेवा हीच खरी समाजसेवा' या भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून गरजू नागरिकांना मोफत आरोग्यसेवा मिळाली.

## तोंगलाबाद ते श्रीक्षेत्र लासूर युवा कावड यात्रा उत्साहात

### दोनशे युवकांचा उत्स्फूर्त सहभाग; आ. गजानन लवटे, सुनील पाटील गावंडे यांची उपस्थिती



**दर्यापूर-**श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी तालुक्यातील तोंगलाबाद येथून ऐतिहासिक तीर्थक्षेत्र श्री आनंदेश्वर संस्थान, श्रीक्षेत्र लासूर येथे भव्य युवा कावड यात्रा मोठ्या उत्साहात व भक्तिभावात झाली. श्री संत लष्करी हनुमान महाराज युवा कावड मंडळाच्या वतीने मागील वर्षापासून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला यावर्षी अधिक भव्य स्वरूप प्राप्त झाले.

या कावड यात्रेत गावातील सुमारे दोनशे युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. 'हर हर महादेव' आणि 'जय महाकाल' च्या जयघोषात युवकांनी कावड खांद्यावर घेत भक्तिभावाने श्रीक्षेत्र लासूरकडे प्रस्थान केले.यानंतर पवित्र जलाने भगवान शंकराचा अभिषेक करण्यात आला. यावेळी ५१ कावडींमधून जलाभिषेक करण्यात आल्याने धार्मिक उत्साह शिगेला पोहोचला.या यात्रेच्या निमित्ताने दर्यापूर-अंजनगाव मतदारसंघाचे आ.गजानन लवटे यांनी उपस्थित राहून युवकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी युवा समाजसेवक नितेश गावंडे, समाजसेवक रामशेठ मालपाणी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पाटील गावंडे, युवक काँग्रेसचे प्रदेश महासचिव नितेश वानखडे तसेच शिवर सेवा सहकारी सोसायटीचे संचालक अजय देशमुख आदी मान्यवरांनी यात्रेला भेट देऊन युवकांचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. या युवा कावड यात्रेसाठी पिंपळद जिल्हा परिषद सर्कलमधील युवा नेतृत्व, समाजसेवक तथा उद्योजक नितेशदादा गावंडे यांनी युवकांसाठी टी-शर्ट उपलब्ध करून विशेष सहकार्य केले. त्यांच्या या योगदानाबद्दल युवा मंडळाच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.यात्रेनंतर गावकऱ्यांच्या सहकार्याने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी युवा कावड यात्रा महोत्सव समितीच्या सर्व युवकांनी तसेच गावकऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कस्तुरबा इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडादिन विविध स्पर्धासह साजरा

**अमरावती-**स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित कस्तुरबा इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. भारतामध्ये माजी हॉकी दिग्गज मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. याप्रसंगी मुख्याध्यापिका साधना चंदन, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना मानवंदना व सलामी दिली.

विद्यार्थ्यांनी नृत्याचे सादरीकरण करून त्यामधून क्रीडा प्रदर्शन दर्शवून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित केला. हॉकी, कुस्ती, स्केटिंग,

या खेळाची प्रदर्शनी दाखवून त्याला सुंदर असे गीतामध्ये प्रदर्शित करून विद्यार्थ्यांसमोर प्रस्तुत केले. शाळेच्या मुख्याध्यापिका साधना चंदेल यांनी मेजर ध्यानचंद यांच्या कार्याचे स्मरण करून खेळाचे महत्व पटवून आपणाही त्यांच्यासारखे कुठल्याही एका आवडत्या खेळात तरबेज व्हावे व शाळेचे व आपल्या देशाचे नाव उज्वल करावे. खेळामध्ये जिद्द, चिकाटी, शिस्त आणि सांघिक भावना अंगी करावी व खेळामध्ये सतत सक्रिय राहण्याची आवाहन केले. खेळाडू म्हणून आपल्यात असलेल्या प्रतिभेला वाव मिळाला पाहिजे असे वक्तव्य करून क्रीडा दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचा कार्यभार क्रीडा शिक्षक विकास रुईकर व राजकमल यांनी सांभाळला.



# ७०वर्षांच्या ताब्यातील संरक्षित कुळाच्या जमिनीच्या कथित बेकायदेशीर व्यवहाराची चौकशी करा

## दिव्यांग शेतमजुराची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**अमरावती/का.प्र.**

नया अकोला येथील पारधी आदिवासी समाजातील दिव्यांग शेतमजूर विकास पुंडलिकराव सोळंके यांनी आपल्या कुटुंबाच्या सुमारे ७० वर्षांपासूनच्या ताब्यात व वहिवाटीतील संरक्षित कुळाच्या जमिनीची कथितपणे शासन व जिल्हाधिकाऱ्यांची आवश्यक परवानगी न घेता खरेदी-विक्री करण्यात आल्याचा आरोप केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी तसेच आदिवासी कुटुंबाला न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

विकास सोळंके यांच्या निवेदनानुसार, मौजा नया अकोला, ता.जि. अमरावती येथील गट क्रमांक ४३६ (जुना सर्व्हे नं. १२१/२), क्षेत्र १ हेक्टर ८४ आर आणि गट क्रमांक १०६ (जुना सर्व्हे नं. ५१/३), क्षेत्र ३ हेक्टर ५८ आर या जमिनीवर त्यांच्या कुटुंबाचा अनेक दशकांपासून ताबा व वहिवाट आहे. सन १९५७-५८ पासून महसूल अभिलेखात त्यांचे वडील स्वर्गीय पुंडलिक सांगलाजी सोळंके यांच्या नाजाची नोंद असल्याचा तसेच सन १९६१ पासून संरक्षित कुळ म्हणून नोंद उपलब्ध असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

या दोन्ही जमिनीच्या खरेदी विक्रीबाबत संबंधित न्यायालये व महसूल अधिकाऱ्यांकडे विविध प्रकरणे सुरू असतानाही कोणतीही पूर्वसूचना न देता आणि आवश्यक शासकीय परवानगी न घेता खरेदीखत करण्यात आल्याचा आरोप सोळंके यांनी केला आहे. गट क्रमांक ४३६ संदर्भात १५ मार्च २०११ रोजी दस्त क्रमांक १३१३/२०११ तर गट क्रमांक १०६ संदर्भात ९ मार्च २०१६ रोजी दस्त क्रमांक ४२८/२०१६ नुसार खरेदी-विक्री करण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे. ही खरेदी-विक्री नियमबाह्य असल्याने संबंधित दस्त रद्द करण्यात यावेत, अशी त्यांची मागणी आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, या जमिनीच्या फेरफार नोंदीसाठी अनेक वर्षांनंतर मुदतबाह्य अर्ज दाखल करून फेरफार मंजूर करण्यात आले. यापूर्वी कुळधारकांच्या बाजूने विविध महसूल अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशांकडे दुर्लक्ष करून नायन तहसीलदारांनी ४ मार्च २०२४ रोजी, उपविभागीय अधिकाऱ्यांनी २१ में २०२५ रोजी आणि अपर जिल्हाधिकाऱ्यांनी १७ फेब्रुवारी २०२६ रोजी गैरअर्जदारांच्या बाजूने कथितपणे नियमबाह्य आदेश दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. सदर प्रकरण सध्या अपर आयुक्त, अमरावती विभाग यांच्या न्यायालयात पुनर्निरीक्षण अपील म्हणून न्यायप्रविष्ट असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. सोळंके यांनी महसूल विभागातील संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी व नायब तहसीलदार यांनी प्रकरणाची संपूर्ण माहिती व पूर्वीचे न्यायालयीन आदेश माहिती असतानाही कथितपणे नियमबाह्य नोंदी व फेरफार मंजूर केल्याचा गंभीर आरोप केला आहे. या प्रकरणातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भूमिकेची विभागीय चौकशी करून त्यांच्या उत्पत्र व संपत्तीचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र संरक्षित कुळ वहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८ मधील तरतुदींचा आधार घेत सोळंके यांनी संरक्षित कुळाच्या हक्काबाबत आपली बाजू मांडली आहे. तसेच पारधी आदिवासी कुटुंबातील सुमारे ४० व्यक्तींचा उदरनिर्वाह या जमिनीवर अवलंबून असून, अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या न्यायालयीन व महसूल प्रकरणांमुळे कुटुंबाला आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, निवेदनात गैरअर्जदार रमेश देविदास महल्ले व इतर तसेच सत्यनारायण शालिग्राम रेळे (मयत) यांच्यावर शासन व प्रशासनाची कथित दिशाभूल करून बेकायदेशीर खरेदी-विक्री केल्याचा आरोप करण्यात आला आहे. मात्र, या आरोपांचाचजत संबंधित गैरअर्जदारांची बाजू समजू शकलेली नाही.

प्रकरणाची गांभीर्याने चौकशी करून संरक्षित कुळाच्या जमिनीबाबत झालेली कथित बेकायदेशीर खरेदी-विक्री रद्द करावी, दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर व विभागीय कारवाई करावी आणि पारधी आदिवासी कुटुंबाला न्याय द्यावा, अशी कळकळीची मागणी विकास सोळंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. अन्यथा कुटुंबाला उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

# दंडग्रस्त चांडकांची मालमत्ता वाचविण्यासाठी महसूलची 'वज्रमूठ'?

## ४८ कोटींचा दंड कायम होऊनही वसुलीला विलंब, विहित नमुन्याच्या प्रस्तावासाठीही १५ दिवसांचा विलंब

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** शासनाच्या तिजोरीत जमा होणे अपेक्षित असलेले तब्बल ४८ कोटी रुपये! दंड कायम झाला, अपील फेटाळले गेले, मालमत्ता जप्ती व लिलावाचा मार्ग मोकळा झाला; मात्र प्रत्यक्ष वसुलीच्या वेळी महसूल प्रशासनाची पावले पुन्हा रेंगाळली आहेत. कारवाईचा आदेश आहे, मालमत्ता आहे, प्रक्रिया आहे; मग वसुली थांबविणारी 'अदृश्य भिंत' नेमकी कोण उभी करीत आहे? असा संतप्त सवाल अकोट तालुक्यातील गाजीपूर गौण खनिज उत्खनन प्रकरणामुळे उपस्थित होत आहे.




दंडग्रस्त संतोष चांडक यांच्या मालमत्ता जप्ती व लिलावाचा प्रस्ताव विहित नमुन्यात सादर करण्याचे मौखिक निर्देश १८ ऑगस्ट २०२६ रोजी देण्यात आले. त्यानंतर तब्बल १५ दिवस उलटूनही प्रस्ताव उपजिल्हाधिकारी महसूल कार्यालयाकडे पोहोचलेला नसल्याची माहिती आहे. त्यामुळे ४८ कोटींची वसुली करायची आहे की फाईलला विश्रांती द्यायची आहे? असा थेट प्रश्न आता महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीसमोर उभा ठाकला आहे.

सन २०२४ मध्ये अकोट तहसीलदारांनी अतिरिक्त गौण खनिज उत्खनन प्रकरणी जमिनमालक विलास कालू चिमोटे आणि भाडेपट्टाधारक संतोष चांडक यांच्यावर ४८ कोटी रुपयांचा दंड ठोठावला. एवढ्या मोठ्या रकमेचा दंड म्हणजे शासनाच्या महसुलाचा गंभीर विषय. त्यामुळे दंडाची वसुली ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असणे अपेक्षित आहे.

मात्र या प्रकरणात दंड ठोठावला आणि वसुली लांबली; अपील झाले आणि निर्णय लांबला; निर्णय झाला आणि प्रस्ताव लांबला; प्रस्ताव गेला आणि पुन्हा नमुन्याच्या नावाखाली प्रक्रिया लांबली! हा निव्वळ योगायोग आहे की प्रशासकीय कार्यपद्धतीचा नमुना, याचा खुलासा होणे गरजेचे आहे. चांडक यांच्या याचिकेवर उच्च न्यायालयाने संबंधित अपिलीय प्राधिकरणाकडे चार आठवड्यांच्या आत अपील करण्याची आणि त्यावर आठ आठवड्यांच्या आत गुणवत्तेनुसार व कायद्यानुसार निर्णय घेण्याची दिशा दिली होती.मात्र या प्रकरणातील पुढील घडामोडींवरून न्यायालयाने अपेक्षित केलेली कालमर्यादा प्रत्यक्षात कितपत पाळली गेली, याबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. अपील स्वीकारण्यापासून सुनावणीपर्यंतचा कालावधीही लक्षणीय ठरला. न्यायालयाच्या आदेशाला वेळेची मर्यादा; महसूल प्रक्रियेला मात्र विलंबाची मुभा? या विलंबाचे उत्तर प्रशासनाने जनतेसमोर ठेवणे आवश्यक आहे. अखेर अकोट एसडीओंकडून चांडक यांची अपील याचिका फेटाळण्यात आली आणि तहसीलदारांनी लावलेला ४८ कोटी रुपयांचा दंड कायम ठेवण्यात आला. दंडवसुलीसाठी आक्रमक पावले उचलण्याचे निर्देशही देण्यात आले. मग आता दंड कायम झाला तर वसुली कुठे आहे? असा एकच प्रश्न जनसामान्य नागरिक विचारत आहेत.

### आदिवासी जमीन रेकॉर्डवर; महसूलची कारवाई मात्र बेपत्ता!

गट क्रमांक २७ आणि ३८ संदर्भात संतोष चांडक यांच्या नावे ९९ वर्षांचा नोंदणीकृत भाडेपट्टा असल्याचा दावा आहे. हा भाडेपट्टा करण्यापूर्वी शासनाची आवश्यक परवानगी घेण्यात आली नव्हती, असा उल्लेख तत्कालीन एसडीओंच्या अहवालात सुद्धा नमूद आहे. याशिवाय गट क्रमांक ३७ संदर्भातील भाडेपट्टा/करारनामा साध्या बाँडवर असल्याचे दस्तऐवज शासनाच्या रेकॉर्डवर आले आहेत. एवढ्या सर्व बाबी रेकॉर्डवर असताना सुद्धा चौकशीला नेमका अडथळा कोणता? असा यक्ष प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. दरम्यान, ४८ कोटींच्या दंडाची वसुली करण्यासाठी कागदपत्रांचा आधार घेणारा महसूल विभाग आदिवासी जमिनीच्या व्यवहारात मात्र मौन का बाळगतो? या प्रश्नाने अनेक संशयाला खतपाणी मिळत आहे.

### 'सुमोटो नाही, तक्रार द्या!' – उपजिल्हाधिकारी खेमणार

आदिवासी जमिनीचे नोंदणीकृत भाडेपट्टे, बाँडवरील करारनामे आणि संबंधित कागदपत्रे उपजिल्हाधिकारी महसूल श्री. खेमणार यांच्या निदर्शनास तब्बल महिन्याभरापूर्वी आणून देण्यात आले आहे. मात्र या कागदपत्रांची प्रशासनाने स्वतःहून पडताळणी करण्याऐवजी 'सुमोटो नाही, मला तक्रार द्या; मग बघू', अशी भूमिकाच खेमणार यांनी घेतली आहे. रेकॉर्डवर असलेल्या कागदपत्रांची चौकशी करण्यासाठीही तक्रारदाराची गरज भासते का? जर गंभीर बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे, तर तिची सत्यता तपासणे ही प्रशासनाची जबाबदारी नाही का ? असे प्रश्न उद्भवत असून यामुळे महसूल उपजिल्हाधिकारी कार्यालयाकडून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी या भूमिकेमुळे उपजिल्हाधिकारी, महसूल कार्यालयाच्या कार्यपद्धतीवरही आता सवाल उपस्थित होत आहेत.

### निर्णय झाला अन् पुन्हा 'प्रस्तावाचा अडसर'!

अपीलवर निर्णय झाल्यानंतर पाच दिवसांनी चांडक यांच्या मालमत्ता जप्ती व लिलावासंदर्भातील प्रस्ताव पुढील कारवाईसाठी पाठविण्यात आला. मात्र तो उपजिल्हाधिकारी महसूल कार्यालयाकडे थेट न जाता जिल्हा खनिकर्म विभागाकडे गेल्याचे समोर आले. खनिकर्म विभागाने तो प्रस्ताव उपजिल्हाधिकारी महसूल कार्यालयाकडे पाठविला. तेथे 'प्रस्ताव विहित नमुन्यात नाही!' असा नवीन आक्षेप पुढे आला अन् ४८ कोटींच्या वसुलीची गाडी पुन्हा रुळावरून खाली उतरली. नमुना क्रमांक १७ नुसार प्रस्ताव सादर करण्याचे मौखिक निर्देश १८ ऑगस्ट २०२६ रोजी अकोट तहसील कार्यालयाला देण्यात आले. आज १५ दिवस उलटून गेले; तरीही प्रस्ताव पुन्हा सादर झालेला नसल्याचे सांगण्यात येते. केवळ एक पानाचा फॉर्म भरण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी ओलांडला जातो, तरीही फॉर्म भरल्या जात नसल्याने शासनाचा ४८ कोटींचा हक्क वसूल करण्याच्या बाबतीत ही गती प्रशासनाला शोभणारी आहे का? असा संतप्त सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

---

### टर्निंग पॉईंट ऑफ करिअर

# 'बुक नुक स्टडी रूम'चा पहिला वर्धापन दिन उत्साहात

### विद्यार्थी आणि मान्यवरांचा सत्कार



**अमरावती/ प्रतिनिधीः-**

शहरातील राजकमल चौक स्थित 'बुक नुक स्टडी रूम' च्या स्थापनेला १ सप्टेंबर रोजी एक वर्ष पूर्ण झाले. या निमित्ताने 'बुक नुक स्टडी रूम' मध्ये गेट टु गेदर चे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व विद्यार्थ्यांना एकत्रित बोलावून त्यांच्यासोबत गप्पा मारण्यात आल्या. मागील एक वर्षातील अभ्यासाचा अनुभव, अडचणी आणि आठवणी यांवर मुक्त संवाद झाला.

या एक वर्षाच्या कालावधीत 'बुक नुक स्टडी रूम'च्या वाटचालीत ज्यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य केले, अशा सर्व मान्यवरांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सांगता सर्व विद्यार्थी आणि स्टाफसोबत अल्पोपहार घेऊन करण्यात आली. तसेच कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित प्रत्येक विद्यार्थ्याला भेटवस्तू देण्यात आले.'बुक नुक स्टडी रूम' च्या या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी 'बुक नुक स्टडी रूम'चे मॅनेजर कपिल गोहर, गौरव दूरगकर, प्रशांत वडतकर, सतीश नागने, कुंदन सूर्यवंशी, सुनीता गोहर, बुक नुक स्टडी रूम चे विद्यार्थी गणेश लेह, यश कर्तारी ,तेजस नोटावाले, रौणक नीसाद, सोहम दिक्षित, सिद्धांत जांगले, कृतिका मनोहरे, कविता दहिकर आदिंची उपस्थिती होती.

---

# गणेशोत्सवात शांतता, स्वच्छता आणि सुरक्षिततेवर भर

### मंडळांना पोलीस आयुक्तांचे स्पष्ट निर्देश

**अमरावती/ प्रतिनिधीः-**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहरातील सार्वजनिक शांतता, सुव्यवस्था आणि सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने व्यापक नियोजन सुरू केले आहे. गणेशोत्सवाच्या काळात रस्त्यावर अडथळा निर्माण करणारे मंडप उभारू नयेत, मंडप परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करावी आणि सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवू नये, अशा स्पष्ट सूचना पोलीस आयुक्त राकेश



ओला यांनी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना दिल्या.

गणेशोत्सवाच्या अनुषंगाने मंगळवारी, २ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता पोलीस आयुक्त कार्यालयात पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या अध्यक्षतेखाली विशेष शांतता समितीची बैठक घेण्यात आली. बैठकीला गणेश मंडळांचे पदाधिकारी, शांतता समितीचे सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, मंदिर ट्रस्टी तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत उपस्थितांनी शहरातील




अस्वच्छता, अतिवृष्टीमुळे रस्त्यांवर पडलेले खड्डे व साचलेले पाणी, झाडांच्या धोकादायक फांद्या तसेच लोंबकळणाऱ्या वीज व केबलच्या तारा याबाबत चिंता व्यक्त केली. चित्रा चौक परिसरातील उड्डाणपुलाचे सुरू असलेले काम, मिरवणूक व विसर्जन मार्गांवरील अपुरी प्रकाशव्यवस्था आणि स्वच्छतेसंदर्भातील प्रश्नही यावेळी उपस्थित करण्यात आले. पोलीस आयुक्तांनी संबंधित सर्व विभागांना या समस्या तातडीने सोडवून गणेशोत्सवापूर्वी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. महानगरपालिका प्रशासनाने स्वच्छता व आरोग्यविषयक नियोजनाला प्राधान्य द्यावे, तसेच मिरवणूक आणि विसर्जन मार्ग सुरक्षित व अडथळेमुक्त ठेवावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. गणेशोत्सव मंडळांनी ☞(पान २ वर)

---

# हातात खंजीर घेऊन फिरणारा तडीपार ताब्यात

**अमरावती/ प्रतिनिधीः-**

तडीपार असतानाही हातात लोखंडी खंजीर घेऊन सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण करणाऱ्या इसमाला गुन्हे शाखा युनिट क्रमांक २च्या पथकाने रंगेहात ताब्यात घेतले. ही कारवाई बुधवारी (२ सप्टेंबर) गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मोशीकॉल जीन परिसरात करण्यात आली. सुरज प्रकाश इंगोले (वय ३०, रा. कपिलवस्तू नगर, अमरावती) असे ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाचे नाव



आहे. गुन्हे शाखेचे पथक गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत तडीपार इसम खंजीर घेऊन फिरत असल्याची☞(पान २ वर)

---

# सराईत वाहनचोरांच्या टोळीचा पर्दाफाश

### तिघांना अटक, १६ दुचाकी जप्त, -राजापेठ पोलिसांची कारवाई



**अमरावती/ प्रतिनिधीः-**

शहरात दुचाकी चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी राजापेठ पोलिसांनी केलेल्या कारवाईत सराईत वाहनचोरांच्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे. पोलिसांनी तीन आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून तब्बल १६ दुचाकी व चोरीच्या वाहनांचे पार्टस् असा एकूण ४ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे दुचाकी चोरीच्या अनेक गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता आहे. भातकुली येथील सचिन☞(पान २ वर)

---

# तरुण शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**फत्तेपूर-शिवणगाव येथील घटना**

**तिवसा/ प्रतिनिधीः-**

तालुक्यातील फत्तेपूर (शिवणगाव) येथील ३९ वर्षीय तरुण शेतकऱ्याने शेतातील विहिरीत गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना मंगळवार दि.१ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी घडली. मनोज किसनराव पांडे (वय ३९ वर्षे) असे मृतक तरुणाचे नाव आहे.मंगळवारी सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान शेतातील विहिरीवर त्यांनी स्वतः गळफास घेवून अंतीम यात्रा संपविली. शेताशेजारी असलेल्या



काही नागरिकांना ही घटना निदर्शनास येताच त्यांनी घटनेची माहिती नांदगाव पेठ पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह विहिरीतून बाहेर काढून पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह अमरावती शासकीय जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनाकरीता पाठविण्यात आला. मृतक मनोज पांडे यांनी शेतीसाठी कर्ज घेतले होते मात्र पीक हाती लागणार की नाही,या विवंचनेत त्याने आत्महत्येचे पाऊल उचलले असावे,असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. पुढील तपास नांदगाव पेठ पोलीस करीत आहे.त्यांच्या पश्चात आई-वडील, लहान भाऊ, पत्नी आणि एक मुलगी असा परिवार आहे.

---

# दसरा मैदानातील खूनप्रकरणी एकाला जन्मठेप; साथीदार निर्दोष

### नारायण जाधव हत्या प्रकरण

### -विशेष न्यायालयाचा निकाल

**अमरावती/ प्रतिनिधीः-**

दसरा मैदान परिसरात झालेल्या खूनप्रकरणी आरोपी गोपाल ऊर्फ गोलू रामदास शिंदे (वय २७) याला जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक ४ चे न्यायाधीश संजय शिंदे यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. त्याच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यान्वये दोष सिद्ध झाला. या प्रकरणातील दुसरा आरोपी राजू लक्ष्मण शिंदे (वय ४२) याची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

१२ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी दसरा मैदान परिसरातील हनुमान मंदिराजवळ ही घटना घडली होती. मयत नारायण तुकाराम जाधव हे घराच्या पायरीवर बसले असताना गोपाल शिंदे व राजू शिंदे तेथे आले. किरकोळ कारणावरून त्यांच्यात वाद झाला. त्यानंतर गोपाल शिंदे याने जाधव यांना खाली पाडून ☞(पान २ वर)



# बालिकेवरील लैंगिक अत्याचाराच्या प्रयत्नात वृद्ध दोषी

### तीन वर्षांचा सश्रम कारावास,-पाच हजार रुपये दंडाचीही शिक्षा

**अमरावती/ प्रतिनिधीः-** सहा वर्षीय बालिकेवर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी ६५ वर्षीय व्यक्तीला जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक २ ने दोषी ठरवून तीन वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. आरोपीला पाच हजार रुपये दंडही ठोठावण्यात आला असून, दंडाची रक्कम न भरल्यास एक दिवसाचा साधा कारावास भोगावा लागणार आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश यशवंत आनंद गोस्वामी यांनी बुधवारी, २ सप्टेंबर रोजी या प्रकरणाचा निकाल दिला.

न्यायालयीन प्रकरणानुसार, २८ मार्च २०२१ रोजी धामणगाव रेल्वे तालुक्यातील भातकुली-रेणुकापूर परिसरात ही घटना घडली होती. बालिका घरासमोर खेळत असताना आरोपी किशोर ☞(पान २ वर)

---

# शिरलस शिवारात वाघाने केली वासराची शिकार

**मोर्शीत वाघाची दहशत कायम**

**मोर्शी/ प्रतिनिधीः-**

मोर्शी तालुक्यातील भांबोरा परिसरात काही दिवसांपूर्वी शेतकरी चरणदास वासुदेव इखे यांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच परिसरात वाघाचा धुमाकूळ सुरूच आहे. बुधवारी सकाळी शिरलस शिवारात वाघाने प्रणित



महादेवराव मावळे यांच्या शेतातील गोठ्यातील वासराची शिकार केल्याची घटना समोर आली. या ☞(पान २ वर)

---

# कोणार्कचा ठेका रद्द, हायकोर्टाच्या निर्णयाने आक्षेपांवर शिक्कामोर्तब

### निविदा प्रक्रियेत मोठ्या भ्रष्टाचाराचा होता आरोप

### -आता जबाबदारांवर कारवाई करा : अनिल अग्रवाल



**अमरावती/ प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेने कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला दिलेला बहुचर्चित सात वर्षांचा एकल व संयुक्त सफाई ठेका नागपूर खंडपीठाने रद्द करून निविदा प्रक्रिया नव्याने राबविण्याचे निर्देश दिल्यानंतर राजकीय प्रतिक्रिया तीव्र झाल्या आहेत. काँग्रेसचे नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करताना हा निर्णय मनपाच्या पहिल्याच आमसभेत त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर आणि केलेल्या आरोपांवर न्यायालयीन शिक्कामोर्तब असल्याचे म्हटले आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणासाठी जबाबदार अधिकारी व संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी सांगितले की, जानेवारी महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात तत्कालीन मनपा आयुक्त तथा प्रशासक ☞(पान २ वर)

---

# उपमहापौर सचिन भेंडे यांच्यासह १२ आरोपी निर्दोष

### मनपा आमसभेत गोंधळ घालून सुरक्षा रक्षकाला मारहाणीचे प्रकरण

### ॲड. दीप मिश्रांचा यशस्वी युक्तिवाद



**अमरावती/ प्रतिनिधीः-**

युवा स्वाभिमान पक्षाचे नेते आणि सध्या अमरावती मनपाचे उप महापौर सचिन ओंकारराव भेंडे यांना न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. भेंडे यांच्या १२ आरोपींची सन २०२१ मध्ये महानगर पालिकेच्या आमसभेत गोंधळ घालून सुरक्षा रक्षकाला मारहाण केल्याच्या आरोपातून जिल्हा व सत्र न्यायाधीश चंद्रपाल बलवानी यांनी सोमवारी निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात एड. दीप मिश्रा यांनी यशस्वी युक्तिवाद केला आहे. दोषारोप पत्रानुसार ही घटना वर्ष २०२१ ची आहे. महानगर पालिकेची आमसभा सुरू असताना युवा स्वाभिमान पार्टीचे कार्यकर्ते सचिन भेंडे यांच्या नेतृत्वात तिथे पोहोचले. त्यांनी आमसभेत गोंधळ घातला. त्यांना रोखण्यासाठी आलेल्या सुरक्षा गार्ड सोबत मारहाण केली. या प्रकरणाची☞(पान २ वर)